साहामाही " ३ " " ८९
साल अखेर " ७ " " १८९
किरकोळ अंकास.........................८४

Six monthly............ 3 " 8 as
Single copy...............................

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०१८६
दुसरे खेपेस .........०१

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...
Repetition per line

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXI — AKOLA MONDAY 2 MAY 1887 — NO 17

वर्ष २१ — अकोला सोमवार तारीख २ माहे मे सन १८८७ इ० — अंक १७


## जाहीरात.

## उपनिषदांचा मराठी अर्थ

ऋग्वेदाच्या शाखा २१ आहेत. यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० शाखा आहेत याप्रमाणें चारवेदांच्या मिळून ११८० शाखा आहेत. प्रत्येक शाखेचें एकेक उपनिषद् आहे, याप्रमाणें ११८० उपनिषदें आहेत त्यांतून मुख्य मुख्य अशीं १०८ उपनिषदें श्रीरामानें मारुतीत उपदेशिलीं त्यांचीं नावें:—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैतिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, इत्यादि आहेत. त्यांतील ऋग्वेदाचीं १०, (शुक्ल जूंची १९ आणि कृष्णयजूंची ३२ अशीं) यजूंचीं ५१, सामवेदाचीं १६ आणि अथर्ववेदाचीं ३१ उपनिषदें आहेत. गौडपादाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, शंकरानंद, सदाशिवब्रह्मेंद्र, स्वयंप्रकाशानंद आणि विद्यारण्याचार्य इत्यादिकांनीं पूर्वोक्त उपनिषदांवर भाष्य आणि व्याख्या केल्या आहेत.

श्रीरामानें हनुमंतास उपदेशिलेल्या १०८ उपनिषदांचें मराठी भाषांतर करावें हें सांप्रतकाळास फारच उपयोगी होईल असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून, तसें करावें असें मी इच्छित आहें.

प्रथम मूळ वाक्य लिहून नंतर त्याचे भाष्य आणि व्याख्या लिहून, त्यापुढें त्याचा अर्थ मराठींत लिहावा अशी योजना आहे.

हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून मासिक पुस्तक रूपानें छापणार आहों. रायल जातीचे अष्टपत्री साचाचें पुस्तक प्रति महिन्यास निघत जाईल. चांगला आश्रय मिळेल तर दर पंधरवड्यासही काढितां येईल. प्रत्येक अंकांत १६ पृष्ठें येत जातील. १२ अंकाबद्दल आगाऊ किंमत २ रु० व मागाहून ३ रु० पडेल. हांशील आगाऊ ०६ व मागाहून ०८ पडेल.

एकशेंआठ उपनिषदांचें मराठी भाषांतराची अभिरुचि लोकांस लागून त्याचा चांगला खप झाल्यास, बाकी राहिलेल्या १०७२ उपनिषदांचा शोध करून मिळतील तितकीं याच प्रमाणें छापण्याचा उद्योग करूं.

## वैद्यक मांत्रिकार्णव.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आम्ही शके १८०९ चैत्र शुद्ध प्रतीपदेपासून "वैद्यकमांत्रिकार्णव" या नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहेत; या पुस्तकांमध्यें चरक, सुश्रुत, वाग्भट, भावप्रकाश, आयुर्वेद इत्यादि संपूर्ण वैद्यशास्त्रविषयक स्वीय ग्रंथांचीं, व यवनकृत वैद्यशास्त्रविषयक ग्रंथांचीं, व मंत्रमहोदधि, रुद्रयामल, शारदातिलक, दत्तपटल, प्रपंचसार, तंत्रसार, वाराहततंत्र, इंद्रजाल इत्यादि मंत्रशास्त्रविषयक ग्रंथांची माहिती क्रमाक्रमानें दिली जाईल हें पुस्तक रॉयल ४० पानांचें असून यामध्यें संस्कृत श्लोक मराठी अर्थांसहित देऊन प्रसिद्ध केलें जाईल.

वर्षाची किंमत ४ रुपये ८ आणे व टपालखर्च ६ आणे.

किरकोळ अंकास ८ आणे.

नारायण गोविंदराव कडलक,
ज्योति. प्रकाशकर्ते, मनाची पेठ, घोरिपडळ घरनंबर २८४, पुणें.

### नोटीस.

रा० रा० गोपाळ बाबनाजी आसीकर रहाणार आकोळें. यांस नोटीस देणार चंद्रभान देशमुख रहाणार झेलपूर नोटीशीनें असें कळवितों कीं आज तारखे पासून तुमचें मुख्त्यार पत्र आम्ही रद्द केलें. आमचे सर्व कागदपत्र आणून द्यावें. सन १८७९ साला पासून आमचे सर्व हिशोब द्यावेत नाहीं तर रीती प्रमाणें तजवीज केली जाईल; व आमच्या संबंधानें रा०रा० गोपाळपंत जो व्यवहार या पुढें करतील तो आम्हास मान्य नाहीं. कळावें तारीख २९—४—८७ इ०

(सही) चंद्रभान वल्लद सूर्यभान
देशमुख तर्फे कुल मुख्त्यार
हाफीज रहिमतुल्ला दस्तुर
खुद.

## दिवाण सर सालरजंग.

(लिहून आलेला मजकूर)
(मागील अंकावरून पुढें चालूं.)

तरुण राजपुत्रांच्या हाताखालीं तरुण दिवाणांनीं हिंदुस्थानांतील एका मोठ्या संस्थानच्या राज्यकारभाराचा गाडा चालवावा हें अगदीं अप्रशस्त असल्याचें लार्ड रिपन व लार्ड डफरिन या दोघांच्याही मनांत येऊन चुकलें होतें परंतु उळटपक्षी मात्र सर सालरजंग यांच्या अप्रतिम राजसेवेबद्दल त्यांच्या विरुद्ध मंडळींत सत्ताधिकारी म्हणून त्यांचे आनृणी होणें हें ही फार निंद्य होतें. प्रथमतः निजाम सरकारांनीं स्वतः होऊन सर सालरजंग यांस दिवाण नेमण्याविषयीं लार्ड रिपन साहेब यांस विचारलें होतें तेव्हां यांच्या इच्छेनुरूप गोष्ट घडून आली आणि तरुण सरकार आणि तरुण दिवाण यांच्या सलामसलतीनें कांहीं काळ राज्यकारभार चांगला चालला. पुढें निजाम सरकारची प्रकृती बिघडल्यामुळें त्यांस काम पाहण्यास कंटाळा वाटे व सरकारी काम तुंबत चाललें म्हणून आलिशान रेसिडेंन्ट मि० कार्डेरी साहेब यांच्या अनुमोदनानें सर साल रजंग स्वतःच काम पाहूं लागले. नंतर निजाम सरकार टक्कामंड येथें असतांना निजाम सरकार व दिवाण यांचे मिटलें जुळेना व दोघां दोघांत वेबनावाची गोष्ट येऊन पडकली. दिवाण साहेब आपले सरकाराची सल्ला घेत नाहींत व त्यांनीं आपल्या घराण्याचा अपमान करितात वगैरे दिवाणाच्या वर्तनावर आक्षेप लोकांत निघूं लागले. दिवाण साहेबांच्या हें कानीं पडतांच त्यांनी निजाम सरकारास साष्टांग मुजरा करून पिढीजादे राजनिष्ट आहों व राहूं अशा विषयीं अभिवचन दिलें. इतका बिघाड झाला असून ही मशार निव्हे सर सालरजंग यांनीं राजीनामा दिला याचीं कारणें काय असावींत अशा विषयीं आतां सर्वत्र चर्चा होऊं लागली आहे. कांहीं असें म्हणतात कीं दिवाण साहेबांचे हाडवैरी आगा मिरजाबेग यांचा घोडेवाला कांहीं कारणावरून मरण पावला तेव्हां आगा मिरजाबेग यांना त्याच्या आकस्मिक मृत्यूबद्दल डाक्टर सर्टिफिकीट असणें जरूर वाटल्या वरून हैद्राबादच्या एका डाक्टर कडे ५०० रुपये फी पाठवून त्यांस बोलावणें केलें. फीबद्दल एवढी मोठी रकम आली हें पाहून डाक्टर जानसन साहेबांस संशय आला व त्यांनीं तें प्रकरण कोतवालच्या कानावर घातलें. एकीकडे मसलत करतो म्हणून आगा मिरजाबेग यांनीं मोठ्या मध्यासानें रेसिडेन्सीतल्या सर्जनाला ५० मोहरा फी देऊन रविवारी त्याज कडून सर्टिफिकिट घेतलें. त्यांत जखम होऊन घोडेवाला मरण पावला परंतु जखमें वरून ती होण्याचें कारण कांहीं स्पष्टोसंचीस येण्यासारखें नव्हतें असा मजकूर होता. पुढें कोतवालानें ती गोष्ट दिवाणांच्या कानावर घातली परंतु दिवाणांनीं स्वतां वरील द्वेषबुद्धीनें खटला चालविला म्हणून दोष न यावा म्हणून तें प्रकरण खुद्द निजाम सरकाराकडे धाडिलें. तिकडे ही तें तसेंच पडलें व कांहीं दिवसांनीं खुरशिदजाहा व आगा मिरजाबेग यांच्या तर्फेच्या मंडळीचे या खटल्याच्या चौकशी करितां कमिशन नेमिलें गेलें. कमिशनच्या रिपोर्टावर रेसिडेंट साहेबांना गैरशिस्त काम झालें अशा मतलबाची कडक टीका केली व त्यांत दिवाण साहेबांस कायद्याच्या कामांत समजून उमजून हेळसांड केल्या बद्दल दोष दिला. या नंतर हे बखेडे मोडून टाकण्या साठीं कर्नल मार्शल यांचें निशाण फडकलें असून या पासून कांहीं लाभ मिळाला नाहीं. हें ही उघड दिसून येत आहे. नेटिव संस्थान व त्यांतील नेटिव लोकांचे तंटे हे मिटण्या साठीं विल्हाइत युरोपियन कर्नल मार्शल यांस नेमिलें ही गोष्ट सरकारच्या धूर्ततेचें व निःपक्षपात वर्तनाचें मासलें वाईक उदाहरण आहे.

'चंचु प्रवेशो मुसल प्रवेशः' या न्यायानें आमच्या राजकर्त्यांची वागण्याची साधी व सोपी शैली सर्वांच्या नजरे पुढें असून ही यांनिचे निजाम सरकार व त्यांची गुजारी मंडळी डोळेझांक करितात ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट होय. एक महिन्यापूर्वी दुसरें ही असें कारण झालें कीं दिवाण साहेब आजारी पडले तेव्हां सर्जन साहेबांनीं सिलोनची एक सफर घेण्यास सांगितलें त्यावरून मोठ्या प्रयत्नानें त्यास बिन हक्काची रजा मिळाली व त्याप्रमाणें ते मुंबईस निघाले. दुसऱ्या स्टेशनावर राजवाड्यांत बोलाविलें आहे अशी तार आली व तशांत दुसरी एक तार आली कीं तत्काळ मुंबईस न आल्यास सिलोनची आगबोट चुकेल. अशा वेळेस सर सालरजंग प्रकृती लवकर सुधरावी म्हणून पुढें चालते झाले आणि मुंबईस थोडेसे बरें वाटल्या वरून सिलोनकडे न जातां हैद्राबादेत थोड्या दिवसांत परत आले. आजारी असल्यामुळें राजीनामा दाखल करणें भाग पडलें अशा मुद्यांत कांहींच तथ्यांश नसेल असें म्हणवत नाहीं तरी तेंच निव्वळ कारण असावें हें ही म्हणणें नीट शोभत नाहीं. हिंदुस्थान सरकार या बाबतींत पुढें काय करितें याजकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. अद्याप राजीनामा मंजूर झाला नाहीं. व तो स्वीकारला जाईल असें ही खात्रीनें सांगतां येत नाहीं. सरकारनीं दिवाणांचा राजीनामा कबूल केलातर पुढें कोण दिवाण होणार हें ही एक मोठें तूर्त गूढच आहे. दिवाणाच्या जागे करितां उमेदवार मंडळी बरीच आहेत या पैकीं कांहीं ठोकळ ठोकळ नांवें खालीं दिल्या प्रमाणें आहेत:—

१ मुनिर उलमुल्क, २ बशिर उद्दवला, ३ खुरशीदजहा, ४ सर टी माधवराव, ५ मि. दादाभाई नवरोजी, ६ आन. काजी शाबुद्दीन आणि ७ मि. पेस्तनजी महानगीर.

या पैकीं पहिले मुनिर उलमुल्क हे दिवाणांचे धाकटे बंधु आहेत व त्यास दिवाणगिरी मिळेल अशी लोकांत बोलवा

आहे व शेवटील चौघेजण गायकवाडच्या राज्यकारभारांत वरेंच प्रसिद्धीस आलेले आहेत.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ९ शके १८०९

हल्लीं पुण्यांतील प्रसिद्ध तंट्या भिल्ल याचा दरारा अलिकडे विशेष वसत चालला आहे. सरकार व लोक या दोघांना ही याने आतां जेरीस आणण्याचें मनावर घेतलें आहे असें दिसतें. या संबंधानें बंगाल्यांतील व मुंबईतील इंग्रजी-पत्रांत कांहीं पत्रें व लेख प्रसिद्ध झालें आहेत. त्यावरून समजतें हा गरीब गुरिबांस मुळींच त्रास देत नसून फक्त अधिकारी-वर्ग-त्याचा जुलूम यावरच त्याचें शस्त्र आहे असें कळतें. या स्वारीला पकडण्याचें काम सेंट्रल इंडियाचे एजंट सर लिपेल ग्रिफीन यांच्या ताब्यांत दिलें असून त्यांनीं नेमिलेले पोलिस अधिकारी त्याला पकडण्या करितां आपली शिकस्त करित आहेत. परंतु कांहीं चालत नाहीं. आमच्या वऱ्हाडांत यानें त्रास दिल्याचें पंदा ऐकण्यांत आलें नाहीं. तथापि आमच्या वऱ्हाड सरकारला मात्र अन्य रीतीनें यानें धोडासा धक्का दिला आहे. वऱ्हाडच्या गेल्या सालच्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टवरून कळतें कीं या स्वारीच्या भयामुळें मेळघाट पोलिसांत ६० लोक जास्ती ठेवावे लागले व प्रसंग आल्यास याच्याशी चांगला सामना करितां यावा म्हणून या लोकांना बंदुका तरवारी वगैरे हत्यारांची संख्या ही जास्त द्यावी लागली.

युरोपांत फ्रान्स व जर्मनी यांमध्यें धुमसत असलेला अग्नी आज भडकेल उद्यां भडकले अशी लोकांना धास्ती पडून गेली होती ती कांहीं कमी होते तों ऐरिश प्रकरण दिवसें दिवस जास्ती चेतत जाऊन आतां हल्लीं अगदीं निकरावर येऊन ठेपलें आहे. गेल्या आठवड्यांत तिकडील ज्या तारा आल्या आहेत त्या वरून असा सुमार दिसतो आहे कीं इंग्रज सरकार ऐरिश लोकांना वळणीस आणण्या करितां जुलमाचा कायदाच लागू करणार. इंग्लंडांत हल्लीं सत्ताधारी मंडळी आहे ती कॉन्झर्वेटिव्हज्‌ व पार्नेलाइट्स यांच्या म्हणण्या कडे मुळींच लक्ष देत नाहीं. ऐरिश लोक मुकाट्यानें स्वस्थ झाले तर बरें नाहीं तर "कोअर्शन बिल" म्हणजे त्यांना जुलमानें वळणीस आणण्याचा कायदा पास करून तो तेथें लागू करण्याचा या मंडळीचा निश्चय झालासा दिसतो. हा कायदा काय आहे हें पूर्णपणें अद्याप समजलें नाहीं तथापि या पैकीं कांहीं लोकांचीं याच विषया संबंधानें टाइम्स वगैरे पत्रांत जीं पत्रें प्रसिद्ध होत आहेत त्यां वरून या कायद्याचें स्वरूप फार भयंकर आहे असें दिसतें. या कायद्यानें आयरलंड मधील न्याशनललीग म्हणजे राष्ट्रीय सभा बंद होणार, हेबियस कार्पसचा कायदा त्या देशांत रद्द करणार, पंचाइतीनें अपराधाची चौकशी करणें बंद होणार, व लष्करी कायदा फुकारून ऐरिश लोकांची दाणादाण करून त्यांचे पुढारी लोक कैद करून टाकणार. इनिस्मध्यें प्रसिद्धीत आलेले लार्ड वूलसली याना पूर्ण अधिकार देऊन मनास वाटेल त्या रितीनें मारझोड करण्यास व सर्व शांतता करण्यास तिकडे पाठविणार. व इतके सर्व झालें म्हणजे मागाहून सामोपचार सुरू होणार. तिकडील टाइम्स वगैरे कान्सर्व्हेटीव पक्षाचीं पत्रें या गोष्टी अमलांत आणण्या विषयीं सरकारास सुचवीत आहेत. इकडे उलट पक्षाचें प्रयत्न आपल्या तर्फेनें चाललेच आहेत. हा कायदा पास न होऊं देण्या साठीं जागोजाग राक्षसी सभा भरत आहेत. नुकत्या गेल्या आठवड्यांत हाईडपार्क वगैरे ठिकाणीं हजारों लोक जमून अशा सभा झाल्या व त्यांत मोठमोठ्या वक्त्यांचीं भाषणें ही झालींत. एकंदरींत हें प्रकरण कांहीं तरी गडबड किंवा चकमक झडल्या शिवाय मिटत नाहीं असें दिसतें. इंग्लंडांतील लोक या संबंधानें इतके हट्टास पेटले आहेत व प्रधान मंडळ ही ऐरलंडमध्यें इतकी गडबड असतां ही इतके धाष्टर्य दाखवीत आहे तेव्हां त्याच्या आंगीं सत्ता ही तशीच असली पाहिजे. केवळ विरुद्ध पेक्षापेक्षां आपली संख्या अधीक आहे यावर जातां कामा नये. काय होतें पहावें.

अकोल्यांत हिंदुलोकाचे स्मशानभूमींत ऊन, वारा, पाऊस, यांपासून संरक्षण व्हावे म्हणून नदीच्या दोन बाजूस शहर आणि पेठेतील लोकांच्या उपयोगाकरितां नि ऱ्याची एकएक लाहानशी इमारत बांधण्याचे पुष्कळ दिवसापासून घाटत आहे. हे बहुतेक सर्व लोकास माहीत आहे एका सद्‌गृहस्थाचे खटपटीनें सुमारें च्यारशे ४०० रुपये रोख वर्गणीही जमली आहे असें समजतें एकंदर खर्च हजार रुपये पर्यंत लागेल असा अंदाजा आहे साहाशे रुपये पर्यंत वर्गणीचे आकडे सावकार मंडळींत जमले आहेत असें ही समजतें असें असतां अजून पर्यंत काम सुरू नाहीं हे बरे नाहीं शोधा अंतीं असें समजतें कीं ज्यांच्या खटपटीने सावकार लोकांत वर्गणीचे आकडे पडले त्यांनीच ते वसूल केल्या शिवाय पैसे हातीं येण्याची आशा नाहीं व ते गृहस्थ ( आमचे अकोल्याचे लोकप्रिय व्हाइस प्रेसिडेन्ट होत ) या कामी ढीलाई करीत आहेत याचा आम्हास फार खेद वाटतो अशा लोकहिताच्या गोष्टी होणें किती आवश्य आहे हे आम्हास निराळे सांगणे नको.

ज्या गृहस्थानीं रोख पैसे वसूल केले त्यांस पुढें व्यवस्था करण्यास सवड व साधन नसल्यामुळें अकोल्यांतील पुढारी मंडळीस हें काम हातीं घेण्याविषयीं आमचे ता २१-३चे एक तप्रार्थना केली आहे तिकडे कोणी ही लक्ष दिलें नाहीं हे अकोल्याचे तरतरीत लोकास भुषणास्पद नाहीं असें कोणास ही वाटल्यावांचून राहणार नाहीं.

या कामीं अमुक मुदतीचे आंत कोणी पुढें येणार नाहीं तर वसूल केलेले पैसे ज्यांचे त्यांस परत देणें भाग पडेल असें प्रकारचा मजकूर त्या प्रार्थनेंत होता असें असून ही आज पर्यंत अकोल्याचे लोकांनीं तत्संबधानें जो बहीरता दाखविली त्या वरून ही गोष्ट सोडून द्यावी म्हणजे ज्याचे त्यांस पैसे परत द्यावे असा त्यांचा हेतु आहे अशी सहज रीतीनें कल्पना होते.

कसें ही असो चाललेला प्रकार शोचनीय आहे याज करितां आम्ही येथील लोकांस सविनय प्रार्थना करितों कीं त्यांनीं असें उच्छाहशुन्यत्व दाखवूं नये व आरंभ केलेलें काम तडीस न्यावें. मुनिसिपाल कमेटीनें या कामीं हात देणें अवश्य आहे व ती देण्यास काचकुच करिते असें खासगी परंतु विशेष मीट आधारें समजतें. असें करण्यांत भकडपणा अथावा दुसरा कांहीं असें प्रकारचा कारण संबंध असावा असें वाटतें कोणते ही जातीच्या हिताची असेल तरी तिला कमेटी अथवा सरकार याणी मदत करणें अयोग्य नाहीं. कोणत्याही सार्वजनिक कामास लागणारा निमा खर्च लोकांनीं वर्गणीनें दिला तर सरकार देखील दुसरा निमा भाग देते मग आमचेच पैसे असतां कमेटी ते देण्यास का मागें सरते हें समजत नाहीं.

कोणत्या तरी रीतीनें हें काम पुरें करावें असें पुन्हा एकदां सांगून हा लेख पुरा करितों.

## The Berar Samachar

MONDAY MAY 2 1887

The two Berar High Schools and the Training College and the A. V. Schools have closed for the summer vacation from the 26th ultimo and the 1st instant respectively, and will open on the 10th and the 1st proximo. On the 25th ultimo the annual prizes were distributed in the Akola High School by Mr. Hari Ramchandra officiating Headmaster Mr. Gopal Ramchandra the officiating 1st assistant opened the proceedings with a short speech in which he dwelt on the result of the annual examination and declared the names of prizemen in different subjects. On this the Headmaster distributed the prizes and at the end gave to the students a kind and parting advice in which he vividly impressed on their minds the responsibility that lies on them of discharging satisfactorily their duties in their several capacities as students, sons, citizans and lea lers of future generation towards their teachers, elders and to the public in general. He also pointed out to them the hard race of competition they have to run in which they should try their best to carry off the palm and that the only secret of all this was perseverence and devotion to study. At the close he dwelt on the absolute necessity of physical exercises.

Major Thomson came here during the last week and took charge of the civil work from the Deputy Commissioner. But it is heard that he is ordered to relieve Colonel Bullock who is to go on three month's leave from the 11th instant. As during the interval, he shall have done very little work, the opening of the Sessions Court at Akola is as yet merely nominal.

We are verry sorry to announce the accidental and untimely death of a foreman at the Railway Station here which took place on the 29th. The deceased, who was a young man of twenty, suffered for some time from symptoms similar to those of cholera, but on enquiry it is assertained that some other causes brought on the painful accident.

(Continued from our last Issue.)

Do not expect the impossible.

But it would be contrary to human nature itself to expect that the British nation should undertake the heavy duty and responsibility of governing and defending India without any advantage whatever to itself. That some advantage should accrue to the British nation by way of compensation is only natural and legitimate. Try to set due limits to that advantage, but it would be irrational to abolish it altogether. It would be impossible to deny all advantage to England for governing India. But were it possible, it would be undesirable in a high degree. Why so? Because if England got no advantage by governing, England would say of India what Prince Bismarck said of Bulgaria, namely, "I do not care what becomes of it, or who rules it."

India cannot be independent

Every one who is not a visionary, and who has paid any attention to the condition of the world as it is, must feel convinced that India cannot, for a long time to come, be a self-governed and independent country. Her only chance of life, re-invigoration, progress and prosperiety, lies in her being under the wings of some strong, just and generous power. And what power better than England? Without powerful patronage and protection, India, weak and facinating, would be exposed to the lawless violence of any Imperial dacoit! Educated men should pond over these truths deeply and well.

Associations.

As associased efforts are more productive of good than isolated or individual ones, educated men have properly established various societies or combinations all over the presidency. This is a prominent and praiseworthy feature of the times. As an important consequence a new and unprecedented interest had been awakened in public affairs, which are now better known and more extensively discussed and judged tending to the formation of a sound public opinion which is so potent and salutary a force in the modern world. These associations may do useful work in various directions. As regards the great body of the people, they may disseminate useful general information; they may promote political education; they may correct or dispel errors and delusions; they may promote various reforms; they may make known local wants and wishes; they may afford advice and guidence. As regards the Government they may make themselves still more useful; they may vigilantly watch the action [illegible]

at all times and in all places, in view to wholesome criticism. The idea of the Indian Government is happily very high. But to keep it on a level with its own ideal, vigilant criticism is very necessary. The ideals have a natural tendency to decline. The Indian Government is very liable to errors or lapses. It does not sufficiently understand the religion, habits and feelings of the subject population. It is apt to become high-handed owing to its vast superiority over the subject peoples. The people are extremely divided and weak. The Home Government is far away. There is temptation to prefer English to Indian interests. The European officers of Government are birds of passage without permanent interest or sympathy in India. There is temptation to over look their faults and shortcomings, few as they may be. There is temptation to favour the stronger races of India at the expense of the weaker ones. There is temptation to treat foreign settlers in some respect with excessive indulgence. There is temptation to prefer foreigners to natives for public employments. Such are some of the reasons which call for and justify watchfulness and criticism. One of the noblest characteristics of the British Government is that it permits, tolerates, and even welcomes such criticism. Such criticism sometimes actually strengthens the Indian Government in the performance of its difficult and sacred duties. Special care should be taken that the facts criticised are correct, and are not exaggerated, and that the criticism itself is just and moderate.

Let three F's characterise the criticism, it should be Free, Fair and Fearless.

But associations should support Government as well criticise it as occasions arise. There must naturally be more occasions to support than to criticise. Government has a right to expect from educated men the most sincere and sympathetic support as well as free and fearless criticism. Peace and order being vitally essential to civilised existence, progress and prosperity, nothing should be done by word or deed which may have any tendency to disturb public peace or order. Nothing should be done which may have a tendency, present or future to weaken those invaluable habits of obedience to the law which the vast community of India has happily inherited. If the uneducated masses misunderstand Government in any particular, the associations should be prompt and eager to set them right. The associations should recognise it as an imperative duty to vindicate the ways of an honest Government to the millions of its subjects. If these are aggrieved in any respect, the associations will act as their faithful interpreters or advocates. The associations should avoid causing any embarrassments to Government by inopportune, impractical or difficult proposals. They should avoid the reality and even the appearance of a mistrustful or militant spirit. They should afford the ruling power every reason to regard them as co-efficient agencies alike in trouble and tranquillity. Besides such duties, the associations have to deal with large questi[illegible] For instance, I think the people of India must press for examinations being held in India for appointments to the Civil Service. In every respect it is a matter of justice and good policy. To insist upon the youth of India proceeding to England and staying there and passing would, in effect, be to place a number of barriers in their way to prevent or greatly check their entrance into the Covenanted Service. Just see what the barriers are. They are, the great expense involved which many cannot afford; great inconvenience; withdrawl from friends, guardians and natural well-wishers; risk of youth going astray; risk as to health; great loss of time; difficulty of competing with Englishmen in their own language and on their own ground; risk of eventual failure; loss of touch with his own country and people; probable impairment of social status; a certain amount of denationalisation. These barriers would be insuperable to most classes and particularly to the Brahmin community, which has, from time immemorial, and though successive dominations maintained intellectual and moral ascendency and social influence in India. The difficulties would be felt also by a considerable proportion of the landed and moneyed aristocracy.

(To be continued.)

## पांच

खामगांवकर त्रस्त झालेला ग्रामस्थ आपल्या पत्रांत असे म्हणतो कीं " मलकापूर तालुक्यातून मणावेमण अफु चोरीची येते. व विकली जाते. व आठवडे बाजारांतील कर वसुल करण्याचें कामांत बरीच मोगलाई होते. वगैरे " खरें असल्यास योग्य आधिकारी चौकशी करितलि अशी आम्ही शिफारस करतो.

## वऱ्हाड.

हवामान: ह्या आठवड्यांत उष्णतेचे मान फारच वाढलें आहे. पारा १०७ अंशावर आहे.

आम्हास कळविण्यास अतिशय दुःख वाटतें कीं येथलि स्टेशनावरील भार्गव कृष्ण टिळक या नांवाचे फोरमन यांस तारिख २९ रोजीं अकस्मात देवआज्ञा झाली. सदर्हु दिवशीं त्यांस कांहीं तासपावेतों केवळ काल्ऱ्याप्रमाणें ढाळ व उलट्या झाल्या. परतु एकंदर चिन्हांवरुन व माहितीवरुन कळून आलें कीं तो कालरा नसून त्यांनीं ढाळक घेतला होता व ह्या नंतर पुष्कळ वेळ उन्हांत काम केल ह्या मुळें उन्हाचा तडाका लागून तो अखेरीस प्राणावरच येऊन बितला हा इश्वरी अवकृपाच समजली पाहिजे. सदर्हु गृहस्थ दामोदर कृष्ण टिळक यांचे बंधु होते त्यांचे अकालिक मरणामुळें त्यांस व त्यांचे वृद्ध मातोश्रीस किती दुःख झालें असेल याची कल्पना देखील करणें कठीण.

मे० कर्नल थॉमसन ज्युडिशल अ० पश्चिम वऱ्हाड हे येथें येऊन त्यांनीं दिवाणी मुकदम्याचे कामास ही सुरवात केली परंतु हे लवकरच उमरावतीस मे० बुलक साहेब यांचे जागेवर तीन महिने डिपुटी कमिशनरचें काम पाहण्यास जातील.

ज्यु० अ० यांस कांहीं नवीन एस्टॅब्लिशमेंट देण्याविषयीं घाटत आहे.

मे० कर्नल बुलक हे ता० ११ चे सुमारास तीन महिन्याचे रजेवर विलायतेस जाणार आहेत.

मे० ग्रांट साहेब डे० क० आकोला यांस लेफटेनंट कर्नलचे कर्नल केले असें समजतें.

येथील डेपुटी कमिशनरचे ऑफीसातील कारकून मि० नरसोपंत हे हैद्राबादेस गेल्यामुळें त्यांचा येथील ९० रुपयांचे जागेवर मि. माधव रामचंद्र जळगांव दिवाणी कोर्टांतील हेड कारकून यांस व त्यांचे ३९ रुपयाचे जागेवर भिकाजी दाजी यांस व त्यांचे ३० रुपयाचे जागेवर भवानराव मुनसरीम आकोट यांस व त्यांचे २९ रुपयाचे जागेवर लक्ष्मण गोपाळ देशपांडे अडगांवकर यांस नेमिले ही नेमणूक करतांना डे० क० सा० यांनीं जुने अनुभवशीर, हुशार व हक्कदार कारकुन मि० नारायण सखाराम याचा हक्कांचा विचार केला नाहीं पूर्वीच्या नेमणुकीच्या वेळी मुसलमान लोकांची पाळी झाली. ह्यावेळी ब्राह्मण लोकांचा फायदा झाला पुढाल वेळीं दुसरे लोकांची पाळी येईल असें दिसतें.

मि० व्यंकटेश कृष्ण देसाई येथलि आकॉट आफिसांतलि थर्ड क्लार्क यांस एलिचपूरचे अकॉंट आफिसात १०० रुपयावर सेकंड क्लार्क नेमणार हे कळविण्यास आम्हास फार संतोष वाटतो.

मि. फ्रानसिस यांची येथील सेकंड क्लार्कचे जागीं नेमणूक आकस्मात झाल्यामुळें मि. देसाई यांचा हक्क येथें फुकट मारला गेला होता. असो आतां मि० देसाई हे एलिचपूरास गेल्या नंतर त्यांचे खालीं होणाऱ्या जागेवर आमचे दयाळु डि० क० ले० कर्नल ग्रांट साहेब आतां तरी अगदीं बाहेरचा मनुष्य न आणतां ऑफिसांतलि लोकांचे खरे हक्क पाहून यांस बढती देतील अशी आशा आहे.

मे० शापुरजी बिरजी तासिलदार खामगांव हे रजेवर गेल्या मुळें रा० रा० शंकरराव रामचंद्र क्लार्क आफ दी कोर्ट स्मालकाजचे यांस त्यांचे जागीं आक्टिंग तहसिलदार नेमिले व त्यांनीं गेल्या आठवड्यां चार्ज घेतला.

मागाहून आलेली नोटीस.

जोडशा बीन दादा शेट सोनार चांदुरीकर हल्लीं राहणार अकोले यांस

खालीं सहीकरणार याजकडुन नोटीस देण्यात येते कीं आमचे आजोबा दादा शेट मयत होऊन आज सुमारे दोन वर्षे झाली आमचा सर्व जीनगी रुपये १००० ची स्थावर व जंगम वगैरेची वाटणी होणे बद्दल आज पावेतों बहूतवेळां आपल्यास कळविले परंतु आपण कांहीं एक निकाल केला नाही. म्हणुन तुम्हांस असे कळवीतो कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत सर्व निकाल करावा नाहींतर रितीप्रमाणें काम चालून आखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें सर्व भरुन घेतले जाईल कळावे तारीख १ माहे मे सन १८८७ ईसवी.

सही.

धोंडु बापूजी सोनार चांदुरीकर [illegible]

हल्ली मुकाम अकोले दस्तुर खुद.

सही गोपाळबापु सोनार दस्तुर खुद.

## वर्तमानसार.

गोहत्या ही किती प्रचंड नुकसानाची बाब आहे पहा. त्यांचें दुध प्राणीमात्रांस फार अवश्य आहे. तसेंच शेतीस त्यांचे शेणाचा फार उपयोग होतो. त्यांची संतति जे बैल त्यांच्यावर तर आमची शेती सर्वांशीं अवलंबून आहे. गाड्या ओढण्यास व ओझीं वाहण्यासही त्यांचा उपयोग आहे. दुधाची कमतरता झाल्यामुळे लोक दिवसेंदिवस निस्तेज होत चाल्ले आहेत. मनुष्यांनाच दुध पुरें नाहीं तेव्हां लहान गोऱ्ह्यांना तें काठून मिळणार. त्यांचे निर्वाहाची अशी अनास्था तेव्हां शेती सारखीं महत कष्टाचीं कामे तीं चांगलीं कोठून व्हावीं? असो. ४० रुपये किंमतीची एक जवान गाय मारिली तर तिचें मांस ३०० मनुष्यांस पुरते. आतां तीच गाय राखिली असती तर काय फायदा होता तो पाहूं. १२ वर्षे ती दुध देत गेली व रोजीं पांच शेर प्रमाणें तें दुध धरिलें, तर त्या काळांत १४० मण दुध निघेल. कल्पना करूं कीं त्या एके गाईस ६ कालवडी व ६ गोऱ्हे झाले. या ६ गाई पासून दुसऱ्या पिढीला ३२४० मण दुध निघेल. व त्यांच्या पासून ३६ बैल व ३६ गाई अशी उत्पत्ति होईल. व दुधाचा आकार १९४४० मण होईल. या तिन्ही पिढ्यांपासून एकंदर ९८०५० रुपये किंमतीची नुसती दुधाची प्राप्ती. या शिवाय ४२ बैल व ४२ गाई संग्रही राहतील या २१ जोड्या बैलांचे श्रमापासून दरसाल ४२०० मण धान्य कमावतां येईल. यांचे मेहनतीचा काळ १० वर्षे धरिला तर ४२००० मण धान्याचा आकार होतो. प्रत्येक मणास श्रमा बद्दल एक रुपय धरला तर ४२००० रुपये होतात. तेव्हां तीन पिढ्या पासून एकंदर उत्पन्नाची बाब रुपये १,००,०५० दुध व धान्य मिळून होते. आतां २ शेर दुध व १ शेर धान्य प्रती माणसास प्रति दिवशीं दिलें तर २१,४४,४०० मनुष्यांचा येथेच्छ निर्वाह या गाई पासून होऊ शकतो आतां पोट जाळण्या साठी १०००० गाई दरसाल हिंदुस्थानांत कापल्या असें धरिलें तर तीन पिढ्यांत दुध व धान्य मिळून ह्या देशाचे नुकसान रुपये ५,००,२५०-०,००० (पाच अब्ज पंचवीस लक्ष) होते? कत्तल केलेल्या गाई पासून होणारे हें वरील नुकसान हें फक्त एक साधें आहे. राज्यसत्ता परहातीं गेली आहे. व दयाभूतपणा हा आमच्यांतला नष्ट झालाच आहे. पण हें प्रचंड नुकसान पाहूनतरी लोकांनीं सावध होऊन कांहीं खटपट करावी. पूर्वी पेशवाईत नुसतें गाईवर ओझें दखील वाहूं देत नसत मग कत्तलीची गोष्ट कशाला येवढा बादशहा अकबर यानें सुद्धां सुज्ञ बिरबलाचे सांगण्यावरुन आपले सर्व राज्यांत गोहत्या अगदीं बंद केली होती. पण प्रसंगे न्यायी परम दयाळु सरकार इंग्रेज हे पक्ष पुरविणार?

— अफगाणच्या अमिरानें होटाक येथील गिलझी बंडखोर लोकांवर हल्ला करण्यासाठीं शिपाई पाठविले ते मार्गे हटून तळ देऊन राहिले आहेत. व त्यांस बंडखोर लोकांनीं वेढा दिला आहे असें ह्मणतात.

— युरोपांत कार्डोव्हा प्रांतांत अशी विलक्षण महामारीची साथ उद्भवली आहे कीं एका गाडींत जितकी प्रेतें मावतील तितकी भरून नेतात नेऊन नदी माती उकरून आंत तीं सर्व प्रेतें टाकून त्यावर थोडी माती लोटून लागलेच निघून जातात व जिवेंकांत मरण्यापूर्वीच पुरण्याने मार्गी नेऊन ठेवितात असें ह्मणतात.

— मणीपूरपासून कोहिमा मधून मांडले पर्यंत तारायंत्र सुरू झाल्याचें समजतें.

— जो कोणी एतद्देशीय कारागीर आपली शोधक बुद्धी व कौशल्य खर्चून एखादा उत्तम पदार्थ करील त्यास चांगले इनाम देण्याविषयीं म्हैसूर सरकार विचार करित आहे असें म्हणतात.

— न्यूयार्क पासून लिव्हरपूल येथें थोडे सामान घेऊन चार दिवसांत पोहचेल अशी एक आगबोट तयार करण्याचा अमेरिकन लोक प्रयत्न करीत आहेत.

— शिंदे सरकार इंग्रज सरकारास ४ टक्के व्याजानें साडेतीन कोटी रुपये कर्जाऊ देणार यामुळें शिंदे सरकारचें १०,००,००० उत्पन्न वाढेल असें ह्मणतात.

— जपानांत साहाशिटा नांवाच्या एका कागद करणारानें पारदर्शक कागद करण्याची एक युक्ति काढली आहे हा कागद लवचीक व मजबुत असल्यामुळें कांचेच्या ऐवजी याचा उपयोग करणें विशेष सोयकर आहे असें ह्मणतात.

— पेशावर येथें एक रुपयास आठ शेर गहू व सात शेर कणीक विकू लागली आहे.

— अमेरिकेंत २००० पट मोठा पदार्थ दिसणारी एक दुर्बीण तयार केली आहे तींतून चंद्रावरील कित्येक पर्वतांच्या टेकड्या स्पष्ट दिसत आहेत.

— सदर्न मराठा रेल्वेच्या कोरेगांवपासून मिरजेपर्यंतच्या रस्त्याच्या फाट्यानें सामान व माल नेण्या आणण्या साठीं गाड्या जाऊं येऊं लागतील असें ह्मणतात.

सु० प०

असें कळतें कीं जोतपूरचे मुख्य दिवाण महाराज प्रतापसिंग, हे प्रिन्स आफ वेल्सचें मुद्दाम अमंत्रण आल्यामुळें, विलायतेला गेले आहेत. अमदाबादच्या निकटाव स्येथ्या वेळीं श्री मौल्यवान लूट सांपडली, व अकबर बादशाह, आलमगीर, जहांगीर व औरंगजेब बादशाह, यांनीं निरनिराळे वेळीं जे हिरे अजीतसिंगाला नजर केले होते ते सर्व बरोबर घेऊन हे राजश्री तिकडे गेले आहेत, असें ही कळतें. ह्या सर्व मालाची किंमत वीस लक्ष रुपये आहे.

मुंबईंत तयार होणाऱ्या कापडाचा खप होण्या साठीं नवे बाजार शोधण्या करितां मुंबईच्या गि[illegible]या मालकांच्या सभेचा प्रक[illegible]ग[illegible] आहे, आफ्रिकेंतील [illegible] मा[illegible] प्रयत्न सुफळ झाला आहे असें ह्मणतात.

सु० सू०

अमृत बझार पत्रिकेचे जाइन्ट एडिटर मि. बाबू मोतीलाल घोस यांनीं पब्लिक सर्व्हिस कामिशनच्या सब कमिटीपुढें जी जबानी दिली तींत पोष्ट खात्यांतील नोकरी संबंधानें फार महत्वाची माहिती दिली आहे. मिस्तर बाबू मोतीलाल घोस यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं पोष्ट खात्यांत युरोपियन अम्मलदार थोड्या पगाराच्या नोकरी वरून थोड्याच वर्षांत पुष्कळ मोठ्या हुद्यांच्या जागेवर गेलेले आहेत. मिस्तर बाबूलाल घोस यांनीं दाखविलें आहे कीं पोष्टांतील कांहीं युरोपियन अम्मलदार ३०—४० रुपयांच्या नोकरी वरून जलदच चढतां चढतां एकदम थोड्या काळांत त्यांच्या पेक्षां जुन्या व हुशार व त्यांच्या पेक्षां ज्यास्ती पास झालेल्या ज्यास्ती पगारांवरच्या नेटिव्ह अम्मलदारांस मागें टाकून, मोठ्या पगारांच्या जागांवर जाऊन धडकले आहेत. परंतु नेटिव्हांच्या संबंधानें पाहिलें ह्मणजे असें दिसून येतें कीं ते कितीही परीक्षा पास झालेले असोत, व ते किती ही दक्षतेनें काम करणारे असोत ते किती जरी वर्षे त्या खात्यांत असले तरी त्यांस बढती मिळावयाची नाहीं. मि० बाबू मोतीलाल घोस यांनीं सात आठ अशीं उदाहरणें दाखविली आहेत कांहीं नेटिव्ह लोक चांगले हुशार, दक्षतेनें काम करणार असून आज तीस तीस चाळीस चाळीस वर्षे पोष्ट खात्यांत फुकट लहान पगारावर पडले आहेत. त्यांच्या मागून आलेले, त्यांच्याहून कमी हुषार असे पुष्कळ युरोपियन लोक हल्लीं मोठ्या पगारावर चैन मारीत आहेत. ह्या लोकांची मोठी शिफारस ह्मणजे ते युरोप देशांत जन्मले आहेत आणि मोठ्या हुद्याच्या कामास अवश्य लागणारे गुण अंगीं असलेले नेटिव्ह लोक बिचारे कोन्यांत रखडत आहेत- कां तर ते हिंदुस्थानांत जन्मले आहेत दुसरें कांहीं नाहीं. कधीच अंदाधुंदी जर एखाद्या बड्या नेटिव्ह अंमलदाराच्या हातून झाली असती तर या आंग्लो इंडियनांनीं आकाश पाताळ एक करून सोडलें असतें इतकेंच नाहीं तर एखादा रेझोल्यूशन निघून त्या अंमलदाराला त्याचें प्रायश्चित्त केव्हांच मिळालें असतें. मागें नुकत्या एकाया वरून एका बड्या मेजिस्ट्रेटास पेनशन द्यावें लागलें हें सर्वांस मशहूर आहेत. तेथील पोष्ट खात्या संबंधीं हकीकत ज्या रेकॉर्ड बाबू मोतीलाल घोस यांनीं आपल्या जबानींत सांगितली आहे ते वेळेस बंगालचे पोष्ट मास्तर मि. किंच साहेब हें त्यांची उलट तपासणी करण्या करितां व त्यांस खोटें पाडण्या करितां तेथें आले होते. परंतु त्यांनीं प्रसंगीं मौन स्वीकारण्याचें शहाणपण आपल्या अंगीं आहे असें दाखविलें. कारण त्यांची पक्की खात्री झाली कीं मिस्तर बाबू मोतीलाल घोस यांनीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या इतक्या ढळढळीत होत्या कीं कोणतें ही प्रकारें त्यामध्यें कोणत्याही प्रकारचा खोडसाळपणा दाखवितां येण्या सारखा नव्हता, ही माहिती शोधून काढून त[illegible] स्पष्टपणें निस्पृहतेनें कमिशन पुढें दिली याबद्दल सर्व हिंदुस्थान देशांतील लोकांनीं मि. बाबू मोतीलाल घोस यांचे आभार मानिले पाहिजेत. ही वर दिलेली पोष्ट खात्यांतील हकीगत ह्मणजे अपवादा दाखल आहे असें नाहीं. तर अशी स्थिती प्रत्येक खात्यांत आढळून येईल. इतर सर्व खात्यांविषयीं पोष्ट खात्यांत नेटिवांवरच विशेष गिरकाव आहे असें असून जर तेथें ही स्थिती दृष्टीस पडते तर जकू, जंगल, मीठ, सर्वे, टेलिग्राफ, पब्लिक वर्क्स, पोलिस इत्यादि दुसऱ्या अनेक खात्यांत काय स्थिति असेल याचा विचारच करावयाला नको.

सरदार दिलारखान जुबिलीच्या समारंभा करितां निजामाचे प्रतिनिधी ह्मणून इंग्लंडांत जावयाचे आहेत. त्यावेळीं मागें निजाम सरकारनीं कंपनी कडून जें कर्ज खातें घेतलीं तीं किती टक्यांनीं द्यावयाचीं याचा बोर्ड आफ डायरेक्टर्स बरोबर बोलणें लावून निकाल करून टाकणार. सरकार तीं १९ किंवा २० टक्यांनीं घेऊं ह्मणतें. परंतु आपली पूर्ण किंमत घेणार ह्या भानगडींचा पत्रोपत्रीं सलगडा पडत नाहीं तेव्हां समक्ष भेट घेऊन एकदांचा निकाल करावा असा बेत दिसतो.

सैबिरिया देशांत विद्वान लोक अगदींच कमी आहेत. शिकण्या करितां ह्मणून जे लोक बाहेर देशीं जातात ते फिरून येतच नाहींत. हुषार लोक नसल्या मुळें सरकारी जबाबदारीचीं कामें करण्यास लायक लोक सांपडत नाहींत. प्रांत अफाट, लोकवस्ति दाट, आजार जारी, आणि औषधें देण्यास तरी वैद्य एकच. अशी कांहीं ठिकाणीं स्थिती आहे सैबिरयांतले जे लोक नोकरी पत करतात त्यांस पगार फार द्यावे लागतात. परंतु तितके पगार द्यावयास वसूल जमावंदी अपुरती पडली १८८० एक युनिव्हरसिटीची इमारत तयार झाली आहे, उत्तेजनार्थ स्कालरशिपा ठेवल्या आहेत, विद्यार्थी येऊं ह्मणतात, परंतु इमारत बंदच ठेविली आहे. अशी स्थिती येण्यास तेथील धर्माधिकारी कारण होत असें समजतें.

टिकिटाचीं कव्हरें व पोष्ट कार्डें यापासून लोकांस फार उपयोग होतो व त्यांचा खप ही पुष्कळ होतो. तरी त्याचप्रमाणें वर्तमानपत्रें गुंडाळण्या करितां टिकिटाचे कागद सरकार कां काढीत नाहीं. त्यां पासून वर्तमानपत्र वाल्यांना व इतर लोकांना फायदा होणार नाहीं कां? अशा अर्थाचें एकानें टाईम्सला पत्र लिहिलें आहे.

गं० ओ०

अफगाणिस्थानांतील गिलझी लोकांचा दंगा अमीरास दुःसह झाला आहे. काबूलच्या अमीर अबदुल रहिमतखान याचा कमांडर इन्चीफ गुलाम हैदरखान हा मारला अशी जी गप्प उठली होती ती गप्प असून त्याला मारला ही गोष्ट खरी आहे. अमिराचे कांहीं लोक पैसा वसूल करण्यास गेले असतां त्यांवर या लोकांनीं हल्ला केला. त्याच बंडखोरांनीं मारक येथील गव्हरनरास ठार मारून २०० लोकास पकडलें. शिवाय सालर व त्याचे ९०० लोक यांस बंडखोरांनी पराजित केलें. गिलझी लोकांचा दंगा अजून पूर्ण झाला असून अमिराचे जर पराभव झाले असतां अमिरास थोडेच दिवस राज्य पद भोगण्यास मिळेल. अशा वेळीं अमिरानें लवकर सावध होऊन या लोकांचा जराव जमाव झाला नाहीं तोंच त्यांचा नाश करावें हें बरें. माजी अमिराचा पुतण्या नूर महमद खान हा पळून गेला असून तो या गिलझि लोकांच्या मदतीनें काबूलची गादी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

रेल्वेंतील प्रवास जितका सुखकर होईल तितका चांगलाच. मुंबइहून हैदराबादेस जाणाऱ्या बडोदा लाइनच्या प्रत्येक गाडींत उतारू करतां बर्फ वगैरेचा पुरवठा होण्या करतां दोन डबे अगदीं निराळे ठेवलेले असतात.

पार्शी साक्षीदारांस त्यांच्या धर्मपुस्तकावर हात ठेवण्यास सांगून इंग्रजी रीतीप्रमाणे शपथ द्यावी व त्यांच्याकडून मनस्नी, गवास्नी व कनस्नी हे शब्द उच्चारवावे असे हायकोर्टानें ठरविलें आहे

गामठ्यावरील इन्कमटाक्स बंदकरा ह्मणून महू येथील लोकांचीएक सभा भरली होती. इन्कमटाक्स बंद करण्याविषयीं हिंदुस्थानसरकारास विनंती करण्याकरितां त्याच सभेंत एक डेप्युटेशनही नेमण्यांत आलें.

रंगून येथें ता. १९ रोजी मोठी आग लागून अर्धे शहर जळून फस्त झालें.

आफ्रिकेंतील लोकांस दारूच्या इंग्रजी व्यापाऱ्यांनीं अतिशय दारूबाज केलें आहे. कांहीं कांहीं जागीं मुलांच्या व मुलींच्या मजुरीसाठीं दारूच द्यावी लागते. सकाळीं थोडे काम झाल्यावर मजूर लोक दारूनें इतके बेशुद्ध होतात कीं पुन्हा कामावर येतच नाहींत. ह्या दशेतून दारूच्या इंग्रज व्यापाऱ्यास हाकून द्यावे ह्मणजे तरी हे लोक आपला व्यापार सोडतील असें एका पुस्तकांत लिहिलें आहे.

पुण्याच्या कापडाच्या गिरणीच्या भागीदारांची जनरल सभा ता. १० रोजी भरणार आहे. ही सभा सरदार खानब. पदमजी पेस्तनजी यांच्या दिवाणखान्यांत भरेल गिरणींतील सर्व यंत्रें चांगली लवकरच असून ती मे महिन्यांत उघडण्यांत येईल. मुंबईचे गव्हरनर लार्ड री यांच्या परवानगीनें ह्या गिरणीस लार्ड रीयेल असें नांव देण्याचें ठरलें आहे.

ज्या सावकारांनीं हिंदुस्थानसरकारास ४ टक्यानें कर्ज दिलें आहे व कर्ज जें १८८८ त परत द्यावयांत येईल असा करार आहे, तें कर्ज सावकारांची इच्छा असल्यास ३॥ टक्यानें १९३१ त परत देण्यांत येईल असा हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरींनी ठराव केला आहे.

रंगून येथून कांहीं फौज मद्रासेस येऊन दाखल झाली.

ब्रह्मदेशांत अजूनही कांहीं कांहीं बारीक चकमकी घडतात.

ठा० भ०

☞ हें पत्र आकोला येथें कै० रा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं [illegible] असें [illegible]
[illegible] करणें अवश्य [illegible]

साहमाही " , डाकहशील ८ ८
डाक मलेर " ७ " " ८८
किरकोळ अंकास............... १८८ ४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ८ १ ८६
दुसरे खेपेस .........८ १

Per annum in arrears 7 " 12.8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4as

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 9 MAY 1887 NO 18

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ९ माहे मे सन १८८७ इ० अंक १८

## जाहीरात.

### उपनिषदांचा मराठी अर्थ.

ऋग्वेदाच्या शाखा २१ आहेत. यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० शाखा आहेत याप्रमाणें चारवेदांच्या मिळून ११८० शाखा आहेत. प्रत्येक शाखेचें एकेक उपनिषद आहे, याप्रमाणें ११८० उपनिषदें आहेत त्यांतून मुख्य मुख्य अशीं १०८ उपनिषदें श्रीरामानें मारुतीस उपदेशिलीं त्यांचीं नांवें:—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैतिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, इत्यादि आहेत. त्यांतील ऋग्वेदाचीं १०, (शुक्लयजूंचीं १९ आणि कृष्णयजूंचीं ३२ अशीं) यजूंचीं ५१, सामवेदाचीं १६ आणि अथर्ववेदाचीं ३१ उपनिषदें आहेत. गौडपादाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, शंकरानंद, सदाशिवब्रह्मेंद्र, स्वयंप्रकाशानंद आणि विद्यारण्याचार्य इत्यादिकांनीं पूर्वोक्त उपनिषदांवर भाष्य आणि व्याख्या केल्या आहेत.

श्रीरामानें हनुमंतास उपदेशिलेल्या १०८ उपनिषदांचें मराठी भाषांतर करावें तें सांप्रतकाळात फारच उपयोगीं होईल असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून, तसें करावें असें मी इच्छित आहें.

प्रथम मूळ वाक्य लिहून नंतर त्याचें भाष्य आणि व्याख्या लिहून, त्यापुढें त्याचा अर्थ मराठींत लिहावा अशी योजना आहे.

हे पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून मासिक पुस्तक रूपानें छापणार आहों. रायल आठीचे अष्टपत्रीं साचाचें पुस्तक प्रति महिन्यास निघत जाईल. चांगला आश्रय मिळेल तर दर पंध्रवड्यासही काढिलें जाईल. प्रत्येक अंकांत १६ पृष्टें देत जाऊं. १२ अंकाबद्दल आगाऊ किंमत २ रु० व मागाहून ३ रु० पडेल. टपालहांशील आगाऊ ८१ व मागाहून ८८ पडेल.

एकशेंआठ उपनिषदांचें मराठी भाषांतराची अभिरुचि लोकांस लागून त्यांचा चांगला खप झाल्यास, बाकी राहिलेल्या १०७२ उपनिषदांचा शोध करून मिळतो तितकीं याच प्रमाणें छापण्याचा उद्योग क...

## वैद्यक मांत्रिकार्णव.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ह्या शके १८०९ चैत्र शुद्ध प्रतीपदेपासून "वैद्यकमांत्रिकार्णव" या नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहेत; या पुस्तकांमध्यें चरक, सुश्रूत, वाग्भट, भावप्रकाश, आयुर्वेद इत्यादि संपूर्ण वैद्यशास्त्रविषय स्वीय ग्रंथांचो, व यवनकृत वैद्यशास्त्रविषयक ग्रंथांचीं, व मंत्रमहोदधि. रुद्रयामल, शारदातिलक, दत्तपद्धति, प्रपंचसार, तंत्रसार, वाराहतंत्र, इंद्रजाल इत्यादि मंत्रशास्त्रविषयक ग्रंथांची माहिती क्रमाक्रमानें दिली जाईल हें पुस्तक रॉयल ४० पानांचें असून यामध्यें संस्कृत श्लोक मराठी अर्थासहित देऊन प्रसिद्ध केलें जाईल.

वर्षाची किंमत ४ रुपये ८ आणे व टपालखर्च ६ आणे.

किरकोळ अंकास ८ आणे.

नारायण गोविंदराव कडलक,
ज्योतिः प्रकाशकर्ते, नानाची पेठ, घोरिपडेयांचे घरनंबर २८४, पुणें.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य २ शके १८०९

## इंडो अमेरिकन रंग शाळा कंपनी.

वरील नांवाची एक कंपनी पुण्यास नुकतीच स्थापित झाली आहे. हींतील प्रत्येक भाग १० रुपयांचा असून एकंदर भाग १,००० काढून १०,००० रुपये भांडवल जमवावें असा तिच्या उत्पादकांचा विचार आहे. सदरहू भांडवलांत आपल्या देशांत पक्क्या तांबड्या सुताचा कारखाना काढावा असा ह्या मंडळींचा हेतु आहे; व अमेरिकेंतून ही कला शिकून आलेले रा० रा० केशव मल्हार भट उर्फ गुरुजी ह्यांचें त्यांस सहाय आहे.

ह्या कारखान्या पासून त्याचे उत्पादकांस काय पण देशास ही फार फायदा होईल. पुणें, नगर, नागपूर वगैरे ठिकाणीं रंगीत सुताचा फार खप आहे; व सदरहु कारखाना चकण्या यंत्रा वरील असल्यानें साहजिकच सूत पुष्कळ निघून स्वस्त पडेल; व त्या मानानें त्याचा खप ही चांगला होईल. शिवाय रा० रा० गुरुजी सारखे गृहस्थ त्यांत पुरस्कर्ते असल्या मुळें त्यांत यश येईलच. असा कारखाना इकडे पहिलाच आहे व तो चांगल्या रीतीनें चालल्यानें इतर ठिकाणचे लोकांस ही उत्तेजन येऊन थोडक्याच दिवसांत आणखी असे कारखाने निदान ज्या ठिकाणीं रंगीत सुताचा फार खप आहे अशा ठिकाणीं तरी होतील.

ह्या कंपनीच्या पैशासंबंधाच्या अटी फार सुलभ आहेत. पुढारी मंडळी प्रतिष्ठित व विद्वान आहेत; तर ह्या कंपनीचे शेअर अद्याप सर्व भरले गेले नसल्यास ते घेण्याची आह्मी शिफारस करितों.

आमचे प्रांतांतील लोकांनीं इकडे लक्ष पुरवावें असें आह्मी इच्छितों. सुताचे किंवा कापडाचे कारखाने किंवा गिरण्या काढण्यास वऱ्हाड जितकें सोईचें आहे तितके दुसरे प्रांत थोडेच. वऱ्हाडचे शेतकीचें उत्पन्नामध्यें कापसाचें उत्पन्न सर्वांत अधीक, व त्या मानानें कापसाचा व्यापार करणारे ही अधीक, परंतु त्या सर्वांचा उद्योग ह्मणून एवढाच कीं कापूस खरेदी करून मुंबईस किंवा थेट बिलायतेंत पाठवावा. असे व्यापारी साधारण पैसेवाले आहेत असें नाहीं तर बरेचे श्रीमान ही आहेत. परंतु त्यांचे अंगीं धाडस कमी व आपलें भांडवल कोणत्याही उपायानें अधीक फायदेशीर होईल ह्याचा ते नेहमीं विचार करीत नाहीत; व मंडळ्या करून व्यापार करण्याची ही पद्धत त्यांजमध्यें कमी आहे. कसलीं जोखमीचीं व पैशाचीं कामें एकटे अंगावर घेऊन करणारे सावकार इकडे नाहींत; परंतु दोघेचौघे मिळून करूं लागल्यास पुष्कळ आढळतील. परंतु अशा उद्योगाकडे त्यांचें मुळींच लक्ष पोंहचत नाहीं ही फार खेदाची गोष्ट आहे.

अलिकडील चार पांच वर्षांत येथें लहान मोठ्या ४१९ कंपन्या स्थापन झाल्या आहेत. व त्यांतील एकीचा क्रमाक्रमानें सूत काढण्याचा कारखानाही सुरूं करण्याचा हेतु आहे. परंतु तो हेतु सिद्धीस जाण्यास किती कालावधी लागेल ह्याचा नियम नाहीं. मोठ्या कारखान्यास पैशाची मोठी रकम पाहिजे हें खरें आहे पण ती एकट्याची असण्या पेक्षां अधिकांची असणें हें अधीक चांगलें: कारण पुष्कळांच्या नफ्या नुकसानीची बाब जेथें असते त्या ठिकाणीं काळजी करणारे ही फार असतात. यांत्रिक कारखाने आपल्या देशांत ठिकठिकाणीं सुरूं झाल्या खेरीज आपल्या देशाची उन्नति होणे नाहीं. ह्मणून हल्लीं चालू असलेल्या मार्गांत यांत्रिक कला सुरू केल्या शिवाय जरी पुरती सुधारणा होणें कठीण, तथापि त्या मार्गांचें काम अधीक फायदेशीरपणें चालण्यास त्यांस लागणाऱ्या मसाल्यांची तरी साद्यंत यांत्रिक कारखान्यावर थोडक्या काळांत व कमी श्रमानें व खर्चानें करिता येईल असें केलें पाहिजे.

नाहीं. मुंबईचे ...

## जुबिली संबधानें सरकारास अद्याप काय करतां येइल?

वर लिहिलेला सर्व साधारण प्रश्न आहे. हिंदुस्थानांत महाराणी विक्टोरिया यांचे राज्यास पन्नासावें वर्ष लागण्याचे निमित्तानें मोठा महोत्सव झाला व देशाचे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चोहीकडे आनंदमय दिसलें, ठिकठिकाणीं लोकांनीं आपला आनंद नुसत्या शद्बांनीं प्रदर्शित न करतां अशा मोठ्या उत्सवाचे निरंतर स्मरण राहण्याजोग्या गोष्टी यथा शक्ति करण्याची योजना केली. सदरहु प्रमाणें सरकारांनींही द्रव्यद्वारा थोडीबहुत प्रसंगास मदत केली. कैद्यांचे बंद खुले केले व काहीं लोकांस पदव्या वगैरे दिल्या. ही गोष्ट या देशांत झाली. परंतु या संबंधानें खरोखर महोत्सव म्हटला म्हणजे इंग्लंड देशांत होईल तोच. या देशांत उत्सव योग्यकाली येण्याचे पूर्वींच होऊन चुकला व असे करण्याचें कारण कीं दोन्ही ठिकाणीं एक समयावच्छेदें करून उत्सव झाल्यास कदाचित हिंदुस्थानातील प्रजेस व राजेरजवाडे यांस इंग्लंडांत जाऊन आपला आनंद खुद राणी सरकारचे हुजुरास जाऊन दाखवितां येणार नाहीं हेंच होय. येथील उत्सव उरकून घेतल्यानें हल्लीं हिंदुस्थानांतील पुष्कळ मोठमोठ्या राजेरजवाड्यांस स्वतः जाण्यास अगर आपले तर्फेनें योग्य प्रतिनिधी इंग्लंडास तेथें होणारे महोत्सवाचे संबंधानें पाठविण्यास अवसर सापडला आहे व बहुतेकांनीं आपली राजनिष्ठा प्रदर्शित करण्याकरितां याप्रमाणें वजवीज ही केली आहे. हा सर्व प्रकार प्रजेचे तर्फेने झाला. परंतु आमचे सरकारनीं अशा आनंदाचे वेळीं म्हणण्या सारखे व राज्यास बळकटी आणणारें असें एखादे प्रजेचें कल्याणपर कृत्य केलें आहे काय? या प्रश्नाचें उत्तर उघडच आहे.

पूर्वींचे बादशाहा अगर राजे गादीवर बसण्याचे समयीं अगर दुसऱ्या आनंदाचे प्रसंगी मोठमोठ्या देणग्या प्रजेस देत असत व अबाल वृद्धांस उपयोगी अशीं कांहीं कृत्यें करीत असत; व इंग्रज सरकार आज हिंदुस्थानचे सार्वभौम स्वामी असल्यामुळें त्यास या प्रसंगी अशा कांहीं गोष्टी करणें अत्यावश्यक ... एवढा विस्तीर्ण ...

साहसाही " , डाकहशील ८ ८८
साल अखेर " ७ " " ४८
किरकोळ अंकास......... " १८८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०१८६
दुसरे खेपेस ......०१

Per annum in arrears 7 " 12.8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy............................ 4as

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 9 MAY 1887 NO 18

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ९ माहे मे सन १८८७ इ० अंक १८


## जाहीरात.

### उपनिषदांचा मराठी अर्थ.

ऋग्वेदाच्या शाखा २१ आहेत. यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० शाखा आहेत याप्रमाणें चारवेदांच्या मिळून ११८० शाखा आहेत. प्रत्येक शाखेचें एकेक उपनिषद आहे. याप्रमाणें ११८० उपनिषदें आहेत त्यांतून मुख्य मुख्य अशीं १०८ उपनिषदें श्रीरामानें मारुतीस उपदेशिलीं त्यांचीं नावें:—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, इत्यादि आहेत. त्यांतील ऋग्वेदाचीं १०, (शुक्लयजूंची १९ आणि कृष्णयजूंची ३२ अशीं) यजूंचीं ५१, सामवेदाचीं १६ आणि अथर्ववेदाचीं ३१ उपनिषदें आहेत. गौडपादाचार्य, श्रीमच्छंकराचार्य, शंकरानंद, सदाशिवब्रह्मेंद्र, स्वयंप्रकाशानंद आणि विद्यारण्याचार्य इत्यादिकांनीं पूर्वोक्त उपनिषदांवर भाष्य आणि व्याख्या केल्या आहेत.

श्रीरामानें हनुमंतास उपदेशिलेल्या १०८ उपनिषदांचें मराठी भाषांतर करावें तें सांप्रतकाळात फारच उपयोगीं होईल असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून, तसें करावें असें मी इच्छित आहें.

प्रथम मूळ वाक्य लिहून नंतर त्याचें भाष्य आणि व्याख्या लिहून, त्यापुढें त्याचा अर्थ मराठींत लिहावा अशी योजना आहे.

पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून मासिक पुस्तक रूपानें छापणार आहों. रायल आठांचे अष्टपत्रीं साचाचें पुस्तक प्रति महिन्यास निघत जाईल. चांगला आश्रय मिळेल तर दर पंधरवड्यासही काढिलें जाईल. प्रत्येक अंकांत १६ पृष्टें देत जाऊं. १२ अंकाबद्दल आगाऊ किंमत २ रु० व मागाहून ३ रु० पडेल. टपालहांशील आगाऊ ०६ व मागाहून ०८ पडेल.

एकशें आठ उपनिषदांचें मराठी भाषांतराची अभिरुचि लोकांस लागून त्यास चांगला खप झाल्यास, बाकी राहिलेल्या १०७२ उपनिषदांचा शोध करून मिळतील तितकीं याच प्रमाणें छापण्याचा उद्योग क...

## वैद्यक मांत्रिकार्णव.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ह्या शके १८०९ चैत्र शुद्ध प्रतीपदेपासून "वैद्यकमांत्रिकार्णव" या नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहेत; या पुस्तकामध्यें चरक, सुश्रूत, वाग्भट, भावप्रकाश, आयुर्वेद इत्यादि संपूर्ण वैद्यशास्त्रविषय सर्वे ग्रंथांचो, व यवनकृत वैद्यशास्त्रविषयक ग्रंथांचीं, व मंत्रमहोदधि, रुद्रयामल, शारदातिलक दत्तपटल, प्रपंचसार, तंत्रसार, वाराहततंत्र. इंद्रजाल इत्यादि मंत्रशास्त्रविषयक ग्रंथांची माहिती क्रमाक्रमानें दिली जाईल हें पुस्तक रॉयल ४० पानांचें असून यामध्यें संस्कृत श्लोक मराठी अर्थासहित देऊन प्रसिद्ध केलें जाईल.

वर्षाची किंमत ४ रुपये ८ आणे व टपालखर्च ६ आणे.

किरकोळ अंकास ८ आणे.

नारायण गोविंदराव कडलक,
ज्योतिः प्रकाशकर्ते, नानाची पेठ, घोरपडे मंडळ घरनंबर २८४, पुणें.


वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य २ शके १८०९

## इंडो अमेरिकन रंग शाळा कंपनी.

वरील नांवाची एक कंपनी पुण्यास नुकतीच स्थापित झाली आहे. हींतील प्रत्येक भाग १० रुपयांचा असून एकंदर भाग १,००० काढून १०,००० रुपये भांडवल जमवावें असा तिच्या उत्पादकांचा विचार आहे. सदरहु भांडवलांत आपल्या देशांत पक्क्या तांबड्या सुताचा कारखाना काढावा असा ह्या मंडळीचा हेतु आहे; व अमेरिकेंतून ही कला शिकून आलेले रा० रा० केशव मल्हार भट उर्फ गुरुजी ह्यांचें त्यांस सहाय आहे.

ह्या कारखान्या पासून त्याचे उत्पादकांस काय पण देशास ही फार फायदा होईल. पुणें, नगर, नागपूर वगैरे ठिकाणीं रंगीत सुताचा फार खप आहे; व सदरहु कारखाना व कंपनी यंत्रा वरील असल्यानें साहजिकच सूत पुष्कळ निघून स्वस्त पडेल; व या मानानें त्याचा खप ही चांगला होईल. शिवाय रा० रा० गुरुजी सारखे गृहस्थ त्यांत पुरस्कर्ते असल्या मुळें त्यांत यश येईलच. असा कारखाना इकडे पहिलाच आहे व तो चांगल्या रीतीनें चालल्यानें इतर ठिकाणचे लोकांस ही उत्तेजन येऊन थोडक्याच दिवसांत आणखी असे कारखाने निदान ज्या ठिकाणीं रंगीत सुताचा फार खप आहे अशा ठिकाणीं तरी होतील.

ह्या कंपनीच्या पैशासंबंधाच्या अटी फार सुलभ आहेत. पुढारी मंडळी प्रतिष्ठित व विद्वान आहेत; तर ह्या कंपनीचे शेअर अद्याप सर्व भरले गेले नसल्यास ते घेण्याची आम्ही शिफारस करितों.

आमचे प्रांतांतील लोकांनीं इकडे लक्ष पुरवावें असें आम्ही इच्छितों. सुताचे किंवा कापडाचे कारखाने किंवा गिरण्या काढण्यास वऱ्हाड जितकें सोईचें आहे तितके दुसरे प्रांत थोडेच. वऱ्हाडचे शेतकीचे उत्पन्नामध्यें कापसाचें उत्पन्न सर्वांत अधीक, व या मानानें कापसाचा व्यापार करणारे ही अधीक, परंतु त्या सर्वांचा उद्योग म्हणून एवढाच कीं कापूस खरेदी करून मुंबईत किंवा थेट बिलायतेंत पाठवावा. असे व्यापारी साधारण पैसेवाले आहेत असें नाहीं तर बरेचे श्रीमान ही आहेत. परंतु त्यांचे अंगीं धाडस कमी व आपलें भांडवल कोणत्याही उपायानें अधीक फायदेशीर होईल ह्याचा ते नेहमीं विचार करीत नाहीत; व मंडळ्या करून व्यापार करण्याची हा पद्धत त्यांजमध्यें कमी आहे. असलीं जोखमीचीं व पैशाचीं कामें एकटें अंगावर घेऊन करणारे सावकार इकडे नाहींत; परंतु दोघेचौघे मिळून करूं लागल्यास पुष्कळ आढळतील. परंतु अशा उद्योगाकडे त्यांचें मुळींच लक्ष पोंहचत नाहीं ही फार खेदाची गोष्ट आहे.

अलिकडील चार पांच वर्षांत येथें लहान मोठ्या ४१६ कंपन्या स्थापन झाल्या आहेत. व त्यांतील एकाचा क्रमाक्रमानें सूत काढण्याचा कारखानाही सुरू करण्याचा हेतु आहे. परंतु तो हेतु सिद्धीस जाण्यास किती कालावधी लागेल ह्याचा नियम नाहीं. मोठ्या कारखान्यास पैशाची मोठी रकम पाहिजे हें खरें आहे पण ती एकट्याची असण्या पेक्षां अधिकांची असणे हें अधीक चांगलें: कारण पुष्कळांच्या नफ्या नुकसानीची बाब जेथें असते त्या ठिकाणीं काळजी करणारे ही फार असतात. यांत्रिक कारखाने आपल्या देशांत ठिकठिकाणीं सुरू झाल्या खेरीज आपल्या देशाची उन्नति होणे नाहीं. म्हणून हल्लीं चालू असलेल्या मार्गांत यांत्रिक कला सुरू केल्या शिवाय जरी पुरती सुधारणा होणें कठीण, तथापि त्या मार्गांचें काम अधीक फायदेशीरपणें चालण्यास त्यांस लागणाऱ्या मसाल्यांची तरी साद्यंत यांत्रिक कारखान्यावर थोडक्या काळांत व कमी श्रमानें व खर्चानें करितां येईल असें केलें पाहिजे.

नाहीं. मुंबईचे ग...

## जुबिली संबंधानें सरकारास अद्याप काय करतां येइल?

वर लिहिलेला सर्व साधारण प्रश्न आहे. हिंदुस्थानांत महाराणी विक्टोरिया यांचे राज्यास पन्नासावें वर्ष लागण्याचे निमित्तानें मोठा महोत्सव झाला व देशाचे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चोहोंकडे आनंदमय दिसलें, ठिकठिकाणीं लोकांनीं आपला आनंद नुसत्या शब्दांनीं प्रदर्शित न करतां अशा मोठ्या उत्सवाचे निरंतर स्मरण राहण्याजोग्या गोष्टी यथा शक्ति करण्याची योजना केली. सदरहु प्रमाणें सरकारांनींही द्रव्यद्वारा थोडीबहुत प्रसंगास मदत केली. कैद्याचे बंद खुले केले व कांहीं लोकांस पदव्या वगैरे दिल्या. हा गोष्ट या देशांत झाली. परंतु या संबंधानें खरोखर महोत्सव म्हटला म्हणजे इंग्लंड देशांत होईल तोच. या देशांत उत्सव योग्यकाळ येण्याचे पूर्वींच होऊन चुकला व असे करण्याचें कारण कीं दोन्ही ठिकाणीं एक समयावच्छेदें करून उत्सव झाल्यास कदाचित हिंदुस्थानातील प्रजेस व राजेरजवाडे यांस इंग्लंडांत जाऊन आपला आनंद खुद्द राणी सरकारचे हुजुरास जाऊन दाखवितां येणार नाहीं हेंच होय. येथील उत्सव उरकून घेतल्यानें हल्लीं हिंदुस्थानांतील पुष्कळ मोठमोठ्या राजेरजवाड्यांस स्वतः जाण्यास अगर आपले तर्फेनें योग्य प्रतिनिधी इंग्लंडास तेथें होणारे महोत्सवाचे संबंधानें पाठविण्यास अवसर सापडला आहे व बहुतेकांनीं आपली राजनिष्ठा प्रदर्शित करण्याकरितां याप्रमाणें वर्तणूक ही केली आहे. हा सर्व प्रकार प्रजेचे तर्फेनें झाला. परंतु आमचे सरकारनीं अशा आनंदाचे वेळीं म्हणण्या सारखें व राज्यात बळकटी आणणारें असें एखादे प्रजेचें कल्याणपर कृत्य केलें आहे काय? या प्रश्नाचें उत्तर उघडच आहे.

पूर्वींचे बादशाहा अगर राजे गादीवर बसण्याचे समयीं अगर दुसऱ्या आनंदाचे प्रसंगी मोठमोठ्या देणग्या प्रजेस देत असत व अनाथ वृद्धास उपयोगी अशीं कांहीं कृत्यें करीत असत; व इंग्रज सरकार आज हिंदुस्थानचे सार्वभौम स्वामी असल्यामुळें त्यास या प्रसंगी अशा कांहीं गोष्टी करणें अत्यावश्यक ... एवढा विस्तीर्ण

देश राणी सरकारचे अमलां खालीं अनेक कारणांनीं येऊन त्यांजवर आज बहुत दिवस अव्याहत राज्य चाललें आहे; व त्यांचें राज्य या देशावर आल्यापासून एकंदर प्रजेची स्थिति पूर्वींपेक्षां पुष्कळ तऱ्हेनें भिन्न झाली आहे. राजकीय विषयाचे संबंधानें हिंदुस्थानातील प्रजेस राणी सरकारचें राज्य झाल्या दिवसापासून नवीन शिक्षण मिळत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; जसजसें हें शिक्षण ज्यास्त लोकांस मिळत जाईल तसतसें लोकांचें ज्ञान वाढून आपले हक्क त्यांस समजत गेल्यामुळें तें सरकारापाशीं आपले योग्य हक्क आपणास देण्याविषयीं मागणें व टपट करतील यांत नवल नाहीं.

पुढें चालेल

## रखमाबाई आणि दादाजी.

रखमाबाईचे संबंधानें जसजसी ज्यास्ती माहिती होत चालली आहे त्या त्या मानानें त्या प्रकरणाचें महत्व कमी होऊं लागलें आहे; विशेषतः इंग्रजी वर्तमानपत्रें व मुंबईकर सुधारक मंडळी यांणीं रखमाबाईचा आरंभीं फार सोहळा केला व तीस अहल्या द्रौपदीचे अगदीं जवळ जवळ नेऊन भिडविलें होतें. परंतु अशा उच्च पदास रखमाबाई पात्र नाहीं व दरम्यान केलेली ओरडा ओरड व्यर्थ असें आतां म्हणावें लागलें. व सुधारकांस हा आपला संभावितपणा राखवेल तितका राखून आपलें अंग या प्रकरणांतून लौकरच काढून घेण्याची आवश्यकता होईल असा रंग दिसतो. रखमाबाईनें आपल्या नवऱ्याच्या घरीं जावें व ठरविलेले मुदतींत न गेल्यास कोर्टाचा हुकूम तोडल्या बद्दल कैदेंत पाठविलें जाईल. असा अखेर निकाल हाय कोर्टांत झाल्यावर तिला मदत करण्या साठीं रखमाईचे पक्षाचे मंडळीनें रखमाबाई डिफेन्स म्हणून मंडळी स्थापिली. व तींत प्रोफेसर वर्डस्वर्थ साहेबासारख्या विचारी व समक्षानुयायी गृहस्थास ही गोवविलें. या गृहस्थास जर रखमाबाईची साद्यंत पीठिका माहीत असती व परंपरागत जातिधर्मादिक अवगत असतें, तर ते या प्रकरणांत शिरलें नसते हें उघड आहे; पण आतां डाकटर कीर्तिकर यांचे लेखावर ऐकून त्यांचा मूळचा विपरीतग्रह दूर होईल यांत संशय नाहीं. डाक्टर कीर्तिकर हे मुंबईतील संभावित व पुढारी गृहस्थां पैकीं असून खऱ्या सुधारणेचे भक्त आहेत. असे त्याच्या हल्लींचे भाषणावरून व त्यांच्या पूर्वींच्या लेखावरून त्यांस आम्ही समजतों. रखमाबाई बद्दल त्यांणीं आतां जी माहिती कळविली आहे; यांची माहिती सांगवा सांगवीची नाहीं. ते रखमाबाई व दादाजी आणि त्यांचे इतर संबंधीं यास पुरें ओळखतात. असें करण्यांत त्यांचा इरादा रखमाबाईच्या पक्षाची कोणत्याही अंशीं हानि करण्याचा नाहीं. या विषयीं कोणास ही शंका नसेलच. हें भारूड व्यर्थ माजविलें व परिणामीं [illegible] रखमाईचा किंवा सुधारक पक्षाचा किंवा इतर लोकांचा कांहीं फायदा होणार नाहीं असें पाहून त्यांणीं या संबंधाची हकीकत प्रसिद्धपणें सुधारकांस व इतर लोकांस कळविली हें स्पष्टच आहे. ज्यांस या प्रकरणाचें खरें स्वरूप व महत्व माहीत नव्हतें परंतु एकतर्फी वर्तमानपत्रकाराचे लेखा वरून मोह झाला होता तो आतां जाईलच. पण ज्यांस ही गोष्ट अवल अखेर माहीत होती, सांप्रतचे जातिधर्म व त्यां पासून फायदे गैरफायदे समजत होते त्यांस या रखमाबाई प्रकरणांत सामाजिक संबंध दृष्टीनें कांहींच मोठेपणा वाटला नव्हता व परिणामीं काय निष्पन्न होईल हे ही दिसलें होतें व तें आतां पूर्णपणें घडून आल्या सारखें दिसत आहे.

रखमाबाईचे पक्षास ही मोठमोठी मंडळी अनुकूल आहे. त्या गृहस्थास जर वाटलें असेल कीं रखमाबाई सारख्या एकाद्या व्यक्तिमात्राचें सांप्रत जाति धर्मापासून झालेलें नुकसान फुगवून दाखवून हल्लींचा बाळपणीं लग्नाचा प्रचार बंद करतां येईल तर त्यांच्या दूर दृष्टीची साध्यासाध्य व योग्यायोग्य विचाराची विशेष तारीफ करवणार नाहीं. वस्तुतः रखमाबाईचें नुकसान तिणें स्वतां करून घेतलें, किंवा तिच्या संबंधांनीं केलें; व जो थोडा अंश कमी होता तो तिचे पक्षाकडील सुधारकांनीं पुरा केला असें म्हणणें विशेष रास्त आहे. जे रखमाबाईला न्याय्य होतें तें विरुद्ध करण्यास तिला सल्ला सुधारकांनीं दिली, करितां बालविवाहाचे वाली पेक्षां हे गृहस्थ तिच्या झालेल्या नुकसानीं बद्दल अधिक दोषास पात्र आहेत. मोठेपणीं यांचीं लग्नें झालीं असतीं व नंतर दादाजी रोगग्रस्त व भिकारी झाला असता अशी कल्पना केली तर या दोन करण्यां वरून सुधारक मंडळीनें दादाजीस सोडून देण्यास रखमाबाईस सल्ला दिली असती काय? विद्वत्तेचे ही संबंधानें लग्ना नंतर देखील फरक होण्याचा संभव आहे. अशी कल्पना करा कीं रखमाबाईस लग्नाचे वेळेस लिहितां वांचतां ही येत नव्हतें व दादाजीस सामान्य विद्या होती. पण लग्न झाल्यावर रखमाबाई पंडिता झाली असती व दादाजी ज्ञान संबंधानें तिच्या पुढें केवळ अज्ञ दिसुं लागता, तर सुधारकांनीं तिला त्या वेळेस आपल्या नवऱ्यास सोडून जाण्यास सल्ला दिली असती काय? जर त्यांनीं असे केलें नसतें तर त्याच व्यंगास रखमाबाईचें लग्न बालपणांत झालें असल्यामुळें अधिक महत्व येतें काय? या खटल्यांतील विटंबने बद्दल रखमाबाईचे संबंधीचे मुख्यत्वें करून दोषी दिसतात. द्रव्याच्या लोभानें रखमाईच्या सर्व आयुष्याचा त्यांणी घात केला असें म्हटलें पाहिजे. रखमाबाईचे खरें हितकर्ते दिणें नवऱ्याकडे जाण्या साठीं तिला सल्ला देते व ती शाहणी असती तर तिणें तसें वर्तन केलें असतें. पण तिचे हितकर्ते म्हणविणारांनीं असें काय जाणून बुजून तमाशा पहाण्या साठीं व दाखविण्या साठीं तिला विपरीत सल्ला दिली असें दिसतें; कारण सल्लाकार शहाणे विद्वान व विचारी गृहस्थ आहेत; तेव्हां त्यांचें हातून असा विचार न व्हावा. व सुधारकांच्या सर्टिफिकिटावरून पाहतां रखमाबाई इतकी शहाणी व ज्ञान संपन्न बायको दुसरी नाहीं. तेव्हा अशा प्रकरणांत विद्वानाकडून विद्वानास योग्य बुद्धिवाद मिळण्याचा होता तसें कां झालें नाहीं याचें मर्म अजून आम्हांस समजत नाहीं. पण आतां झालेले माहिती वरून पहातां रखमाईची सल्लाकार मंडळी व तिचे बालिस्टर यांणीं तिला ज्या पदावर चढाविण्याचा यत्न केला तें पद तिला योग्य दिसत नाहीं. तिच्या नावानें प्रसिद्ध झालेलीं पत्रें तिच्या स्नेही मंडळीनें टाईम्स आफ इंडिया वर्तमानपत्र कर्त्यास दिलीं; तिचे विद्वत्ते विषयीं केलेला पुकार, व गौरव पोकळ; व तिचे नवऱ्यास मजूर म्हणण्यानें रखमाईस चढविण्या साठीं केलेला प्रयत्न निराधार असें आतां उघडकीस आलें आहे. विद्वत्तेचे संबंधानें दादाजी व रखमाई यांचे मध्यें विशेष फरक असावा असें आतां म्हणतां येत नाहीं. तथापि रखमाईस विद्या संपन्न म्हणण्याचा तिच्या सल्लाकार सुधारकांचा आग्रह असल्यास आमची हरकत नाहीं. तसि जर विद्वती म्हटलें तर दादाजीस ही विद्वान म्हणावें, पण दादाजीस मजूर म्हणण्याचा त्यांचा अजून आग्रहच असल्यास रखमाइस मजुरीण म्हणावें लागेल याचा त्यांणीं विचार करावा.

पुणे ६।५।८७

(लिहून आलेला मजकूर)

गेल्या शुक्रवारीं लार्डरी साहेबानीं सातान्यास मुनिसिपालिटीच्या मानपत्रावर उत्तर दिले त्यांत डेक्कन कालेज, टेक्निकल एजुकेशन, आणि युनिव्हर्सिटी स्कूल फायनल परिक्षा या तीन महत्वाच्या विषयीं संबंधानें लाट साहेबानीं मुंबई सरकारचे विचार प्रगट केले. पहिल्या दोन्ही प्रकरणांत फायनान्स कमिटीच्या सूचनांच्या धोरणानें मुंबई सरकारास पुष्कळ फेरबदल करणें भाग पडलें. एकंदरींत शाळाखात्यांत गुदस्त साला पेक्षां एक लक्ष रुपये खर्च कमी केला. ही बडी काटकसर करण्या करितां मुंबई सरकारास पुष्कळ बाबदींत करडा अंमल दाखवावा लागत आहे. डेक्कन कालेज संबंधानें आजपर्यंत लोकांच्या मोठ्या उमेदीच्या आशा होत्या त्या लार्डरी साहेबानीं परवाच्या भाषणांत स्पष्टपणें उलगडा करून दूर केल्या. माजी गव्हरनर फर्ग्युसन साहेब यांच्या वेळीं 'डेक्कन एजुकेशन सोसायटी' स्थापन झाली व त्यांच्याच नांवानें फर्ग्युसन कालेज सुरुं झालें. डेक्कन एजुकेशन सोसायटी आपल्या कालेजच्या इमारती साठीं सरकारापाशीं ३९१९९८ रुपयांची मागणी करित आहे त्या मोठ्या काटकसरीच्या आणि वाणीच्या वेळीं डेक्कन कालेजचा खर्च संभाळून, फर्ग्युसन कालेजची वार्षिक ग्रांट देऊन शिवाय इमारतीस एवढी मोटी रकम देणें सरकारास सवड नसल्या मुळें सरकारनें युक्ति काढिली आहे कीं फर्ग्युसन कालेज मध्यें तूर्त काय तो पी. ई. चा वर्ग आहे तो काढून डेक्कन कालेज मध्यें आणावा व तिकडील प्रोफेसर्स लोकांनीं व डेक्कन कालेजच्या प्रोफेसर लोकांनीं एक नवीन बोर्ड स्थापन करून काम चालवावें, म्हणजे इमारतीचा खर्च नको; वार्षिक ग्रांट द्यावी लागणार नाहींत आणि एक डेक्कन कालेज चांगलें चालेल, व त्यांत सरकारास ही निराळी कांहीं खटपट करणें नको. हल्लींचे डेक्कन कालेजचे प्रोफेसर मंडळीनें पेनशन घेतल्या नंतर क्रमाक्रमानें डेक्कन कालेजचा ताबा डेक्कन एजुकेशन सोसायटीस देतां येईल; व नंतर सोसायटीनें दोन युरोपियन प्रोफेसर्स ठेविले पाहिजे आणि त्या वेळीं सरकार प्रत्येक प्रोफेसर करितां महिना चार चारचे रुपये पगार देईल; व शिवाय सरकारास वार्षिक १३००० रुपये द्यावे लागतील, आणि या व्यवस्थेनें सरकारास डेक्कन कालेजचा हल्लीं जो ६०,००० रुपये खर्च आहे त्याबद्दल सरकारवर २२६०० रु. खर्च पडूं लागेल.

पुढें चालेल.

The Berar Samachar

MONDAY MAY 9 1887.

The first object of the Elocution gathering at Poona was to address the Government of India and other high officials, English statesmen coming here as guests and members of Parliament who have paid a visit to this country to enable them to acquire some practical information in regard to India. The candidate was to feign himself the deleagte of the National Congress, and to feign the audience as the National Congress in which the men above referred to were present. The subject was somewhat difficult to handle and the speaker must be a man of considerable abilities who can handle. It is no small thing to make an impression upon intelligent men or common place audience when the subject to be discussed is so important. We consider it a mistake on the part of the Poona Sabha to carry this system of feigning too far. The candidates who come forward do not acquit themselves even in a pretty manner and the fault does not lie with them, because their store of knowledge and information is so limitted. We are brought face to face with candidates whose speeches are only a joke of the serious nature of the subject. If the Sabha could expect at the same time that it trains speakers, to enlighten the audience upon matteres of national and political interest. The material must be such as would answer either purpose. We distinctly say that the candidates now coming forward are generally unfit to take up at such a task. The subjects, when printed and circulated, have a charm of their own and are liked by the people, but when one goes into the audience hall he is struck with the poor acquisitions of a speaker. We feel sure that if subjects in conformity with the abilities of the candidates be selected the latter would display their oratorical powers to a better advantage. It may be urged that the object of the Sabha in placing forth such difficult objects is to attract men of superior abilities to the speaker's table. If this argument has really some force, an option must be left in the choice of the subject and an [illegible] sub

ject should, in every case, be joined to a more difficult one; so that it will be a help to the speakers. The candidates, who are unable to gauge their powers, fly to the top and the attractive character of the subject is so attractive to them that they forget their own powers in handling it in the hope or ambition of thresh ing out a subject which is so popular and so pleasing. To prevent candidates from thus mismanaging their own abilities an attempt should be made by the managing Committee to satisfy itself that the acquirements of the candidate are a guarantee that he would be able to deal with it in a good manner. What we don't like is, an exhibition of thoughts and ideas which lower the value of the subject and prostitute its genuineness. If the speeches that are made would go hand in hand with the importance and difficulty of the subject the audience would form quite a different opinion of matter. The encouragement of elocution does not imply that some of the subjects at least must be very difficult. The distribution of marks that is now in vogue attaches something like 5o percent to the oratorical powers of the speaker, and that is no doubt the chief object of the Sabha. The present is the seventeenth or the eighteenth gathering of the Sabha, but during the course of these seventeen years they have turned out very few good speakers. It will not do for the Sabha to move in one group but to try and make all necessary changes to attract more intelligent and educated men to the table. To supply the diffidence which educated men feel when ridiculed, laughed at or booted by a very common place audience, the daily tickets of one and two annas may be stopped during one or two days of the elocution week, that it may enable some of the speakers to take up a subject and appear in public. If this system fails, invitations may every year be issued by the managing Committee of the Sabha to the foremost graduates or such other men to help the cause of elocution by making speeches. To enable the public to know how the request of the Sabha is appreciated a list of persons who have been so invited may be published. When these men are written to, all objections they may raise to come to speak should be carefully considered and removed as far as it may lie in the power of the Managing Committee. The sole object of the Elocution [illegible]athering ought to be to attract [illegible] of a higher type than we see at the table at present. You may confine one subject to school-boys rather who have yet to make a name, but to encourage and develop the powers of dormant speakers must be steadily kept in view. We do not sit in judgment upon this year's gathering because it began only on the third instant. There will be time enough to pass judgment upon it when it is over. The present is the most opportune time however to direct the attention of the educated classes to this subject and its reformation when the gathering is being held. If the Managing Committee of the Sabha is able to fathom out one would-be speaker and save him from oblivion, cultivate his powers of speech and encourage him in the way best suited to his mental capacities, they will be doing a service to the country. We desire to shine more by the worth of a material than by its bulk. We have not the slightest doubt that the young men who take degrees and become Government servants contain a few specially gifted persons who will form excellent speakers. We would not mind if some of the speakers entertain us in English. There are men who handle a subject better in the English language than in their own. Well, if they could be utilized into good speakers it will not be service misplaced. We may preserve the Marathi speaking, but may at the same time salt it with a little of English. When the ultimate end is not lost, the Sabha should not be slow in moving in the matter. It is time enough after the expiration of seventeen years for the Sabha to write a report and make the Elocution Gathering popular among the people by sending delegates to different parts of the country wherever encouragement may be desirable. If it succeeds in making speech makers all over the country it will furnish to the people an organ for the representation of their thoughts. We do not suppose people at present make a representation of a thousandth part of their wants and grievances, we mean of course the people who are distant from the cities. We stop here to day but may take up the subject again as it is of such vital and permanent interest.

---

Monday 2nd. May witnessed a demonstration in Hirabaug at Poona in connection with the departure of Sir William Wedderburne from Poona. The Hirabaug Hall was crowded with the Sirdars, jagirdars, Inamdars and other notabilities residing at Poona. Speeches were delivered recounting the interest Sir William had taken in his private capacity, in all that concerned the interests of the Hindu. The representatives of various institutions in Poona, who had gathered there, spoke of the kind assistance they had all derived from the gentleman they had gathered to honor that evening. Sir William at last rose and in an apt speech expressed his sorrow at parting from so many friends and added that his interest for India and Indians would continue in Englad.

Our Province had very little connection with the retiring gentleman but the sympathy he had shown towards Indian concerns had always secured respect for him with the intelligent natives of this province. His scheme regarding Agricultural Banks in the Bombay Presidency, which had for its object the relief of the indebted ryots in that Presidency, was especially looked upon with great interest; and although he was not able to achieve any thing in that direction, his scheme had set many a thinking. In doing honor to a gentleman of such broad views and extended sympathies, the Poona community showed an appreciation of true merit. Kindness and sympathy are never thrown away upon the Hindus and here is an example in point. Will our Berar officials do something to deserve like honors?

---

## वऱ्हाड,

ता. २ मे १८८७ चे रेसिडेन्सी आ रडर वरून रा. रा. वामन नारायण बापट

ए. अ. क. यास दोन महिन्याची हक्काची रजा मिळाली व त्यांचे जागी काम करण्या-कारितां रा. रा. अंबादास संतो आ. ए. अ. क. जळगांव, यांची तूर्त मलकापुरास बदली झाली आहे.

मि. अहमदअली यांची हैदराबाद अ-मानी मुलखांत सब असिस्टंट कलेक्टर चे जागी नेमणूक ता. १ एप्रिल सन १८८७ पासून कायम झाली.

रा. रा. बंधुजी जनार्दन चावळ ए. अ क. व रेसिडेंट साहेबांचे क्लार्क ऑफकोर्ट यांस ता. १९-४-८७ पासून दोन महि-न्याची हक्काची रजा मिळाली, व त्यांचे जागीं काम करण्या कारितां कमिशनर सा-हेबांचे क्लार्क ऑफकोर्ट रा. रा. वासुदेव सदाशिव यांस आफि. ए. म. क. नेमून रेसिडेंट साहेबाचे क्लार्क ऑफ कोर्ट व ग-व्हर्मेंट ट्रान्सलेटर नेमिले आहे.

मि. एच. एफ. फाटग्रेव्ह डि. सु. पो-लीस एलिचपूर यांस ता. १ मे १८८७ पासून किंवा ते घेतील त्या तारखेपासून सहा आठवड्यांची हक्काची रजा मिळाली; व ते रजेवर गेल्यामुळें खालील नेमणुका झाल्या.

मि. इ. डब्लू. डी. माकेट, डि. सु. पोलीस फोर्थ क्लास यांस आफि. डि. सु. पोलीस थर्ड क्लास नेमले.

मि. सी. फ्रेजर, असिस्टंट सु. पोलीस फर्स्ट ग्रेड यांस आफि० डि० सु० पोलीस फोर्थ क्लास नेमले व त्यांचे जागीं मी. एफ. टी कूट यांस आफि. अ० सु० पोलीस सेकंड ग्रेड नेमले.

सन १८८२ चा आक्ट १० कलम १२ अन्वये कपापटन जे. जी. मारिस, अ सिस्टंट कमिशनर यांस, त्यांनीं डा० नंदी याजपासून कामाचा चार्ज घेतल्या तारखे पासून फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट नेमले.

कपापटन जे. जी. मारिस अ. क. यां स फॉरिन डिपार्टमेंट नोटिफिकेशन नंबर १९६ ता० ३० सप्टेंबर १८७० अन्वये पांचवे ग्रेडचे जज्ज नेमून ५००० रु. प र्यंत अधिकार दिला.

हैदराबाद अमानी मुलखांतील ज्या सब राजिष्ट्रार लोकांस फीचे उत्पन्नावर कमिशन द्वारें पगार मिळतो असे सर्व रजिस्ट्रार सिविलट्रान्झलिंग आलावन्स कोड कलम ३१ व ६७ अन्वये थर्ड क्लास आफिसर समजले जातील आणि त्यांचा दरोजचा भत्ता त्याच कोडचें कलम ३१ ( सी ) अन्वये दरमहा ५० रु. पगारावर आकार ला जाईल.

सन १८८२ चा आक्ट १० कलम १२ अन्वये रा. रा. गणपतराव बाबाजी ए० अ० क० जिल्हा वणी, यांस त्या जि-ल्ह्यांत थर्ड क्लास माजिस्ट्रेट नेमले. व गव्ह र्मेंट ऑफ इंडिया नोटिफिकेशन नंबर १९६ ता० ३०-९-७० अन्वये थर्ड ग्रेड जज्ज नेमून ५०० रु. पर्यंत अधिकार दिला.

सन १८६९ चा आक्ट ११ कलम १३ अन्वये कपापटन जे. जी. मारिस अ. क. यांस त्यांनी डा० जी० नंदी याजपा-सून चार्ज घेतल्या तारखेपासून खामगांव स्मालकाज कोर्टाचे जज्ज नेमले.

रोजिस्ट्रेशन आक्ट - सन १८८७ चा आक्ट कलम ५ अन्वये ता० १५-१-८७ पासून वणी जिल्ह्यातील आर्नी पोलीस सर्क लमधील गांवें दारव्हा सब डिस्ट्रिक्ट मधून काढून दिग्रस सब डिस्ट्रिक्टमध्ये घेतली जातील.

ले० कर्नल आर बुलक डे० क० थर्ड क्लास यांस ता० ५-५-८७ पासून किंवा ते घेतील त्या तारखेपासून तीन महिन्या ची हक्काची रजा मिळाली.

अबदुल अझिझ तहसिलदार फर्स्टग्रेड यांनीं पेनशन घेतल्यामुळें तहसीलदारी ग्रेड मध्यें खालीलिहिल्या प्रमाणें बदल्या झाल्या.

मि. गोविंदराज मुदालियार तहसिलदार सेकंड ग्रेड यास फर्स्ट ग्रेड नेमले.

मि० मीर सफदर अलीबेग तहासिलदार थर्ड ग्रेड यांस सेकंड ग्रेड नेमले

रा० रा० कृष्णाजी हरी तहासिलदार फॉर्थ ग्रेड यास थर्ड ग्रेड नेमले.

रा०रा०सदाशिव भास्कर तहसिल-दार फोर्थ ग्रेड यांस १९० रु. पगार हो ता तो १५० केला.

मि० एफ० सी० क्राफर्ड यांस दुसरे कामीं नेमल्यामुळें त्यांचे जागी काम कर-ण्या कारितां मी० जे० टी० बी० डी० आफि० अ० सु० पोलीस आकोला यांची बदली सिकंदरा बादेस झाली. व या प्रमाणे त्यांनी ता. ३१ दि-सेंबर १८८६ रोजी तेथें जाऊन चार्ज घेतला.

वऱ्हाड रुरल बोर्डास आ १८८९ चे कमल ३३ अन्वये केलेल्या नियमांच्या म-सुद्यांचा बिचार करण्या कारितां ठरविलेली मुदत ता. १ जुलई १८८७ पर्यंत वाढविली.

---

### नोटीस.

रा० रा० भीयराज सुरजमल मारवा-डी दुकान ताजनापेठ यांस खालीं सही करणार याजकडून नोटीशीनें कळविलें जातें कीं, तुम्ही गहूं जात लालपिसीं पोतें २०१० दोन हजर दहा. याचे खंडी २०१ दोनशे एक दर खंडीचे रुपये ६१८४ प्रमाणें विकले आहे. चैत्र शुद्ध १ पासून ते वैशाख शुद्ध पोर्णिमा १५ पर्यंत सदरी लिहिलेला कबाला करून दे-ण्याचा तुम्ही मिती पोष्य शुद्ध ८ तारीख २ माहे जानेवारी सन १८८७ इ० रोजीं कबाला लिहून दिला.

कबाला खाली खंडी२०१चा चैत्रशुद्ध १ पासून वैशाख शुद्ध १५ पावेतों तुमच्या जवळून गहू पिसी घेतली आहे या पैकीं मण ८४९॥ तुम्ही आम्हाला दिली या पैकी रुपये १०४३ ८= तुम्हाला आम्ही दिले. आतां बाकीमाल मण ३१७०॥ आम्हाला तुम्ही ही नोटीस पावताच एक दिवसांत नद्यालतर आम्ही तुमच्या हिसाबांत बाजार भावानें खरेदी करून पुरा करूं त्या मध्यें जे काहीं नुकसान होईल ते तुमच्या जवळुन भरून घेतले जाईल. या नोटिसीनें तुम्हास कळवितो. ९-५-८७

( सही ) द्वारकादास वल्लभदास
एजंट विसनजी कावजी
दस्तुर पु. नारी मंडळी

---

वर्तमान फार्युरा ४. पुण्यास

मुंबई— रा० रा० विनायकराव यांची कन्या गंगाबाई हिनें वय १४ वर्षांचे असून ती ऐथील आर्टस्कूलची सेकंडग्रेडची परीक्षा उत्तम प्रकारें पास होऊन तिचा पहिला नंबर आला. हिंदु स्त्रीनें कलाकौशल्याचा अभ्यास करून परीक्षा दिल्याचें हें पहिलें उदाहरण.

डेक्कन कालेज मुंबई सरकारच्या मनांतून डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्वाधीन करण्याचें होतें; परंतु ती सोसायटी सरकारच्या अटीवर तें कालेज आपल्या ताब्यांत घेण्यास कबूल नाहीं असें ह्मणतात.

तारकेश्वर येथें २,००० सन्याशांनीं दंगा करून पोलीसच्या लोकांस मारल्याचें स्टेटसमनचा बातमीदार ह्मणतो.

गेल्या सालीं १,१७,७०० मण तंबाखू बंगाल्यांतून परदेशांत गेली.

लंडन शहरांत वर्तमान पत्राचें काम करण्याचें शिकविण्याची एक शाळा स्थापन झाल्या बद्दल समजतें.

हल्लीं तारवाच्या बुडास तांब्याच्या पत्रा लावितात त्या ऐवजीं लौकरच कांचेचा उपयोग करूं लागतील कारण कांच गंजत नसल्यामुळें इटालियन लोकांनीं ती तारवांच्या बुडास बसविण्याचा आरंभ केला आहे असें ह्मणतात.

वादळ मोठ्या जोराचें असून जर समुद्रांत तेल ओतलें असतां जों पर्यंत पाण्यावर तेल असेल तों पर्यंत लाटा न उठल्यानें तारूं सुरक्षितपणें बंदरांत जाऊन लागतें असें ह्मणतात.

सोलापूर येथील कापसाचे गिरणीच्या भागीदारांस गेल्या सालीं ११ टक्यांचे व्याज पडलें असें त्या कंपनीच्या डायरेक्टरांच्या रिपोर्टा वरून समजतें.

मद्रास इलाख्यांतील ज्यासरकारी आमलदारांनीं जमिनी घेतल्या आहेत त्यांनीं कायद्या विरुद्ध कां वर्तन केलें याचें कारण कळविण्याविषयीं मद्रास सरकारनें त्यांस विचारलें आहे शिवाय ज्या कलेक्टरांच्या हद्दींत इंग्रजी अमलदाराची जमिन असेल त्यांनीं त्याच्या नांवाची याद सरकारास पाठवून या संबंधाचा कायदा सक्तीनें अमलांत आणण्याचा ठराव झाला असें ह्मणतात.

महादजीच्या तक्तावर बसणारानें आपल्या वकिला बरोबर इजिप्तच्या खेदिवाकडे तीन पत्रें पाठविलीं आहेत. एक खुद्द खेदिवास, दुसरें सुलतानास व तिसरें महाराणी साहेबांस अशीं आहेत. त्यांत खेदिवांच्या पत्रांत असा मजकूर आहे कीं मला महादजीचा वारस असें कबूल करावें नाहीं तर मी इजिप्तवर हल्ला करितों. सु० प०

मद्रास मध्यें युरोपियन आणि नेटिव यांनीं आपण परस्पर एक दिलाचे आहों असें दाखविण्या साठीं "फिजिकलट्रेनिंग आणि फिल्डगेम असोसिएशन" नांवाची सभा स्थापन करून एकमेकें एकमेकांचे [illegible] घालून खेळण्याची सुरवात [illegible] ज्ञानें कोठें प्रेम वाढणार [illegible] पणाचा देखावा सर. टी. माधवराव यानीं काढला असावा.

मद्रास युनिव्हर्सिटी मध्यें बी. एची परीक्षा झाली त्यांत युरोपियन आणि ईस्ट-इंडियन नापास होऊन सर्व नेटिव तेवढे पास झाल्यामुळें तिकडे मोठा गवगवा झाला आहे. म० मि०

आ. कॉ. त्रिं. तेलंग सी. आय. इ. यांस मि. टिरेल लीथ हे नाहींत तों पर्यंत कायद्याचे सरकारी प्रोफेसर नेमलें.

ना० मि० बोर्क मद्रासचे गव्हरनर यांनीं लार्ड कानेमरा हें ८पपद आपणास लाऊन घेतलें.

सुलतानें नवाझजंग व बदरूजंग यामध्यें असलेला तंटा मोडून टाकण्या करितां जे पंच मंडळ नेमलें आहे त्याकडे कोणत्याही पक्षाचे वतीनें कोणीं वकिली करूं नये असा निझाम साहेबांनीं ठराव केला आहे या ठरावांत काय मतलब आहे कोण जाणें.

हैदराबाद येथें पुढें व्यवस्था काय ठेवावयाची त्याचा खुलासा एका शिकंदराबादी पत्रानें केला आहे. एक कमिशन नेमावयाचें व त्यांजकडे दिवाणगिरी सोंपवावयाची. कमिशनांत एक दिवाण असावयाचा व त्याचे हाताखालीं दोन सरकारचे चिटणीस असावयाचे. कांहीं कामाचा निकाल करावयाचा तो तिघांच्या एक मतानें करावयाचा व त्यांचें एक मत होणार नाहीं तेव्हां खुद्दांचा सल्ला घेऊन काय तें करावयाचें याबर डेक्कन टाईम्स असें ह्मणतें कीं असलीं कमिशनें आज पर्यंत बरींच झालीं. परंतु तीं सर्व लयास गेलीं व याचें कारण असें कीं सर्व सत्ता जो कोणी मुख्य असेल व फार धूर्त, चाणाक्ष व हुशार असेल त्याज कडेस सहजीं जावयाची. ने ओ०

स्टांडर्डकर्ते ह्मणतात कीं, महाराज धुलीपसिंग यानीं गेजेटचे एडिटर मि० कयाटकाफ यांची मास्को येथें भेट घेतली. यावरून बखिरवानेट कर्ते सरकारास अशी शिफारस करितात कीं, सरकारानें महाराज धुलिपसिंग यांस पेनशन देऊन आपल्या हद्दींत ठेवावें. कां बरें? आतांच इतकी दया कोठून आली? महाराजांचा रशिया जवळ वशिला पोंचणें आपल्या सरकारास इष्ट नाहीं ह्मणून तर ही दया नसेलना? तसेंच असेल तर याला दया ह्मणण्या पेक्षां भीति ह्मणणें योग्य होईल. महाराजांशीं पाहिल्या पासून आपल्या सरकारचें वर्तन किती सरळ पणाचें व न्यायास अनुसरून आहे याचा विचार केला असतां महाराजांचे मनांत आपल्या सरकाराविषयीं पूज्य भाव नसणें सहाजिक आहे पण तें सरकारचें वांकडें काय करूं शकतील! रशियातल्या एका वर्तमान पत्रकर्त्याशीं महाराजांची भेट झाली एवढ्या वरून रशिया जवळ महाराजांचें वजन वाढेल अशी कल्पना करून त्या भीतीनें महाराजांस पेनशन देण्या बद्दल आमच्या बंधूनीं शिफारस केली असल्यास ती योग्य नाहीं.

विलायतेस जाणारी टस्मानिया नांवाची आगबोट नुकतीच बुडाली, तींत जोधपूरच्या महाराजांचे पुष्कळ मौल्यवान जवाहीर होतें तें सर्व सामुद्रार्पण झालें. या जवाहिराची किंमत सुमारें १२००००० रु. होती; परंतु हें जवाहीर फार जुनाट असून यापासून ऐतिहासिक ज्ञानाचा लाभ होणार हेता, यामुळें हे जवाहीर गेल्याने १२,००००० चेंच केवळ नुकसान झालें असें नाहीं; तर कोट्यावधि रुपयांचें नुकसान झालें असें ह्मणण्यास चिंता नाहीं. क० त०

आमच्या राणीच्या ५० वर्षांच्या कारकीर्दींत एकंदर दहा लढाया झाल्या. त्यापैकीं खरें पाहिलें असतां एकीचेंही कारण नव्हतें. त्या लढाया:– (१) न्यूझीलंड, (२) चायना, (३) झुलू, (४) सिंध, (५) शीख, (६) अफगाण, (७) ब्रह्मदेश (८) क्रीमी, (९) ईजिप्त आणि (१०) बो सोडन. पैकीं न्यूझीलंड तीनदा, चायना तीनदा अफगाण दोनदां ब्रह्मदेश तीनदा लढलेले आहे.

असाममध्यें जन्ममरणाची तऱ्हा कांहीं वेगळीच आहे. मुलींपेक्षां मुलांचेच जन्म फार होतात. मुलें लहानपणींच फार मरतात. व तरुण सरा सरी पसतीस चाळीस वर्षांचे होईपर्यंत वाचतात एकंदरींत पुरुषांपेक्षा स्त्रियांचीच संख्या तिकडे फार आहे. खासी लोकांची एक जात आहे, ते आजपर्यंत आपल्या मुलांना देवी काढून देत नसत परंतु गोरे लोकांच्या समजुतीनें त्यांचा हा दुराग्रह जाऊन ते आतां आपल्या मुलांचे प्राण देवीपासून वाचवीत आहेत.

सातारा येथील शिपायांची व वराकयांची तपासणी करून या ठिकाणीं जास्त लष्कर ठेऊन येथें डपार्टोमेंट करण्याचा सरकारचा हेतू आहे; आणि येथें लष्कर जास्त ठेवण्याचे ठरल्यास कोरेगांवापासून साताऱ्या पर्यंत आगगाडी किंवा बाफची ट्रामवे करावयाचा असून लष्कर जास्त ठेवल्यामुळें त्यास पाण्याचे संबंधानें फार गैरसोय होणार, यासाठीं हल्लीं येथील मुन्सिपालिटीनें कासेहून जास्त पाणी आणले, त्याबद्दल मुन्सिपालिटीचे समतोल कासेच्या पाण्याचा कारखाना सरकार आपले ताब्यांत घेऊन मुन्सिपालिटीस तीन लाख रुपये परत देणार अशी तजवीज करण्याचे ठरविण्यासाठीं नामदार सा० ची स्वारी येणार आहे.

मुंबईत एकंदर २१ बाजार आहेत. यांत १८ खाजगी बाजार आहेत, बाकी मुनिसिपालिटीचे ३ आहेत. पु० वै०

नवऱ्यानें बाहेर हकून दिल्यामुळें एका बाईनें आपले मुलाचा प्राण घेतला, असाएक खटला येथील माजी जज्ज मि. पार्सन यांच्या कारकीर्दींत आला होता, त्यावेळीं तउयानीं तीस फाशीची शिक्षा देऊन ती कायम करण्याकरितां मुंबई हायकोर्टाकडे पाठविली होती व त्यांत या बाईवर कांहीं मेहेरनजर करावी असें हीं लिहिलें होतें, हायकोर्टानें फाशीची शिक्षा रद्द करून जन्म ठेप काळे पाण्याची शिक्षा दिली व आजून ही हिच्याबद्दल मुंबई सरकारांनीं जन्म ठेपेची शिक्षा रद्द करून तिला ५ वर्षांची शिक्षा दिली.

हिंदुस्थानांतील नेटिव शिपायांच्या तर्फे हिंदुस्थान सरकारच्या हद्दींतील १२ आफिसर विलायतेच्या राणीच्या ज्युबिलीच्या वेळीं जाणार आहेत.

माजी दिवाण सर सालरजंग यांस निजामाकडून पेनशन मिळालें आहेच परंतु १८५७ सालच्या बेळची त्यांच्या वाडिलांची राजनिष्टा पाहून आणि त्यावेळीं निजामाचे साह्य मिळालें नसतेतर इंग्रजसरकारचें हिंदुस्थानचे राज्यलयास गेलें असते हे पाहून त्यांच्या चिरंजीवास हिंदुस्थानसरकारानें कांहीं जहागीर द्यावी असें एक इंग्रजी पत्रकर्ता ह्मणतो.

इंग्लंडचें राज्य १८८८ च्या वेळच्या दोन महिन्यांत फ्रेंच लोक खालसा करतील इंग्लंडचें आरमार समुद्रांत बुडून नाहींसें होइल. जसें एखाद्या जादुगाराच्या कांडीनें सर्व नाहींसें होतें तसें इंग्लंडचें राज्य व सर्व ऐश्वर्य नाहींसें होईल. नंतर इंग्लंडास अतिशय बिकट आटोका तह करून घ्यावा लागेला. इंग्लंडाच्या बहुतेक वसाहती खालसा करण्यांत येतील परंतु आस्ट्रेलियांतील लोक फ्रेंच राजा कबूल करणार नाहींत आणि अमेरिकेप्रमाणें प्रजासत्ताकराज्य सुरु करतील. सरशेवटीं रशिया हिंदुस्थान घेईल आणि इंग्लंडाचीं आरमारें, शिपायी लोक सर्व नाश पाऊन इंग्लंडास राहावयाकरित हाकीं गोल्याडाहा मिळावयाचे नाहीं आणि मग आपल्या सर्व नैभवांस आंचवून अगदीं अंधारांत पडेल असें एका फ्रेंच कोणीं आपलें भविष्य प्रसिद्ध केलें आहे. वरील गोष्टी स्वप्नींही घडावयाच्या नाहींत आणि तशी घडूं नयेत अशी आमची इच्छा आहे. ठा०म०

बंगाल्यांत २४ परगण्याचे डिस्ट्रिक्ट कोर्टांत एक बाई नकला घेण्या करतां गेली होती तेथील कारकुनानें तिजपाशीं लाच मागितली व ती देणार नाहींतर तुला दिवस भर हरवल्या कोठडींत कोंडून ठेवीन अशी धमकी घातली, [illegible] त्या नोकरींतून कमी करून फौजदारी खटला करण्याची परवानगी दिली आहे असें स्टेटसमना वरून समजतें. लांचखाऊनो, पहा हें!)

हिंदुस्थानची धनदौलत कोणी नेली बरें! इंग्रजांनीं ह्मणावें, तर राजद्रोह केल्याचा आरोप आंगीं येतो. तर तें करतां कामा नये! आह्मीं आपली धनदौलत खुषीनें इंग्लंडाकडे रवाना केली. लक्ष्मी सासरीं गेली आहे! आविवाहित मुली घरीं ठेऊं नये ह्मणून हिंदु शास्त्र रडतें, ह्मणून लक्ष्मीचा विवाह करून देणें भाग पडलें. आतां कां रडतां! कन्यादानाचें पुण्य स्वर्गीं उपयोगीं पडेल! असा एकानें विनोद केला आहे.

एखाद्या आफिसांत कारकुनाची नौकरी मिळल्यास मी करण्यास तयार आहे अशी मजकुराचें कोणी त्यानें टाईम्स आफ इंडियास पत्र पाठविलें आहे. न ०मि०

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

वर्षाचा आगाऊ रु० डाकहशील ०॥
साहत्माही " ३ " " ०॥८
साल अखेर " ७ " " १॥८
किरकोळ अंकास.......................०॥

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।

Per annum in advance 5 Postages 13a
Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly........... 3 " 8 as
Single copy............................. 4as

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 16 MAY 1887 NO 19

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख १६ माहे मे सन १८८७ इ० अंक १९

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ९ शके १८०९

## जुबिली संबधानें सरकारास अद्याप काय करतां येइल?

(मागील अंकावरून पुढें चालुं.)

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या इलाख्यांत कायदे करणारी मंडळी असल्याचें आमचे वाचकांस ठाऊक आहेच. या मंडळींपैकीं कांहीं आपले नेटिव लोक असतात, व कायदेकानु या सर्व मंडळीचे सल्यानें होत असतात. परंतु या संबंधानें आज पुष्कळ वाटाघाट चालू आहे कीं या मंडळींत ज्यास्त नेटिव लोक असावेत व याचें कारण हीं उघडच आहे. जे जे कायदे इलाख्या अगर ..र्व देशासंबंधी ठरतात ते ठरवितांनां प्रजेचें हिताहित जाणणारे व प्रजेची उणी व अमुक प्रकारची आहे असा ज्यांस अनुभव आहे असे लोक कायदे कौन्सिलांत जितके जास्त असतील तितके चांगलें. चांगले कायदे होण्यास ह्मणजे प्रजेच्या वास्तविक हिताचे कायदे होण्यासाठीं व त्या कायद्यांपासून प्रजेस खरोखर सुख वृद्धि व्हावी यासाठीं प्रजेच्या मताचे प्रदर्शक लोक जितके कौन्सिलांत जमले जातील तितकें प्रजेस बरें इतकेंच नव्हे तर राज्यास ही चांगले आहे. व ही गोष्ट इंग्रज सरकारास माहीत नाहीं असें ही नाहीं, व ही गोष्ट मनांत आणूनच थोडी बहूत नेटिव मंडळी कायदे कौन्सिलांत ठेविली आहे. परंतु जसजसा प्रजेचा अनुभव वाढत जात आहे त्या प्रमाणें त्यांस समजत चाललें आहे कीं हल्लीं पेक्षां ज्यास्ती व लोकांचे खरेंमत प्रदर्शित करणारे असेच लोक या कायदे कौन्सिलांत पाहिजे आहेत; बोलून चालून परदेशांतून आलेल्या लोकांस आपल्या अडचणी काय आहेत व आपल्या रिती भाती काय आहेत हे समजणें फार कठीण आहे; व समजल्या तरी त्यांनीं त्या सर्व गोष्टीस अनुलक्षून कायदे करणें हें ही कठीणच. या गोष्टी प्रजेच्या मनांत बिंबल्यामुळें आज हिंदुस्थानभर प्रजेनें बरेंच ... कायदे कौन्सिलांत नेमलेले ...सां ज्यास्त आहित व ते ही प्रजेनें कोणत्या तरी निवडणुकीच्या पद्धतीनें निवडावेत अशाविषयीं ओरड चालविली आहे. परवा नुकतीच जी मोठी राष्ट्रीय सभा कलकत्ता येथें झाली तींतही हा विषय निघाला असोन सर्वानुमतें असें ठरलें कीं कायदे कौंसिलांत निवडणुकीनें प्रजेच्या तर्फेनें लोक नेमले जावेत, त्यासंबंधानें प्रजेचे पुष्कळ दिवसापासून सर्व देशभर एकमत असून राष्ट्रीय सभे सारख्या महत्वाच्या सभेनें ही गोष्ट अवश्यक आहे असें ठरविलें असतांही सरकारनीं आजपर्यंत त्या गोष्टीचा विचार कां करूं नये? वास्तवीक म्हटलें म्हणजे प्रजेच्या खऱ्या अडचणी दूर करणें, व प्रजेचें खरें हीत लक्षांत आणून प्रजेचे वेळोवेळीं कोड पुरवणें हें राज्यनीतिचें मुख्य अंग आहे असा निर्विवाद सिद्धांत आहे, हे लक्षांत आणून आज इतके दिवसांचें प्रजेचे मागणें होत आहे त्याबद्दल योग्य तजवीज करण्याचा हल्लीच प्रसंग फार उत्तम आहे असें आम्हास वाटतें.

हिंदुस्थानांतील इंग्रजी पत्रकार व हिंदुस्थानचे आहित चिंतक जी दुष्टबुद्धि प्रधान मंडळी इंग्लंड देशांत आहे त्यांचे मात्र म्हणणें सदरहु हक्क प्रजेस न देण्याविषयीं आहे. परंतु राज्याची खरी तत्वें या लोकांस माहित नाहींत असें म्हटलें पाहिजे; प्रजेचें कल्याण हीच आमचे राज्याची मजबुती आहे असा जो राणी सरकारचा जाहिरनामा आहे त्याचे विरुद्ध इंग्रजी पत्रकार सरकारांस नेहमीं सल्लादेत असतात; व त्यांची एक ओरड आहे कीं हें मागणें जनसमूहाचे नाहीं. हिंदुस्थानांतील जनसमुहाचे मात्र आहे व म्हणून राष्ट्रीय सभेच्या म्हणण्यास कांहीं महत्व नाहीं. अशा प्रकारचा सल्ला हिंदुस्थानांतील गोरे लोकांस गोडवाटावयात नवल नाहीं. परंतु इंग्लंडांत राज्य हकणारी जी दूरदर्शी पुराण मंडळी आहे त्यांनीं खरोखर या गोष्टीचा विचार करणेंच आहे. हल्लीच्या आनंदाच्या प्रसंगीं आमच्या राणी साहेबांनीं ही देणगी येथील प्रजेस दिली तर खचित सभ्यास योग्य अशी देणगी होईल यांत संशय नाहीं. या देशावर लार्ड रिपन साहेबांनीं स्थानिक स्वराज्याचें बिजारोपण करून येथील प्रजेवर जो महदुपकार केला त्या संबंधानें पाहिलें असतां वरील दर्शीत केलेली देणगी पूर्वीं दिलेल्या हक्कांस उणीव आहे ती भरून काढल्या सारखे होईल. लहान लहान म्युनिसिपलकमेटच्या व लोकल बोर्ड यांतजर लोकांनीं निवडलेले लोक असावेत तर कायदे कौन्सिलांत अशा प्रकारचें लोक असणें कितिअवश्य आहे. व ही देणगी दिल्या खेरीज लोकांची तृप्ति होणार नाहीं. आपला एक मोठा हक्क सरकारनीं हे आपणांत देणें रास्त असून आपणांस ते देत नाहींत अशी प्रजेची समजूत होईल व त्यामुळें प्रजेच मनांत - अस्वस्थता व असमाधान उत्पन्न होईल. इतक्या गोष्टी होऊं देण्यापेक्षां सरकारानी या गोष्टीचा योग्य विचार केल्यास राजास व प्रजेस उभयतांस ही श्रेयस्कर व सभ्यास अनुचित अशी देगणी दिल्याचे श्रेय येणार आहे.

हें सर्व हिंदुस्थान देशीं संबंधानें झालें. परंतु यापैकीं वऱ्हाडप्रांतासही कांहीं अंश मिळाला पाहिजे. आमचे वाचकांस ठाऊकच आहेकीं आमच्या प्रांतास कोणताही कायदा लागूं करण्या पूर्वीं वऱ्हाडांतील स्थानिक सरकारास हिंदुस्थान सरकाराची मंजुरी घ्यावी लागते. नुकतेच झालेला पाटील पटवारी यांचें संबंधाचा कायदा व इतर कायदे या वरून लोकांस वऱ्हाडांतील लोकांचें तर्फेंन रेसिडेंट अगर गव्हर्नर यांचे पाशीं कौन्सिलर असण्याची अवश्यकता दिसूं लागली आहे. वऱ्हाडप्रांत धड इकडे ही नाहीं व तिकडेही नाहीं; अशी आमचे प्रांताची स्थिति असल्यामुळे येथील स्थानिक गोष्टीस अनुलक्षून जसे कायदे व्हावेत तसें होत नाहींत व तसें झाल्या शिवाय प्रजस न्याय मिळत नाहीं हे उघडच आहे. या सर्वांचें बीज हेंच कीं वऱ्हाडांतील लोकास कोणती उणीव आहे अगर त्यास कायदा कोणते प्रकाराचा पाहिजे या विषयीं हकीकत सरकारास कळविण्यास मार्ग नाहीं. ही उणीव कांहीं दिवसापूर्वीं स्थापित झालेली सार्वजनिक सभा स्थापन झाल्या मुळें कांहीं अंशीं दूर झाल्या सारखी झाली आहे. परंतु उत्तम पक्ष म्हटला म्हणजे वरती दर्शीत केल्या प्रमाणें कांहीं तरी योजना झाल्या खरीज व्हावा तसा फायदा होणार नाहीं.

(लिहून आलेला मजकूर.)

(मागील अंकावरून पुढें चालूं.)

सरकारच्या साध्या व सोईच्या युक्तीचा मतलब पाहिला तर फार्ग्युसन कालेज मोडावें, सरकारच्या मदतीनें डेक्कन एजुकेशन सोसायटीनें एक नवीन बोर्ड स्थापून त्या बोर्ड मधील दोघा युरोपियन प्रोफेसरांच्या अनुसंधानें डेक्कन कालेजची व्यवस्था करावी अशा म्हणण्याहून भिन्न असेल असें कांहीं दिसून येत नाहीं. वरील सुचनें प्रमाणें डेक्कन एजुकेशन सोसायटी कालेजची व्यवस्था करण्यास नाकबूल होईल तर सरकार यापुढें सोसायटीस वार्षिक ग्र्यांट्स वगैरे देण्यास अडणी व्हाणार नाहीं; कारण तसें झाल्यानें सरकारास ग्र्यांटसची रकम डेक्कन कालेज व सायन्स कालेज यांकडे ... ण्यास सांपडेल; अशा अर्थाची सो... ... ... ठे... विली आहे. सरकारचा आशय आतां उघड दिसून येत आहे; या ह्मणण्यास अनुमोदन देऊन सोसायटी मोठ्या हुरुपानें व ईर्षेनें स्थापन केलेलें फार्ग्युसन कालेज सरकारच्या मदतीच्या लालुचीनें लयास नेईल, व त्यामुळें आपल्या स्वातंत्र्याचा ऱ्हास करून घेईल, आणि आजपर्यंत सर्वांनीं वाखाणलेल्या त्यांच्या मूल मनोरथाच्या इष्ट सिद्धिचा नाद सोडून देईल, अशा बद्दल शंका घेण्याचें बिलकुल कारण नाहीं असें त्यांनीं ह्मणण्यास गेल्या 'केसरी' च्या अंकांत सोसायटीचे विचार प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून कांहीं हरकत येईल असें दिसत नाहीं. दुसऱ्या मुद्याच्या संबंधानें बोलतांनां लार्ड रे साहेब 'टेक्निकल एजुकेशन' देण्यासाठीं शाळागृहें स्थापून हा नवीन शिक्षणाची सुरुवात करण्यास आपली फारफार इच्छा असल्याचें प्रदर्शित करितात; पण त्यांना यावेळीं त्या संबंधानें कांहीं एक विशेष करितां येत नाहीं म्हणून ते फार दिलगीर आहेत. नवीन शिक्षण पद्धती अमलांत येणें अत्यंत महत्वाचें आहे. तथापि ही वेळ त्या कामाला अनुकूल नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट होय. या कामाप्रीत्यर्थ मुनिसिपालिटी ८० हजार रुपये देणार असून जुबिली फंडांतून ३९ हजार रुपये मिळणार आहेत; आणि आंच्या भरोस 'रीपन फंड' व 'जमशेटजी ट्रस्ट' मिळाल्यास बरेंच सोयीवार होईल. या बाबतींत काय व्यवस्था होते हें पाहण्याकडे तूर्त सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. तिसरी मुद्याची गोष्ट 'युनिव्हर्सिटी फायनल स्कूल' परीक्षा ही होय; ज्या विद्यार्थ्यांस पुढें कालेजमध्यें जावयाचें नाहीं व सरकारी नौकरी पत्करावयाची आहे त्या विद्यार्थ्यांसाठीं म्याट्रिक्युलेशन परीक्षे बद्दल ही दुसरी सार्टिफिकीट परीक्षा सरकारनें पसंत केली हें फार हितावह आहे.

## पुण्यांतील दाक्षिण विद्यालय.

पुण्या सारख्या शहरांत आज इतके दिवस सरकारी कालेजच काय ते होते ह्मणजे मुंबईस जशा मिशनरी वगैरे लोकांच्या पाठशाला आहेत त्याप्रमाणें पुण्यास नाहींत. परंतु आज थोड्या वर्षांपासून पुण्यास जी न्यु 'इंग्लिश स्कूल' काढणारी मंडळी आहे त्यांचेच खटपटीनें फार्ग्युसन या नावाचें विद्यालय पुण्यास वऱ्हाडांतून उंच ... घ ...

जाणारे विद्यार्थी डेक्कन कॉलेजांत जातात व मुंबईचे कॉलेजांत ही जातात. परंतु जातल्यांत हवापाण्याचे संबंधानें व खर्चाच्या मानानें पाहिलें तर आमचे प्रांतील विद्यार्थ्यांस पुण्याचें कॉलेज फार सोयकर आहे. यामुळें डेक्कन कॉलेजासंबंधानें जें काहीं होईल त्याविषयीं आमचे प्रांतील लोकांस उत्कंठा व काळजी आहेच. दरसाल आमचे येथील मुलें डेक्कन कॉलेजांत जाऊन अभ्यास करतात; व त्या कॉलेजांत जाऊन आलेले सर्व लोकांचें सांगण्यांत तें कॉलेज राहणें अगदीं इष्ट आहे असें वाटतें. मुंबई इलाख्यांतील लोकांत व विशेषेकरून पुण्याचे लोकांस आपले शहरांतून डेक्कन कॉलेज मोडूं नये असें वाटत आहे यांत काहीं विशेष नाहीं. हे कॉलेज मोडणें रास्त नाहीं व असें केल्यानें उच्च प्रतीचें शिक्षणास फार जबरदस्त धक्का पोंचल्या सारखें होणार आहे; अशाविषयीं मुंबई इलाख्यांतील प्रोफेसरकडून सरकारांस अर्ज गेल्याचें आमचे वाचकांस ठाऊक आहेच; व आम्ही हीं या संबंधानें पूर्वी लिहिलें आहे. मुंबई सरकारास व त्यांचे वरिष्ट म्हणजे हिंदुस्थान सरकार या दोन्ही सरकारांस खर्चाची तूट सालोसाल येत असल्यामुळें, खर्चाची चोहोंकडे काटकसर चालली आहे व त्यामुळेंच डेक्कन कालेजावर घाड येईल अशी भिती होती व ती अद्यापि अगदीं नाहींशी झाली असें म्हणवत नाहीं. निदान डेक्कन कॉलेज मोडलें नाहीं तरी सरकारचे मतांत तें कॉलेज डेक्कन एज्युकेशन सोसायटी या नांवाची मंडळी पुण्यास स्थापन झाली आहे तिचे स्वाधीन करण्याचें आहे; व त्याप्रमाणें त्यांनीं मंडळीस विचारलें, परंतु सरकार ज्या शर्तीवर तें कॉलेज मंडळीच्या स्वाधीन करणार त्या शर्ती त्यांस कबूल नसल्या कारणानें सदरे मंडळीनीं कॉलेज आपले कडे घेण्याचें नाकारिलें. फर्ग्युसन कॉलेज ज्या गृहस्थांनीं चालविले आहे त्या पैकींच कांहीं गृहस्थ ' डेक्कन एजुकेशन सोसायटी ' या नांवाचे मंडळीतील पुढारी आहेत; व यामुळेंच फार्युसन कॉलेज व डेक्कन कॉलेज एकांतएक सामिल करून दोन्ही एकत्र चालवावी व त्याची व्यवस्था सरकारचे तीन ग्रहस्थ व डेक्कन एजुकेशन सोसायटीचे सहा गृहस्थ असें नऊजण मिळून करावी असें सरकारचें म्हणणें होतें. सरकार २०००० रुपये देण्यास तयार होतें. त्यांत दोन प्रोफेसरच्या निमे पगाराची रकम १०००० व त्या शिवाय १०००० इतके रुपयेही देण्यास दरवर्षास तयार होतें असें असतां मंडळीनें ही गोष्ट नाकबूल कां केली याविषयीं प्रथम दर्शनी शंका वाटते. परंतु बारकाईनें पाहिलें असतां, असें दिसतें कीं येवढी सर्व २०००० रकम दोन युरोपियन शिक्षक ठेवावयाचें त्यांचे पगारांत जाणार. मग फर्ग्युसन कॉलेजाचे मंडळीस अगर त्यांचे डेक्कन एजुकेशन सोसायटीचे मंडळीस कॉलेज आपणाकडे घेऊन उपयोग काय! सरकारापासून वास्तवीक मदत कांहींच होत नाहीं. ... व्हूरनर साहेब यांनीं सांगितल्या सारखें भाषण केलें कीं कदाचित सोसायटीनें आमचें म्हणणें नाकारल्यास फर्ग्युसन कॉलेजास जी मदत देण्याचे या सरकारनीं कबूल केलें होतें ती देतां येणार नाहीं. यावरून सदरहू मंडळीनें हल्लीं कॉलेज घेण्याचे नाकबूल केल्यानें फर्ग्युसन कॉलेजास सरकारांतून निदान तूर्त तरी मदत मिळण्याचा संभव नाहींसा झाला. आतां सोसायटीनें कॉलेज घेण्याचें नाकारलें यांत म्हणजे त्यांस मोठासा दोष देतां येईल असें नाहीं; कारण ज्या शर्तीवर सरकार तें कॉलेज त्यांचे हवाली करणार त्या शर्ती बिलकूल फायदेशीर नाहींत. तरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे कीं त्या कामांत मुंबई सरकारांत ही मोठी अडचण आहे. खर्च तर कमी केला पाहिजे; लोकमत तर डेक्कन कॉलेज काढून टाकूं नका असें म्हणते. धंदे शिक्षणा करितां ही पैसा सरकारास द्यावा लागेल; व ही शेवटली म्हटली म्हणजे नवी बाब आहे. अशा स्थितींत फर्ग्युसन कॉलेजास हो सरकारनीं आश्रय न दिला तरी त्यांस मोठासा दोष देतां येणार नाहीं. परवा एजुकेशन कमिशन बसलें होतें त्यावरून हिंदुस्थानांत उच्च प्रतीच्या शिक्षणाकडे पैसे खर्च पुष्कळ होतात व त्या मानानें आद्य शिक्षणाकडे होत नाहींत; व धंदे शिक्षणाचे संबंधानें तर सरकार आजपर्यंत कांहींच म्हणण्यासारखा व्यय करित नव्हते. उच्च प्रतीचें शिक्षणास पैसे अगोदरच बरेच खर्च होत आहेत; अशा स्थितींत फर्ग्युसन कॉलजचे मंडळीनीं डेक्कन कॉलेज घेण्याचें नाकारल्या मुळें सरकारची मदत त्यांस देतां येणार नाहीं असें सरकारनीं सूचविलें यांत आम्हास विशेष नवल वाटत नाहीं. सरकारचें घरांत म्हणजे द्रव्य भांडवल भरलें आहे असें नाहीं; तेव्हां पैशाचे संबंधानें विशेषें करून ज्या खर्चाच्या बाबी उत्पन्न करण्याचें संबंधानें काय करणें तें. फारविचारानें केलें पाहिजे हें सर्वांस कबूल करावे लागेल. सरकारचें वर्तनाचा विचार करतांनां याही गोष्टीचा विचार केला पाहिजे. सरकारास दृष्टी चोहोंकडे सारखी ठेविली पाहिजे. आतां कदाचित कोणी असें म्हणतील कीं मुंबई सरकारनें मदत देण्याचें कबूल केलें असून आतां नाकारणें हें रास्त नाहीं, परंतु आज खर्चाच्या संबंधानें सरकारची स्थिती बदलली असतां ही त्यांनीं पूर्ववत सर्व व्यवस्था कायम कशी राखावी? जर सरकारास डेक्कन कालेज राखण्या करितां हल्लीं आहे तो खर्च ठेवावा लागेल तर पूर्वी मदत देण्याचे कबूल केलें असतां ही सरकारच्या व सोसायटीच्या दरम्यान न जमल्या मुळें सरकारनीं मदत देण्यास नाकबूल होणें हें गैर आहे असें आम्हास वाटत नाहीं.

या संबंधानें दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं सरकारला जर पैशाची टंचाई आहे व डेक्कन कालेज तर राखणें आहे. तर त्यांनां कदाचित दुसरी फायदेशीर व्यवस्था करण्याचा प्रयत्न करावा लागेल. म्हणजे डेक्कन कालेज " सोसायटी " आपले कडे घेणार नाहीं तर कदाचित् कोणी मुंबईचे मिशनरी लोक हें कॉलेज घेण्यास तयार होतील. या देशांतील शिक्षण मिशनरी लोकांचे हातांत जाण्या विषयीं ते किती उद्युक्त असतात हें सुप्रसिद्धच आहे. व त्यांचे हातीं या देशांतील तरुण मुलांचें शिक्षण जाणें इष्ट नाहीं ही गोष्ट ही बहुत करून सर्वत्र कबूल आहे; व सरकारासही सोसायटीचे नाहीं म्हणणे पथ्यावर पडल्या सारखे होईल; कारण "सोसायटी" कालेज घेत नाहीं तेव्हां सरकारनीं काय करावें असें म्हणण्यास त्यांत अवकाश होईल. असो ही गोष्ट पुढची आहे; आज त्याची इतकी भिती नाहीं परंतु कदाचित मिशनरी लोकांकडून मुंबई सरकारास आपण कॉलेज घेण्यास तयार आहों अशी सुचना जाईल व तशी गेली असतांनां मात्र सोसायटीनें कॉलेज आपले कडे न घेण्याचा जो विचार आजठरविला आहे त्याचा पुनः विचार करावा लागेल.

डेक्कन कालेज ठेवून फर्ग्युसन कॉलेजास मदत देऊं नये असें नाहीं. तसें होण्या जोगें असल्यास तसें नकरणें ही सरकारची चूक होईल. डेक्कन कालेज व फर्ग्युसन कालेज याज मध्यें विरोध भाव मुळींच नाहीं व म्हणूनच सरकारी मदत नसतां ही ' फर्ग्युसन कालेज ' डेक्कन कालेजाशीं टक्कर मारण्यास उभें रहाणार या केसरीकारांच्या म्हणण्यांत विशेष यथियता वाटत नाहीं. दोन्ही कालेजांचा हेतु एकच आहे. सरकारानें एकास मदत केली व दुसऱ्यास द्रव्याच्या अडचणी मुळें किंवा इतर कारणांनीं तूर्त मदत न दिली तरी त्यांत कॉलेजाचा परस्पर विरोध असण्याचें कांहीं कारण नाहीं. फर्ग्युसन कालेजाची योग्यता जसजशी लोकांस दिसून येईल त्या प्रमाणें त्यास मदत खचीत मिळेल.

---

## उमरावती म्युनिसिपाल कमेटी

---

हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागल्या मनुष्याच्या स्थितीसारखी उमरावती म्युनिसिपाल कमिटीची अवस्था झाली असल्याचें समजतें. म्युनिसिपालिटीचे हद्दीतील नाकीं उठवून त्यामुळें सुमारें सालीना साडे सात हजार रुपयांचें झालेलें नुकसान कोणत्या मार्गानें उत्पन्न करावें हा विचार तूर्त चालूं आहे असें म्हणतात. नाकीं किती उतावीळपणानें बंद केलीं व त्यास काय कारण झालें हें आमचे वाचकांस माहीतच आहे. त्याची पुनरावृत्ति करण्याचे कारण दिसत नाहीं. अशा उतावीळपणानें कमिटीनें आपलें एकदम नुकसान करून तर घेतलेंच पण या घाईत हीं नाकीं उठविण्यास कायदेशीर रितीनें अधिकार आहे किंवा नाहीं याचाही विचार करण्यास देखील कमिटीस फुरसत झाली नाहीं. वऱ्हाड प्रांतांतील मुनसिपालिट्यांचा नवीन कायदा मागील जानेवारी रोजीं अमलांत आला; व तो कायद्याचा हुकूम उमरावतीचे मुनसिपालिटीस रेसिडेंट साहेबांनीं लागूं केला. हा कायदा लागूं केल्यानंतर होणारीं सर्व कार्यें व वहिवाटी नवीन कायद्याप्रमाणें होणाऱ्या आहेत. तद्विरुद्ध झाल्यास त्या बेकायदा असें समजलें पाहिजे. या कायद्याचें कलम ४५ या प्रमाणें पाहतां जे कर रेसिडेंसाहेबांचे मंजुरातीनें बंद करतां येतील त्यापैकीं नाकाकर किंवा टाक्स हा कर आहे म्हणून हा कर रेसिडेंट साहेबांचे मंजुरातीनें बंद केल्यास मात्र तें बंद करणें कायदेशीर होईल. कोणी शंका घेईल कीं नाकाकार हा जुन्या कायद्याप्रमाणें बसविलेला होता म्हणून तो बंद करण्यास नवीन कायद्यांत ठरविलेले नियम त्यास लागूं नाहींत. ज्यास ही शंका असेल त्यांनीं नवीन कायद्याचें कलम ९४ हें पाहावें म्हणजे त्यांची शंका निवारण होईल. या कलमा प्रमाणें पाहतां, जुन्या कायद्याप्रमाणें बसविलेले जे सर्व कर नवीन कायदा अमलांत येते वेळेस चालू असतील ते सर्व कर जसे काय नवीन कायद्याप्रमाणें बसविलेले आहेत असें समजावें, असा साफ ठराव केला आहे. आम्ही म्हणतो या प्रमाणें जर नवीन कायद्याचा अर्थ असेल तर नवीन कायदा न पहातां किंवा योग्य सल्ला न घेतां नाकाकर बंद करण्यांत आपलें शिरावर कमिटीनें मोठी जबाबदारी घेतली आहे. आणि म्युनिसि० ची नुकसानी केल्या बद्दल रेटपेयर पैकीं जर कोणी कमिटीस जबाब विचारील तर ती गोष्ट कमिटीस जड जाईल असें दिसतें.

अधिकार असून म्हणा किंवा नसून म्हणा कमिटीनें नाकाकार उठविल्यानें उत्पन्नांतून कमी झालेले साडेसात हजार रुपये आता कसें उत्पन्न करावें हा महत्वाचा विचार आहे. असें समजतें कीं मामूल साधारण आवश्यक कामासाठीं सुमारें ४३ हजारांची रकम जरूर पाहिजे. चालू सर्क्युलरा प्रमाणें अंदाजा वसुलाचा सहावा हिस्सा शिल्लक ठेवून बाकीचें उत्पन्नावर हा खर्च भागला पाहिजे. परंतु सन १८८७—८८ साला बद्दल अंदाजा उत्पन्नांतून नाकाकरा बद्दल अंदाजलेलें उत्पन्न वजा करितां शिवाय बाकीपैकीं एक षष्ठांश शिल्लक ठेवितां उत्पन्न ३१ हजारां पावेतों रहात असल्याचें ऐकतों. तेव्हां सुमारें चालू साला साठीं आठ हजार रुपये कसे तरी उत्पन्न झाले पाहिजेत. ज्या अर्थी मामूल खर्चांत कमी करण्यात मार्ग नाहीं त्या अर्थी ज्या पासून सुमारें आठ हजार रुपये सालीना उत्पन्न होईल असा एक किंवा अनेक नवीन कर बसविणें जरूर आहे. नवीन कोणता किंवा कोणते कर बसविणार हें समजलें नाहीं. परंतु सर्व प्रकारच्या गाड्यावर सालीना कर, किंवा सट्याचा व्यापार करणारावर, किंवा उमरावती शहरांत येणारें खाण्यापिण्याचे पदार्थांवर आवट्राय कर किंवा परवडी हे बसवावे अशा बद्दल कांहीं लोकांनीं सुचना केल्याचें एकतों.

कोणते कर बसविणार हें खात्री लायक समजल्या नंतर वाटलें तर या संबंधानें आम्हास योग्य दिसतील त्या सुचना आम्ही करूं. परंतु नवीन कर बसवून त्या पासून उत्पन्न वसूल होऊन तें चालूं साठीं उपयोगी पडेल कीं नाहीं याची आम्हास मोठी शंका आहे. कारण कर बसविण्यास पूर्वी पुष्कळ संस्कार होण्याचे आहेत. कांहीं करास रेसिडेंट साहेबांची मंजुरात व कांहींस हिंदुस्थान सरकार ... घ ५ ...

णच्या गव्हर्नर जनरल आफ् इंडिया इनकौन्सिल यांची मंजुरात घेतली पाहिजे. कोणते कर बसविण्याचे याचा विचार या संबंधानें कमिटीचे सर्व मेंबर लोकांचा होऊन एक वाक्यता झाली पाहिजे. अमुकअमुक कर बसवावा असा कमिटीनें ठराव केल्यावर त्याची जाहिरात दिली पाहिजे त्यावर कोणाच्या तकरारी असल्यास त्या ऐकण्या साठीं मुदत देऊन त्या ऐकून त्यांचा निकाल केला पाहिजे- नंतर मंजुरातीसाठीं रेसिडेंट साहेबां कडे किंवा हिंदुस्थान सरकारांकडे तें प्रकरण गेलें पाहिजे. मंजुरात मिळाल्यात कर बसविण्याचा. शिवाय अशी एक दुसरी अट आहे कीं नेमाधिक कर आहेत ह्मणजे वर्षांतून एकदां वसूल करण्याचे ते ज्या वर्षांत घेण्याचे त्या वर्षांचे आरंभा पूर्वी ते घेण्या- बद्दलचा ठराव निदान एक महिना तरी अगाऊ कमिटीनें प्रसिद्ध केला पाहिजे.

या करितां उमरावती म्युनिसिपाल कमिटीस आमची अशी शिफारस आहे कीं, जर त्यांना चालू सालींच नवीन करवसून याच सालांत तो किंवा ते वसूल होऊन तो पैसा उपयोगीं पडावा अशी इच्छा असेल,तर जे कर बसविण्याचे ते सहा माहीं करून ते बसविण्या बद्दलची अखेर जाहिरात येत्या सप्टंबर महिन्याचे पहिले तारखेचे पूर्वी प्रसिद्ध होण्याची तजवीज ठेवावी.

पण या कमिटीचे संबंधानें आम्ही आणखी दुसरी गोष्ट ऐकतों कीं चालू असलेले कर वसूल करण्याची योग्य व्यवस्था न केल्यामुळें मागील सालची पोलीस पट्टी व पाण्याचा कर हे वसूल होण्या सारखे असून, अंदाजलेले रकमे पैकीं मागील साल संपण्या पूर्वी त्यांचा चौथा हिस्साही वसूल झाला नाहीं. खरोखर अशी स्थिती असल्यास कमिटीनें अजून तरी योग्य तजवीज करावी. मागिल बाकी वसूल करण्या साठीं योग्य तजवीज केल्यास कदाचित् चालू सालीं नवीन कर नबसवितां खर्चा पुरतें उत्पन्न होऊं शकेल असा आमचा अनुमान आहे.

## ब्रह्मदेश

(लिहून आलेला मजकूर.)

आवाचें राज्य औरस चौरस फ्रान्स राष्ट्राहून मोठें असून त्याची लोकसंख्या सुमारें ४०,००,००० आहे. हें राज्य आमच्या सरकारनें दहा हजार सैन्या पेक्षां कमी सैन्यानिशीं हल्ला करून व लढाईंत शत्रू कडील लोकांच्या प्राणहानीशीं तुलना करून पहातां सरकारच्या लष्करांत प्राणहानि फार न होतां व विशेष प्रतिबंधा शिवाय सर्व राष्ट्र काबीज करण्यास एकंदर खर्च १,९०,००० पौंड लागला असावा असा अंदाज आहे. मंडाले येथें जनरल प्रेंडरग्रस्ट यांच्या लष्कराची छावणी तळ देऊन बसल्यावर व राजा थिबा यांस हिंदुस्थानांत कैदेंत टाकिल्यावर कांहीं वेळ पावेतों हा देश ब्रिटिश सरकारच्या निर्बाधपणें ताब्यांत आला असें वाटूं लागलें होतें; परंतु सर्व राष्ट्रभर शांतता ठेवण्या करितां १०,००० हजार पेक्षां ही ज्यास्त लोक ठेवावे लागले व शिवाय त्यांच्या मदतीस मिलिटरी पोलिस द्यावें लागलें; एका वर्षाहून अधिक वेळ दंगाधोपा चालला आहे; व मधून मधून परस्परांच्या चकमकी होत आहेत. ह्या मागील रणकंदनांत ब्रह्मी लोक किती मेले हें कळलें नाहीं तरी आपल्या सरकारचे १,००० हून अधिक लोक मरण पावले; धामधूम व बंडावा मोडण्या साठीं १०,००,००० पौंडाहून अधिक खर्च लागला आहे; व अद्याप ब्रह्मदेशांत व्हावी तशी शांतता झाली आहे असें ह्मणतां येत नाहीं. सोप्या लढाईनें जिंकिला खरा तरी तो देश पूर्णपणें कबजांत येऊन ब्रिटिश राज्यास सामील करण्यास एवढें महत्प्रयास पडून ही आज मितीस फार कठीण पडलें आहे, याचीं कारणें अमुक अमुक असावींत हें शोधून काढणें महत्वाचें असून येच्या मौजेचें होणार आहे.

(पुढें चालेल.)

# The Berar Samachar

MONDAY MAY 16 1887.

## THE DECCAN COLLEGE RE-VISITED.

(Communited.)

It was early on the morning of 7th May that a friend and I drove to the Deccan College for the annual Gathering. The fresh morning breeze and a clear sky raised our spirits as we drove along, underneath the beautiful row of trees arching high ahead on the road side leading to the Bund Gardens and fascinating the eye with their verdure. The Bund garden presented an appearance of perfect freshness and rather uncommon quiet at that early time of the day and we were infused with the fragrance from the trees around us. After pausing a while at the Bunds, we drove on over the bridge leading across the river to the College beyond and the early rays of the rising dawn tipped the flow of water from the Bund with a variety of tints and made the water drops sparkle like so many gems. Onward we moved-our hearts eager to see the Deccan College. The last turning round the hill intervening brought us in view of the College buildings towering high up in the air. At last we actually stood under the College portico and were rather sorry to be robbed of our pleasant emotions just then rising within us, as we got down the carriage. All was quiet; there was the pleasant, neat little garden laid out in the front with the small fountain in its middle. It was only 8 years we had seen it last and there has been hardly any change in the front premises of the buildings or in the buildings since; only the lawn-tennis Court has been laid out in front of the garden and the banyan tree has umbrageously spread during the interval. After walking about a little here and there we felt as if we were in our element and were half inclined to frisk and bound like innocent lambs on an open. Most of the resident students have eft the College in the vacation and we hardly met any body until we went to the door of a room; off went the door with a bang and a student greeted us with a welcome as he presumed we had come for the Gathering. We soon came across more students and as we took tea, many carriages were fast coming in bringing lots of students new and old. The morning was taken up in swimming in the river a quarter of a mile behind the College Buildings— although we did not claim to be even novices in the art and were therefore standing on the shore and hallooing out to those in water. A couple of water-melons brought from the plantations served as a pleasant refreshment and we came back to College to play at the tennis Courts. We played until ten, when the sun was rather warm, and we played at chess and cards. Every body was tired of these indoor amusements at about twelve especially as hungry mouths craved for something substantial. A hearty meal of about forty people together is very enjoyable and the company rising at one o'clock, we went the round of new-students making acquaintances amongst the fresh bath. There were two Parsees and one Mohammedan amongst the number and it was delightful to see how they all enjoyed each others company. In the evening some amused themselves at the Boat club and some at the tennis Court and almost all were present at Dr. Bhandarkar's lecture. After evening meals we set out to town and went to the theatre to see the 'Sangit Shakuntala' a play so popular in Poona that not one seat was vacant in the Theatre which was overcrowded-Hall, pit and gallery. The next morning we had a nice walk back to College and after the morning amusements, we had a rather late though very hearty dinner at which about sixty members of the College old and new were present. After meals the company were treated to a singing party and we then left the others who were playing under the shade, and went to the tower of the College. The scene from the College Tower is simply picturesque. The winding river with its shaded banks and the Poona city lying before you covered in dark green trees lit up with the glorious light of the noon-day sun. Rising from amidst these were the top of the Sasson Hospital and the Syaogogue and many other high buildings bathed with the effulgence of the Mighty Orb. Strange recollections of the days we had spent at College, came to us just then, and we felt the contrast there was between the busy and sorry world and the easy life that we once led at College. It cost us a pang to give up all these happy memories and ideas as we dashed down the stair case. In the evening we had the usual proceedings of our Gathering and a lecture, by Mr. B. M. Puranik B. A. which was rather interesting, ended the day's work. It was happy to mark the presence of Shrimant Balasaheb Chief of Kurundwad, once a student of the College and who always takes a very great interest in the good of the College. I forgot to mention that we saw the old barber of the College, the milkman and the old chaprasi Pandoba who is as old as College itself. We all parted in the evening, bidding farewell to each other.

## वऱ्हाड,

हवमान—हवेंत उष्णता बरीच आहे; रात्रीं किंचित् गारवा असतो. रोगराई म्हणण्या सारखी नाहीं. तथापि उन्हाचे तापानें बरेच लोक आजारी होतात व कित्येक मरतात.

कर्नल आर. बुक्क डे० क० उमराव ती हे गेले आठवड्यात तीन महिन्याचे हक्कांच रजेवर विलायतेस गेले. त्यांचें काम ले० क० आर. एस् थामसन हे पाहात आहेत.

हिंगोली येथें झालेल्या खुनाच्या मोकदम्यांतील कैदीत मोकदम्याची चौकशी होण्या करितां येथील तुरुंगांत अटकेंत ठेविले असतां त्यानें आपले गळ्यास फास लावून घेऊन प्राण दिला.

येथील डे० क० आफिसांतील पर्सन क्लार्क रा० रा० व्यंकटेश कृष्ण देसाई यांस एलिचपूरचे डे० क० आफिसांत सेकंड क्लार्क नेमिलें; व ते आपले नवीन जागीं रुजू होण्या करितां गेल्या आठवड्यांत एलिचपुरास निघून गेले. त्यांचे जागीं येथें एलिचपूर डे० क० आफिसांतील क्लार्क मि० रामया यांस नेमिलें. नेहमीं बाहेरील लोक बहुतेकांचे जागेवर आणिल्यामुळें आफिसांतील हुशार लोक असतात त्यांची नाउमेद होते; या गोष्टीकडे आमचे डिपुटी कमिशनर साहेब लक्ष देतील.

अफू—सोलापुर जिल्ह्यांतून निजामाचे राज्यांत जाते, असा अर्ज कस्टम कमिशनर यांजकडे झाल्या वरून, सोलापूरचे कलेक्टर साहेबांनीं पोलिस सुपरिंटेंडेंट यास लिहून, त्यांणीं स्पेशल फौजदार पाठवून चौकशी सुरू असल्याचें कळतें. काय होईल तें पहावें. व पुढें निजाम सरकारही इकडील प्रमाणें टेंडरें घेणार असेंही कळतें.

### नोटीस.

रा. रामा वल्लद भवानी लिंगाइत कुणबी राहणार पारस तालुके बाळापूर यास नोटिस देणार नारायण वल्लद माहादाजी फुलमाळी राहणार पारस नोटिसीनें असे कळवितो कीं, तुमच्या आमच्या मधील कडबा आद्मास पेंड्या ३००० चा गुड आहे. त्यांत दोन हिशे आमचे व एक हिसा तुमचा आहे. तर नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत तुमचें हिशाचा कडबा आदमासे एक हजार पेंडी घेऊन जावा असे न केल्यास त्या बद्दल आमच्या हिशाची नुकसानी तुमचे हयगई मुळें होइल ती कोर्टांत काम चालून ह्या नोटीशीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जे नुकसान होईल ते घेतले जाईल. सदरील कडबा राखणें बद्दल आज च्यार महिन्याची राखणावळ दरमहा रुपये ५ प्रमाणें रुपये २० वीस आणून द्यावेत व निकाल करावा कळावे.

सही

नारायण वल्लद माहादाजी फुलमाळी राहणार पारस.

## वर्तमानसार.

अफगाणिस्थानाबद्दल आजपर्यंत पुष्कळ गोष्टी बाहेर पडल्या आहेत. कोणी एक फ्रेंच मुशाफर असें म्हणतो कीं ज्यावेळीं मला अफगाण सरहद्दीवर पकडलें त्यावेळीं इंग्लिश सरहद्दकमिशन मुक्षारीचेरीक येथून काबूल येथें जात होते. ह्या कमिशना पासून तेथील प्रजेस कोणत्या प्रकाचा फायदा झाला नाहीं. अफगाण लोक इंग्लिश लोकांवर नेहमीं शत्रू प्रमाणें टेहळणी ठेवतात; सरहद्दीचे संरक्षण करण्याकरितां ज्यावेळीं इंग्रज फौज हिरातेस होती त्यावेळीं तींतील कोणासही गावांत येण्याची परवानगी नव्हती; परंतु त्यांस नेहमीं आपल्या तंबुतच राहण्यास भाग पडत असे; कामिशनच्या कोणच्याही मेंबरास परवानगी वांचून काबुलांत येण्याची सक्त मनाई होती. हें कमिशन काबूलच्या हद्दीचा बाहेर राहत असे; आणि ह्यावरून त्या कमिशनावर त्या लोकांचा मुळींच भरवसा नाहीं असें मला वाटतें. काबूलचा अमीर अबदुल रहिमान फार शहाणा असून लोकांवर त्याचें चांगलें वजन आहे. अबदुल रहिमान याणें आपल्या राज्यांत तोफा पाडण्याचे कारखाने घातले असून, एका आठवड्यांत तो १०० तोफा पाडतो. सरशेवटीं मी इतकेंच म्हणतों कीं अबदुल रहिमान हा चांगला कीं वाईट याची कल्पना लवकर करावयास सांपडेल. एक इंग्रजी पत्रकर्ता म्हणतो का अफगाणिस्थानांत जी हल्लीं गडबड उडून गेली आहे तीमुळें तेहेरान येथील लोकांचे डोळे अयुबखानाकडे लागले आहेत. अयुबखान हा लवकरच सैन्यानिशीं पुढें येईल व अफगाणिस्थानचे राज्य न मिळाल्यास हिरातचे तरी तो बळकावून बसेल असा तेहरान येथील लोकांचा समज झाला आहे; व काबूलचा अमीर जर त्यास हिरातचें राज्य घेऊं देणार नाहीं तर हिरात येथील लोक त्यास राजा करतील; लंडन टाईम्सच्या बातमीदाराचें म्हणणें आहे कीं आपली सरहद्द कायम राहावी व तींत रशियांस हात घालतां येऊं नये म्हणून अमिरानच गल्झी लोकांचा दंगा उत्पन्न केला आहे असा सरहद्दीविषयीं तोडजोड करण्याकरितां आलेल्या रशियन कामगारांस संशय आला आहे. वरील गोष्टीचा विचार केला म्हणजे आज अफगाणिस्थानांत बरीच चळवळ उडून गेली आहे. जसे एखादा बागुलबोवाचें भय रडक्या पोरांस दाखवावयाचें तसेंच रशिया हा आपल्या सरकारास बागुलबोवाच झाला आहे; मग जसा तो रडका पोर आईजवळ म्हणतो कीं आईग येतो बघ माझ्या आंगावर बागुलबोवा येतो आहे, मी कधींकधीं हट्ट करणार नाहीं, पण मला या बागुलबोवापासून सोडव. तसेंच आमच्या सरकारानें हिरातचा किल्ला मजबूत तर करून दिलाच आवर शिपाई ठेवलेच, दारू गोळा अमीर मागेल तितका दिला, सरहद्द ठरविण्याकरितां कामिशन नेमलेंच व अशाच कित्येक गोष्टी केल्या. ह्या कशासाठीं तर तो रशियन बागुलबोवा आपल्या आंगावर येऊं नये म्हणून ह्या सर्व गोष्टी न करतां हिंदुस्थानांतील लोकांस व मुख्यत्वेंकरून राजेरजवाड्यांस त्यांच्या पोलिटिकल एजंटापासून सोडविलें असते किंवा लोकांस राज्य कारभारांत हात घालण्याची परवानगी देऊन सुखी केले असते तर आज अमिराची हाजी हाजी करण्याचा पाळी आली असती का?

शिनवारी लोकांनीं अमिराचा दोन ठिकाणीं पराभव केला. हे शिनवारी लोक लैवरपास व जलालाबाद येथें रहाणारे आहेत. ह्या दोन ठिकाणीं अमिराच्या सर्व सैन्यास ह्या लोकांनीं कैद करून त्यांच्या जवळील हत्यारें घेऊन त्यांस सोडून दिलें, व त्यांपैकीं पुढाऱ्यास ठार मारिलें. ही बातमी जलालाबादेस कळतांच तेथून कांहीं फौज शिनवारी लोकांवर पाठविण्यांत आली; पण ही फौज तेथें पोंचते आहे तोंच शिनवारी लोक डोंगरांत पळून गेले. अमिराच्या १०० लोकांचा नाश झाला. काबूल येथें फौज गोळा करण्याचें काम मोठ्या सपाट्यानें सुरूं आहे. अफगाणिस्थानांत अजून गडबड चालू आहे. आणि ह्या गडबडीचा परिणाम काय होईल हें अजून पक्के पणी सांगता येत नाहीं ह्यावरून अफगाणिस्थानांत एकट्या गिलझी लोकांचाच दंगा नसून दुसरे लोकही दंगा करण्यास प्रवृत्त झाले आहेत. ह्याचें कारण काय? अमीर इंग्रजांस फितला हे तर नसेल ना? किंवा त्यांत रशियाचें पाठबळ आहे?

अफगाणिस्थानांतील इंग्रजसरकारचे वकील कर्नल अशेलाखान हे पेशावरास होते ते आतां एकदम काबूलास निघून गेले.

नार्थ वेस्टप्रांताच्या कायदे कौन्सिलाची सभा लखनौ येथें भरली होती; त्या सभेंत हल्लीं चालू असलेली कायद्याची भाषा अधिक अकुंचित करावी अशाबद्दलचा एक ठराव झाला. हल्लींची भाषा कोती असल्यामुळें वकिलास अर्थाचा अनर्थ करतां येतो हे आपण नेहमीं पाहातो आणि त्यांस ही आकुंचित देणें फार वाईट आहे.

बर्फा वरून भराभर जातां यावें म्हणून गलब तासारखीं अवजारें लावलेल्या गाड्या अमेरिकेंत तयार झाल्या आहेत.

अपघातानें किंवा आत्महत्या करून मेलेले लोक कोणाचे कोण हें समजत नाहीं, असें हमेषा घडतें. ह्मणून त्यांचीं प्रेतें कितीएक दिवस पर्यंततशींच टेवावीं लागतात. त्यांस किडे पडूं नयेत ह्मणून परिसामध्यें त्यांस यंत्रांत घालून खूब गारठवतात; आणि मग लोकांनीं त्यांस ओळखून न्यावें ह्मणून त्यांस उघड्यावर ठेवितात. अशीं गारठवलेलीं प्रेतें कितीएक महिनेपर्यंत जशींचीं तशींच राहतात.

ठा० अ०

इंग्रज व रशियन सरकार मधील अफगाण सरहद्दीच्या संबंधांचा वाद दोनही पक्षांचे कमिशनर नेमून तोडण्याचें ठरलें होतें; परंतु दोनही पक्षांचे लोक आपले म्हणणें सोडीत नसल्यामुळें या तंट्याचा निकाल आपसांत होण्याचा संभव नाहीं असें जर्मन सेंट पिटर्सबर्ग ग्याझेटवरून समजतें.

अमेरिकेंत मि. पार्क नांवाच्या एका शेतकऱ्यानें आपल्या शेतांत काम करण्यास सात वानरांस शिकविलें. हीं वानरें मनुष्या पेक्षां काम जलद करीत असून एक चतुर्थांश खर्च कमी लागतो असें त्यांच्या अनुभवास आल्यावरून या शेतकऱ्यानें या जातीचीं आणखी १० वानरें आफ्रिकेंतून मागविलीं आहेत असें म्हणतात.

हिंदुस्थानांत कोणतीं झाडें झुडपें व वनस्पती निपजतात यांची पहाणी व शोध लावण्याच्या उद्देशानें एकंदर देशाचे चार भाग करून सरकारानें त्यावर चार युरोपियन कामांत मर्मज्ञ अशा चार अमलदारांची नेमणूक केली आहे.

नेपाळांतून आलेल्या लोकांस इंग्रजसरकार आसामांतील ओसाड जमीन तीन वर्षें पर्यंत सारा न घेण्याच्या करारानें देऊन नेपाळी लोकांस तेथें वसाहत करण्यास उत्तेजन देत असल्याचें समजतें.

चीन सरकारानें लढाईच्या प्रसंगीं उपयोगीं पडण्यासारखीं दोन विमानें तयार केलीं आहेत असें ह्मणतात.

पंजाबांत गेल्या सालीं ३१ नवीन वर्तमान पत्रें सुरू झालीं असें म्हणतात.

प्रोफेसर माक्समुलर हे जिमेस ८०० शिरा आहेत असें ह्मणतात.

मद्रास शहरांत राहणारा गवंडीकाम करणारा मिस्त्री कंजेंद्रराम चेलापा यांनीं विहीरींतून पाणी काढण्याच्या नवीन कमानी करण्याची युक्ति काढली त्याबद्दल हिंदुस्थान सरकारानें त्यास पेटंट दिलें.

महाराज धुलिपसिंग यांनीं पारिस येथून प्याट्रिक केसी नांवाचा पासपोर्ट मिळवून रशियांत जाण्यास निघाले, परंतु बर्लिन येथें त्यांचा पासपोर्ट व ३० हजार फ्रांक चोरीस गेले तरी रशियन अधिकाऱ्यांनीं त्यांस पासपोर्टाशिवाय मास्कोपर्यंत जाऊं दिलें. तेथें जाऊन ते मध्य एशियांत राहून अफगाणिस्थानांत व हिंदुस्थानांत घोटाळा करण्याविषयीं रशियन सरकारची परवानगी मागत आहेत; अशी पायोनियर कर्त्यास लंडनहून बातमी आली आहे.

सु० प०

—निजाम हैदराबादेस पहाण्यासारखीं ठिकाणें आहेत तीः—चार कमान, चार मिनार, मक्कामसजीद, महानुरा, हुजरचावाड, सालरजंगांची देवडी, रेसिडेंट आफीस, सिकंदराबादची छावणी आणि लिंदी पलटण.

इंग्लंडांत आयर्लंडांतील लोकांना आपले हक्क साधण्याचा परिश्रम चालविला आहे त्याच धाटानें निहालसिंह लोकांनी एकेजा वरून पारनेल सारखा पुढारी उभा करून त्याच्या मार्फत आपले हक्क मिळविण्याचे तजविज सुरू ठेवली आहे. इकडे रशियन गिलझाई लोकांच्या मार्फतीनें काबूल वाल्यास लाच देऊन आपला मतलब साधण्याचे विचारांत आहे, चीनवाले इंग्लंडास अनकूल न होतां त्यांनीं रशियनाचा पक्ष उचलण्याचा थाट दाखविला आहे. ब्रह्मदेश तर बिनसून गेलाच आहे, हे सर्व प्रतिकूल ग्रह इंग्रजांस आले आहेत, तथापि हिंदुस्थानांतील ग्रह अद्याप प्रतिकूल झाला नाहीं ही मत्वा संतोषाची गोष्ट आहे. असेच सर्व दिवस निभावतील असें मात्र सरकारानें समजून बेपरवेपणा राखणें उचित नाहीं नियमा प्रमाणें केव्हां केव्हां कांहीं कांहीं ग्रहांची शांती करणें राज्य धुरंधर लोकांचें कर्तव्य कर्म समजून त्याप्रमाणें वर्तन ठेवल्यास उपयोग होणार आहे.

मा० मि०

नोटीस

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर. ४

सन १८८७ इ०

नमुना ( जी. )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज साहेब जि० अकोलें यांचें कोर्टांतून:—

सर्व लोकांस प्रसिद्ध करण्यांत येते कीं, धनुलाल गोविंदराम कांडे राहणार बाळापूर. हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे आणि तारीख ६ माहे जुलई सन १८८७ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, ते आधार आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेवल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणी आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरचे रहाणार असतील त्यांनीं ८ आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. तारीख १० माहे मे सन १८८७ इसवी.

Mahomad Yasinkhan.
ज्यडूज्य.

## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून जाहीरात देण्यांत येते कीं आह्मास खानगी रीतीनें इंग्लिश शिकविण्या करितां व कारकुनाचें कामा करितां एक मनुष्य पाहिजे; पगार दरमहा वीस रुपये मिळेल. व नोकरीची मुदत दोन वर्षांची ठरविली जाईल; मात्र तो इसम म्याट्रिक्युलेशन परिक्षा पास असल्या बद्दल त्याज जवळ सर्टिफिकीट असलें पाहिजे ज्यांस ही जागा पाहिजे असेल यांनीं खालीं सही करणार याकडे आपला पत्ता कळवावा. कळावें.

अमृतराव विनायकराव देशमुख कसबे चांदोळ तालुके चिखली
जिल्हा बुलढाणें.

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

वर्षाची आगाऊ रु १ डाकहांशील ०।१२
साहमाही " २ " " ०८
साल अखेर " ७ " " १०८
फिरकोळ अंकास.......................०।४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।१

RS.
Per annum in advance 5 Postages 13a
Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.................................. 4as

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XXI AKOLA MONDAY 23 MAY 1887 NO 20
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख २३ माहे मे सन १८८७ इ० अंक २०


## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून जाहीरात देण्यांत येतें कीं आह्मांस खानगी रीतिनें इंग्लिश शिकविण्या करितां व कारकुनाचें कामा करितां एक मनुष्य पाहिजे; पगार दरमहा वीस रुपये मिळेल. व नौकरीची मुदत दोन वर्षांची ठरविली जाईल; मात्र तो इसम म्याट्रिक्युलेशन परिक्षा पास असल्या बद्दल त्यांजजवळ सर्टिफिकीट असलें पाहिजे. ज्यांस ही जागा पाहिजे असेल त्यांनीं खाली सही करणार याकडे आपला पत्ता कळवावा. कळावें.

अमृतराव विनायकराव देशमुख कसबे चांदोळ तालुके चिखली जिल्हा बुरडाणें

---

नोटीस.

मारुती वल्लद येसोजी बारी वस्ती बोरगांव मंजु हल्लीं वस्ती पळसो बुजरुक तालुके अकोलें परगणें मुर्तिजापूर यासी नोटीस देणार तुळसाबाई मर्द परशराम बारी वस्ती पळसो तालुके अकोलें नोटीस देण्यांत येते कीं माझी बहीण साळु मर्द नारायण बारी इचा नवरा विक्षिप्त दशेत असल्यामुळें ती माझे जवळ २० वर्षांपासून असून तिचा नवरा विक्षिप्त दशेत मयत जाहला. त्याचें क्रियाकर्म मी खर्च लावून करविलें; आणि माझा नवरासी कोठें गेला हें समजत नसून त्याजला हो मजपासून गेल्यास सुमारें १७ वर्षे जाहली आहेत; तेव्हांपासून हल्लीं माझे घरांत असलेली स्थावर जंगम मिळकत मी स्वकष्टार्जित संपादन केली आहे. शिवाय लोकांकडून देणें घेणें व पेवांत ज्वारी वगैरे आहे. माझी बहीण साळु फाल्गुनमासि मयत जाहली [illegible] तिचे क्रियाकरमांतराकरितां तुह्मांस [illegible] विले असून मी आपलें खर्चानें तुम[illegible] तुम तिचे करमांतर केलें; तेव्हांपासून [illegible] माझे घरांतच राहिला असून माझी स्वकष्टार्जित जिनगी असून तुह्मी त्या जिनगीची वगैरे व्यवस्था आपली मालकी दाखवून करूं लागले आहात; व लोकांकडून येणें जाणें आहे तें माझे परवानगीवाचून वसूल करीत आहात; ते करूं नये. तुह्मी साळूचे स्वकष्टार्जित जिनगीवर वारसा करितां तरी तुह्मी मरे पावेतो तिजकडे कधीं ही आला नाहीं. व हल्लीं तिची जिनगी मागता; तरी तुमचा कांहीं वारसा नाहीं तत्रापी मी तुह्मास कांहीं देण्यास कबूल असून तुह्मी मजबरोबर भांडण करून मजला जबरीनें घातून काढून आपण राहिले आहात, तरी रागेरागें जिनगी सर्व [illegible] अंगावर टाकून आले आहे. या[illegible] देण्यांत येते कीं माझी जिनगी [illegible] तिचो किमत सुमारें तीनच्यार हजार रुपयाची आहे याची गैरव्यवस्था नकरितां नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांत माझी जिनगी वगैरे सर्व माझे स्वाधिन करून माझी पावती घ्यावी असे नकेल्यास योग्य कोर्टांत फिर्याद करून. खर्चा सुद्धा जिनगी घेईन. कळावे ता। १७ माहे. मे सन १८८७ इसवी.

सही

तुळसाई मर्द परशराम बारी बांगडीइच्यां हातची

---

## ब्रम्हदेश

( लिहून आलेला मजकूर )
मागील अंकावरून पुढें चालू.

सन १८८५ सालीं ब्रह्म देशाशीं लढाई सुरूं होण्यापूर्वीं ह्या देशांत निदान कांहीं शतका पासून वेळोवेळ बेबंद नगरी झोटिंग बादशाहीचा प्रकार घडून येत असावा व त्यामुळें सर्व प्रकारें अंदाधुंदी चालत आली असावी, असें सांप्रतच्या त्या देशाच्या काल स्थितिवरून सहज दिसून येण्या सारखें आहे. ब्रह्म देशांतील मध्य प्रांतांचें राज्य सुरळित चाललें असून, ब्रह्मी लोकांच्या कल्पने प्रमाणें उत्तम स्थितींत होतें त्या वेळीं ही प्रजेच्या जिवाचें व मालमत्तेचें संरक्षण होणें या सारखी महत्वाची राज्य चालण्यास कारणीभूत मूलतत्वांनीं प्रणीत जीं कृत्यें तीं ब्रह्मी सरकारच्या हातून घडून येत नसत; आणि पुढें तर जेव्हां पासून अस्वया सुरूं झाली तेव्हां तें सरकार दुर्बळ व निरत्राण बनत गेलें यांत विशेष आश्चर्य वाटण्यास नको; असें पूर्व स्थितीच्या ओघानें दिसून येतें. सन १७९२ सालचा ब्रह्मी राज्यांच्या वं[illegible]तील मूळ पुरुष अलामप्रा हा स्वतः [illegible] व त्याच्या लोकांचाही नि[illegible] होता; आणि [illegible] काळानुरूप सुधे[illegible] स कांहीं आधार नाहीं. देश [illegible]ली असतां ब्रह्मदेश धनाढ्य व सुपीक आहे; जमिनीच्या लागलागवडी साठीं होणाऱ्या मेहनतीच्या मानानें पीकपाणी फार नामी असून हंगामाचें उत्पन्न अती विपुल होतें. शेतकीची बहुतेक कामें स्त्रियांनीं करण्याचा प्रचार असल्यामुळें पुरुषांचा वेळ शेतकीकडे न लागतां अन्य कामें करण्यांत त्यांस पुष्कळ फुरसत सांपडते; व त्यांची नेहमींची गमतीची वेळ झाली ह्मणजे चौर्य व पुंडावा माजविण्यांत घालवितील ति[illegible] होय. पूर्वीं आर्य लोकांच्या वेळीं स्त्रिय[illegible] कामें करित असत व पुरुष लढाया मारि[illegible] असत; सांप्रत ब्रह्मी लोकांत स्त्रिया स[illegible] कामें [illegible] व पुरुष चोऱ्या करिता[illegible] दूरदूरचा बाहेरून आलेला एखादा कुशल व सहासी मनुष्य पुढारी होऊन या लुटारू पैकीं कांहीं जणांची एक टोळी जमवून देशांत लूट मांडितात व प्रजेस फार त्रास देतात; व पुढें मारहाण, कत्तल वगैरे कांहीं झाली ह्मणजे शुद्धीवर येऊन पूर्ववत् सभ्या प्रमाणें घरोघर जाऊन राहू लागतात. अशीं तऱ्हेचीं अनेक वेळां अनेक उदाहरणें दृष्टोत्पत्तीस आलीं आहेत

ब्रम्ह देशांतील वरील तऱ्हेची भामटेशाई व चोर बाजार हीं अंशतः मोडण्या करितां बलाढ्य ब्रिटिश सरकारास हीं एक वर्ष पुरेलें नाहीं तो अलमपोराच्या मागून जे जे राजे होऊन गेलें त्यांच्याने हातून योग्य रितीनें मोडली गेली नव्हतीं हें उघड आहे; शिवाय कित्येक वेळीं राजघराण्यांतील कांहीं पुरुष त्या चोरांच्या टोळ्यास अंतस्थ मसलत व फूस देऊन त्यांना अनेक प्रकारें मदत करीत असतां ह्या लुटारू ब्रह्मी पेंढाऱ्यांना राजघराण्यांतील पुरुष सामील होऊन पुढारी बनल्यास फार आंवडे व त्याचो ते फार फार चहा करित असत. तशांत कोणी महत्वाकांक्षी बाणेदार मनुष्य निघाला तर त्यास ह्या लोकांच्या साह्यानें राजपद प्राप्ति करून घेण्यास हीं हा मार्ग खुला असे व साधनें अनुकूल असल्या मुळें अशा ही सुटत असें अशा बद्दल पुष्कळ प्रसंगी दाखले आले आहेत. पूर्वीं पासून आलमप्राच्या घराण्यांतील जवळ जवळचे राज पुरुषांस ठार मारण्याची किंवा मंडल्यास कैद करून कोंडून ठेवण्याची चाल चालत आली आहे तो केवळ निर्दयपणाची नसून राज्य व्यवस्थेमधील एक कडक युक्ति होती; कारण तसें केल्यानें लुठारू मंडळीस राजवळ मिळणें तितके कठीण पडे व बंडाळी फार न माजतां राजावरील प्रत्यक्ष विघ्नें दूर होत असत. ह्या अंदाधुंदीत ब्रह्मदेशाच्या पूर्व कडील डोंगरांतील 'शान्स, [illegible]च्या लोकांच्या त्रासामुळें वारंवार भर[illegible]हे; आणि उत्तरे कडील [illegible]च्या रानटी व अन्मत्त [illegible]या झुडींच्या स्वाऱ्या करून [illegible] देतात यामुळें त्रास होत [illegible]करणें जितके सोपें व सहज [illegible]लें या मानानें उलट प्रका[illegible] ब्रिटिश अंमल व कायदा पूर्ण [illegible]ण्याल तितके अवघड व कष्ट [illegible]गेले आहे. सगळा ब्रह्मी ल[illegible] सारखा मोठा संग्राम झाला [illegible] घोट रानटी ब्रह्मी लोकांस [illegible] असा आमच्या ब्रिटिश सर[illegible]ल्या शक्तीचा प्रभाव दाखवि[illegible] मिळशीं नाहीं. शिवाय सैन्या [illegible]झाला व [illegible]तील लाने [illegible] त्यानें पराभव न पावतां देशभर पसरून ठिक ठिकाणीं जाऊन राहिले. हे नौकरीवरून दूर केलेले लोक देशाच्या शांततेस दुसऱ्या प्रकारानें परकीय सत्तेखालीं एका तऱ्हेचें विघ्न झालें आहे असें दिसतें. उदर निर्वाहाकारितां त्याना कांहीं तरी सोय करणें भाग आहे आणि स्वाभाविकरीत्या त्यांस चौर्य हाच मार्ग सोपा व सोयीचा वाटतो. शिवाय तशांत आमच्या सरकारनें मंडाल्यात तुरुंगांत असलेल्या राजपुरुषांवर बंदीपासून मुक्त करण्याचा अनुग्रह केला तो उलटा आमच्या सरकारासच भोंवला; कारण ते बंदीमुक्त झाल्या बरोबर कृतघ्नपणें वरील बंडखोर लोकांचे पुढारी बनले व त्यांनीं सर्व देशभर लूट मांडिली. इंग्रज सरकारचें सैन्य लढाईच्या कामांत जबरदस्त होतें तरी ही प्रांतोप्रांत पसरलेली बंडाळी मोडण्या इतके पुष्कळ लोक त्याजजवळ नव्हते आणि त्यामुळें ब्रह्मी प्रजेचे प्राण व मालमत्ता यांचें संरक्षण करणें फार कठीण झालें आहे. सकृद्दर्शनी ब्रह्मदेशांत ब्रह्मी लोकांचें कौन्सिल बनवून त्यांच्या हातून राज्यकारभाराची व्यवस्था चालविण्यास [illegible]ळित चालेल असें वाटल्यावरून ब्रिटिश सरकारनें तदनुरूप व्यवस्था केली व अखेरीस त्यांची कल्पना भ्रांतिमूलक व चूकीची झाली होती असें ठरलें. कारण नवीन स्थापन केलेल्या ब्रह्मी कौंसिल मधील बहुतेक सभासद बंड मोडूनें राज्य व्यवस्था नीटमार्गास लावण्याचे एकीकडे ठेऊन स्वतःच बंडवाले लोकास सामील झालें आणि प्रत्यक्ष रीत्या त्यांचे पुढारी बनले नाहींत तरी होईल त्याप्रकारें त्या लोकास मदत व उत्तेजन देऊं लागले. ही त्यांची अंतस्थ सल्ला मसलत व किसालत इतकी वाढली कीं ब्रिटिश सरकारच्या पूर्वींच्या 'लोअर ब्रह्मा' च्या भागांत पुष्कळ दिवसांचा ब्रिटिश अंमल असून ही त्या ठिकाणीं बंडें उत्पन्न झालीं, व लोकामध्यें चंचलता व अस्वस्थता दिसून आली; आणि सर्व प्रकारानें सर्व गोष्टी इंग्रजांच्या विरुद्ध जळून येत चालल्या. इंग्लिश सैन्यांत लोक फार थोडे पडले. पावसाळा आला. नद्या मोठ मोठ्या असल्यामुळें नद्यांना पूर मोठमोठे येऊं लागले. सर्वत्र जंगल जबरदस्त वाढलें. व हवा इतकी खराब होऊं लागली कीं कुमक फौज पाठवावी तिचा त्या घातुक हवे मुळें फडशा उडे. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं आमच्या सरकारच्या हातांत उपाय काय तो जे कांहीं थोडे लोक उरले होते त्यास जडन ठेववेल तितका बंदोबस्त ठेवावा हा राहिला होता; आणि पुढें कुमक मागवून नीट सुयंत्र चालेल अशी राज्याची व्यवस्था करणें पावसाळा सरे पर्यंत लांबणी वर [illegible] घ पेथ पर्यंत सु[illegible] तरी [illegible]

संपूर्ण

हकीकती वरून मागाहून ब्रह्मदेशांत पूर्णपणें इंग्रजी अंमल बसण्यास अनेक व्यत्यय व प्रतिबंध होत गेले ते कसकसे व कोणत्या कारणा मुळें झालें हें आतां उघड दिसून येणार आहे. प्रस्तुत ब्रह्मदेशांत शांतता व स्वस्थता सर्वत्र आहे असें म्हणतां येणार नाहीं तरी बहुतेक अंशीं पुष्कळ प्रकारानें फार दिवसापासून चालत आलेली बेकायदेशीर राज्य पद्धति मोडकळीस येत चालली आहे व आतां पुढील पावसाळा विशेष दंगा धोपा किंवा गडबड न होतां गेला तर ब्रह्मदेश पुरतेपणें काबीज झाला असें म्हणण्यास हरकत राहणार नाहीं, ब्रह्मीराज्यापासून आपल्या देशास अनेक फायदे होतील असें कांहीं लोक म्हणतात पण त्यांच्यां त्या म्हणण्या प्रमाणें आपलें हित होईल असें खात्रीनें सांगतां येणार नाहीं तरी हें खरें आहे कीं आमच्या सरकारच्या राज्याचा फैलाव होऊन एक सुपीक व धनाढ्य देश हस्तगत झाला व हिंदुस्थानच्या राज्याला एक दुसरें जोडगाळी ब्रह्म राज्य मिळाल्यानें हिंदुस्थानांतील त्यांच्या राज्यास एक प्रकारचें विशेष स्थैर्य येत नाईल.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध १ शके १८०९

## आक्टिंग डायरेक्टरशिप.

रावबाहादूर श्री. भि. नटार रजेवर गेल्यामुळें त्याचे जागीं वस्तुत: इन्स्पेक्टरची तूर्त नेमणूक न होतां मि० एटकिन् हेड. मास्तर आकोलें हायस्कूल, यांची झाली त्यास बरेच दिवस झाले; व त्यासंबंधानें आमचा कांहींएक लिहिण्याचा इरादा नव्हता, कारण वऱ्हाडांतील सर्व खात्यांत कायम च्या किंवा तूर्तच्या पुष्कळ नेमणुका लोकी कदृष्टीनें योग्यते प्रमाणें किंवा हक्कास अनुसरून होत नाहींत हे सर्वांस माहीतच आहे. तेव्हां या नेमणुकीपासून कोणास फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नव्हतें व हल्लींची रीति चालू राहील तों पावेतों अशाच नेमणुका होतील याविषयीं ही तादृश संशय नसावा. तथापि या नेमणुकींत महत्वाचे बरेच मुद्दे गोवले गेले असल्यामुळें आमचा इरादा नसतां, इच्छा नसतां व आमचे लिहिण्यापासून विशेष कोणचेंही हितासहित होणार नाहीं हें पक्के समजत असतां, जेथें अन्याय झालेला दिसला तेथें त्यास अन्याय म्हणावें व त्याबद्दलचें आपलें मत दर्शवावें हा आमचा धर्म असें समजून आज आम्ही चार ओळी या नेमणुकीचे संबंधानें लिहितो. मिस्तर एटकिन यांचे आम्ही अनिष्ट इच्छित नाहीं. त्यांचे बद्दल आमची कामिपूज्य बुद्धी आहे असेंही नाहीं. मिस्तर एटकिन इन्स्पेक्टर असून न एखादे हायस्कूलाचे नेटीव किंवा युरोपियन हेड मास्तरास आक्टिंग डायरेक्टर नेमिलें असतें तर या प्रसंगीं जें आम्ही लिहिलें असतें तेंच आज लिहितों.

मिस्तर एटकिन यांची झालेली नेमणूक हिंदुस्थान सरकारचे इरादा विरुद्ध व सर्व सरकारी खात्यांतील जो सामान्य चाल आहे तिचे विरुद्ध व न्यायाविरुद्ध आहे असें आम्ही समजतों. वऱ्हाड प्रांताचे शाळा खात्याचे डायरेक्टरची जागा नेटिवास व देण्याची, युरोपियनास देण्याची नाहीं असा सरकारचा इरादा असल्या बद्दल आतां कोणास शंका राहिलेली नाहींच. नेटिवास देण्याची म्हणून त्या जागेचा कमी पगार केला व एका मागोमाग एक असे दोन नेटिव डायरेक्टर झाले. अर्थात जी जागा कायमची नेटिवास देण्याची ती तूर्तची खाली झाल्यास इतरांपेक्षां नेटिवांचा तीवर अधिक हक्क आहे असें समजणें रास्त आहे. युरोपियनास ती मिळूं नये असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. पण सारख्या योग्यतेचे उमेदवार असल्यास त्यांत नेटिव्हाचा अधिक हक्क असें आम्ही समजतों. देणार मुखत्यार आहेत परंतु ही नेमणूक हिंदुस्थान सरकारचे हेतु विरुद्ध झाली असें आम्हास म्हणणें जरूर आहे. कायमची जागा खाली झाली असती तर ती मिस्तर एटकिन यांस मिळाली नसती हे म्हणून दाखवायास नको. राव बाहादूर नटार यांची नेमणूक झाली त्यावेळेस मिस्तर एटकिन हे या खात्यांत विद्यमान होतेच. डायरेक्टरची जागा तर एकीकडेच राहिली; परंतु गुदस्त साली इन्स्पेक्टरची जागा खाली झाली होती त्यावेळेस मिस्तर एटकिन ती पतकरण्यास तयार असून व त्यांची शिफारस ही झाली असून ते त्यांस मिळाली नाहीं. इन्स्पेक्टरची जागा ज्यास मिळूं शकत नाहीं त्यास आक्टिंग डायरेक्टरची कशी मिळावी अशीं सहज शंका येते. याचें उत्तर इतकेंच कीं तूर्तच्या नेमणुकी नामदार रेसिडेंट साहेब करतात; सबब वर्णी सारखी ही जागा मिस्तर एटकिन यांस दिल्या सारखी दिसतें. मिस्तर एटकिन् यांचे जागी नेटिव्ह असत तर डायरेक्टरचे खालचे हुद्याचा इन्स्पेक्टर यास अजीबात गाळून त्यास ही मिळाली असती असें आम्हांस वाटत नाहीं जर तूर्तच्या नेमणुकीस देखील हिंदुस्थान सरकारचा मंजुरात पाहिजे असती तर हल्लींची नेमणूक झाली नसती व तीस मंजुरांत मिळाली नसती हें म्हणून दाखवायास नको. अशाच प्रसंगीं पूर्वी मिस्तर एटकिन हे आक्टिंग डायरेक्टर झाले होते सबब त्यांस ज्यास्त हक्क होता अशी कोणास भ्रांत असल्यास एक उत्तर असें कीं दोन वेळां अन्याय्य कृत्य केलें तें न्याय्य होत नाहीं.

वस्तुत: इतर खात्यांत अशा प्रसंगीं खालचे हुद्देदाराची नेमणूक झाली असती. आणि युरोपियन नेटिव्ह हा जातिभेद व तज्जन्य पंक्तिप्रपंच मूळ नसते तर विद्या खात्यांत ही त्या सामान्य नियमास उल्लंघण्याची जरूर झाली नसती. आकोलें हायस्कूलचे हेड मास्तरचे जागीं युरोपियन असल्यामुळें हा प्रकार घडला यांत आम्हास शंका नाहीं. मुंबई वगैरे ठिकाणचे विद्याखात्यांत इन्स्पेक्टर असतां हायस्कूलचे हेड मास्तरास त्याचे डोक्यावर बसविल्याचे ऐकिवांत नाहीं. ही गोष्ट खरी कीं सांप्रतचे प्रसंगा प्रमाणेंच पूर्वीही एकवेळ मिस्तर एटकिन हे आक्टिंग डायरेक्टर झाले होते. पण सांप्रतपेक्षां त्या वेळेस ती गोष्ट न्यायास अधिक अनुसरून होती असें नाहीं. सांप्रतचे कायमचे डायरेक्टर राव बहादूर नटार त्यावेळेस इन्स्पेक्टर असून आपले हुद्यावर होते. ते पुढें कायमचे डायरेक्टरचे होण्यास योग्य ठरले. पण आक्टिंग नाण्यास मिस्तर एटकिन यापुढे ते योग्य दिसले नाहींत ! ! खरे कारण काय असेल तें आम्हांस समजण्यास मार्ग नाहीं. पण बाह्य दृष्टीनें पाहतां असें काय मिस्तर एटकिन युरोपियन असल्यामुळें वाहाते गंगेत हात धुवून त्यांची संभावना करावी अशा हेतूनें त्यांस वर्णी दिल्याप्रमाणें हें दिसतें. ही मागी नेमणूक करण्यांत उमेदवारांचा योग्यायोग्य विचार झाला असेल असे म्हणण्यास त्या पुढील घडलेल्या गोष्टीवरून स्थळचे राहत नाहीं. कदाचित हायस्कूलचे हेडमास्तर असतां कोणाचे हातून विशेष चांगलें काम झालें होतें असा विचार करून त्यावेळेस इन्स्पेक्टर मिस्तर नटार यास एकीकडे ठेवून हेडमास्तर मिस्तर एटकिन यांस आक्टिंग डायरेक्टर केलें असें म्हणावे तर उभयतांचे कारकिर्दीतील हायस्कुलांत विद्यार्थ्यांची संख्या व म्याट्रिक्युलेशन परिक्षेत पास विद्यार्थ्यांची संख्या या गोष्टी योग्यतेची द्योतक प्रमाणें धरल्यास मिस्तर एटकिन यांचें पारडें फार जड होईल असें दिसत नाहीं. इतकें असून ही कांहीं योग्य कारणें त्या नेमणुकीस नसतील असें आम्ही म्हणत नाहीं. पण तीं अजून बाहेर आलेलीं नाहींत. सांप्रत ही इन्स्पेक्टरास अजी गाळून टाकण्याचीं कारणें त्यावेळेपेक्षां विशेष स्पष्ट दिसत नाहींत. पूर्वी प्रमाणेंच सांप्रतचे इन्स्पेक्टरही नेटीव आहेत; व तेही डायरेक्टरचे जाग्यास कदाचित लायक ठरतील व ते डायरेक्टर होतील. व होवोत पण ते डायरेक्टर झाल्यावर ही कदाचित जर पुन: असाच प्रसंग येईल आणि मिस्तर एटकिन हे हेड मास्तरच राहतील तर त्यांचा आक्टिंग डायरेक्टर होण्याचा हक्क त्या वेळीं इन्स्पेक्टर युरोपियन नसल्यास, कायम राहील यांत आम्हांस आतां बिलकुल शंका राहिलेली नाहीं.

ही नेमणूक न्याय्य नाहीं यातिसऱ्या मुद्याचा मात्र विचार राहिला. वस्तुत: सत्ते पुढें न्याय अन्याय आणण्यांत तादृश अर्थ नाहीं. असें अनुभव सिद्ध आहे. सत्ताधीश स्वेच्छे प्रमाणें करीत आले. व करतील. वस्तुत: मिस्तर एटकिन यांची नेमणूक यादृष्टीनें पाहिलीच आहे असें नाहीं. सामान्यत: अशीच नियमानें बहुतेक नेमणूक होतात. हे आम्ही पहात आहों सर्वांशीं यथान्याय्य नेमणुकीचें प्रमाण कमीच विद्या खात्यांत ही हा प्रकार झाला नाहीं असें नाहीं. व असें होणारच. त्यास अनेक कारणें असतात तीं नेहमीं कायम राहावयाचींच. स्नेही, आप्त स्वजातीय इत्यादिक बुद्धितत्त्वाविशीपर्व्हे कायम असें पावेतों योग्यायोग्य न्याय्य अन्याय्य वगैरे विचार हे लेक्चरें देण्याचे वेळेस मात्र काय ते उपयोगीं पडण्याचे. प्रसंगीं तें सर्व एकीकडे रहातात हें सर्वांस समजत आहे. पण यांत एक गोष्ट असह्य. ती ही कीं अन्यायास अन्याय म्हटल्यानें अन्यायकर्ता करणारास रुचत नाहीं, इतकेंच नव्हे पण असें म्हणणारास अन्याय कर्ता शत्रु समजतो. व प्रसंग साधेल तेव्हां तो सूड उगवतो. व या भितीनें अन्यायपात्रीभूत झालेल्या गरिबास प्रसंगविशेषीं भिक नको पण कुत्रा आटोप म्हणण्याची पाळी येते. सत्ताधीशा जवळ न्याय मागण्यास जाण्यांत ही भीति आहे. कारण न्याय मागण्यास गेल्यास आपली बेआदबी झाल्या सारखें सत्ताधीशास वाटतें. व कधीं कधीं न्याय मागणारा अन्यायी ठरतो.

हेडमास्तर मिस्तर एटकिन यांस आक्टिंग डायरेक्टर नेमण्यांत अन्याय झाला न इस्पेक्टर मिस्तर महाजनी यांची मान हानि झाली. या प्रसंगीं स्वस्थ बसल्यानें त्यांचे शिष्य वर्गानीं गुरुसेवा यथार्थ बजाविली नाहीं. असें म्हटले पाहिजे. कारण समजत नाहीं या प्रकरणांत युरोपियन आहे म्हणून यांणीं तोंडें आटपलीं असतील. असें असल्यास त्यांणीं योग्य केलें असें म्हटलें पाहिजे. खुद्द इन्स्पेक्टर यांणीं या प्रकरणांत तकरारी अर्ज केला नसल्यास तेंही बरें झालें असे म्हणूं.

## The Berar Samachar

**MONDAY MAY 23 1887.**

We acknowledge with pleasure a copy of a pamphlet bearing the title of "England as a Patroleum Power" which has been sent to us by its author in London. The pamphleer herein proves that by the acquisition of the famous Burmese Oil Fields, England has rendered herself the third Patroleum Power of the world and draws attention of the class of British enterprisers to the new fields open for enterprise within the British Empire and recommend that the annexed Oil Fields should be energetically worked up. He points out that Englad has more facitition for a like enterprise than those of Russia which is the second Patroleum Power next to America. The vast plain of European Russia does not, like the peninsula of India, contain any Patroleum deposits. Still the richness of the deposits of Eastern India is repeatedly acknowledged. The Oil Fields of yenanyong on the Travady are probablythe oldest worked in the world. Besides these there are on the eastern side of India the deposits on the Ramree and Borouga islands on the Burmese coast and the deposits in Assam. On the west lie the Oil Fields of Rawal Pindee and lower down the frontier the deposits of Khatan near Quetta, the Burmese deposits of which being all accessible to English shipping. While the Russian deposits lie on the confines of old Persia severed from the sea by 600 miles of country. In general, the Indian Oil Fields are extremely well placed; they all lie on high-ways

of commerce and they have close at hand not only the market of India but that of China also, the consumption of which countries is so rapidly extending that there is hardly any possibility of the demand falling off or coming to a sudden end. We think that the above is a very promising field for enterprise and if well worked out, the supply of kerosene oil will be at the same time larger and cheaper and will be more used if refined in a special manner so as to adapt itself to the hot climate of the East.

---

Colonel Marshall the nominee of the Government of India, as a political officer at Hyderabad to advice His Highness the Nizam and give him every assistanse, is bringing about the desired effect on the unsatisfactory condition of affairs of that State by bringing his influence to bear upon His Highness as well as upon the minister and other officials. The resignation of Sir Salar Jung and, it is believed in some quarters, something to do with the appointment of Colonel Marshall. He has, of course, no direct hand in the State affairs, but it is an open secret that he is working behind the scene. We now hear that Bushire-ud-D..la, a nobleman of standing, has been appointed minister to succeed Sir Salar Jung. This appointment is not likely to create any serious stir in the people as it was, in all probability, been approved of and sanctioned by the Government of India. We hope the change of ministers will improve the administration of Hyderabad to the benefit of the State and its people.

---

Weather very hot at day and a little cool at night.

---

The two Civil Courts at Julgaon and Akot will be abolished and one Court opened at Telhara on the 6th of the next month. Mr. Shrikrishna Narhar Extra Assistant Commissioner, 1st class, is appointed to preside over the new Court.

---

Mr. Kesho Jayakrishna, Extra Assistant Commissioner is transferred from Yeotmal to Ellichpoor.

---

Mr. Edulji Bymanji, Dastur, Assistant Commissioner, Bassim, is shortly to proceed on leave and Mr. Ganesh Bapuji, Extra Assistant Commissioner Akot, is transferred to Bassim to do his work.

---

Mr. Khaja Badrodin, Thasildar, returned from one year's leave and is ordered to take charge of Julgaon Thasil.

---

Mr. Eknath Moreshwar, Thasildar is transferred from Julgaon to Mulkapur, and Mr. Gopal Mahadeo Bhide will revert to his substantive appointment of Clerk of Deputy Commissioner's Court Buldana.

---

Mr. C. A. W. Davies, Assistant Commissioner is temporarily appointed to be Judicial assistant for Berar, and Mr. Mahamad Yassinkhan, Assistant Commissioner will perform the Revenue and Criminal work in place of Mr. Davies.

---

First Assistant Apothecary O. W. Jones, M. D. of the Madrass subordinate Medical establishment, is appointed Civil Surgeon of Bassim in the Hyderabad Assigned Districts.

---

Mr. A. H. T. Martindale, M. C. S. Political agent of the 3rd class and 1st assistant and Secretary for Berar to the Resident at Hyderabad is posted as Political Agent in Quetta and Pishin.

---

Mr. Krishnaswami, Clerk in Deputy Commissioner's office, Akola retired on pension during the past week.

---

Mr. Shriram Bhicaji Jatar B. A. Director of Public Instruction, H. A. D. has been granted an extension of privilege leave for one month.

---

चुकीची दुरुस्ती— आमच्या ता. १ मे १८८७ च्या अंकात जिवबा बिनदादाजी शेठ सोनार चांदुरीकर हल्लीं रहाणार अकोलें; यांस धोंडो बापुजी सोनार व गोपाळ बापुजी सोनार यांनीं जिनगी बद्दल नोटीस दिली त्यांत सर्व जिनगी हजार रुपये लिहिली आहे ती दहा हजार समजावी.

---

## वऱ्हाड

हवामानः— हवेंत वरीच उष्णता आहे. रात्रीं किंचित् गारवा असतो रोगराई म्हणण्या सारखी नाहीं.

---

आकोट व जळगांव येथील दिवाणी कोर्टे बंद होऊन त्यांचे ऐवजीं तेल्हारें येथे एक दिवाणी कोर्ट पुढील महिन्याचे १६ तारखे पासून सुरू होणार या नवीन कोर्टावर रा. रा. श्रीकृष्ण नरहर ए. अ. कमिशनर यांची नेमणूक झाली.

---

रा. रा. केशव जयकृष्ण ए. अ. कमिशनर यांची येवत माळाहून एलिच पुरास बदली झाली.

---

मि. एदलजी बहिमनजी दस्तूर असिस्टंट कमिशनर, वाशीम, हे रजेवर जाणार आहेत, त्यांचे जागीं काम पाहण्यास रा. रा. गणेश बापुजी आ. ए. अ. कमिशनर यांची आकोटाहून वाशमात बदली झाली.

---

मि. खाजाबद्रुदिन तहसिलदार हे एक वर्षाचे रजेवरून परत आले. त्यांना जळगावास जाऊन आपले कामाचा चार्ज घेण्याचा हुकुम झाला व रा. रा. एकनाथ मोरेश्वर तहसिलदार यांची मलकापुरास बदली झाली, व रा. रा. गोपाळ महादेव भिडे हे आपले क्लार्क आफ कोर्टचे जागीं बुलढाण्यास परत जातील.

---

जुडिशियल असिस्टंटचे जागीं तूर्त तीन महिने पर्यंत मि. सी. ए. डब्ल्यु डेव्हिस असिस्टंट कमिशनर यांची नेमणुक झाली व त्यांचें काम मि. महमद यासीनखां असिस्टंट कमिशनर हें पाहतील,

---

मद्रास सबार्डिनेट मेडिकल एस्टाब्लिशमेंट पैकीं असिस्टंट अपाथिकरी ओ. डब्ल्यु. जोन्स यांस वाशीम येथें सिविल सर्जन नेमलें.

---

मि. ए. एच. टी मार्टिंडेल, एम् सि. एस्. पोलिटिकल एजंट थर्ड क्लास व रेसिडेंट साहेबांचे फर्स्ट असिस्टंट व वऱ्हाडचे सेक्रेटरी यांस क्वेटा आणि पिशिन येथे पोलिटिकल एजंट नेमलें.

---

मि. कृष्णस्वामी. येथील डे. क. आफिसांतील क्लार्क यांनीं गेल्या आठवड्यांत पेनशन घेतलें.

---

मि. श्रीराम भिकाजी जटार बी. ए. शाळा खात्याचे डायरेक्टर यांनीं आणखी एक महिन्याची हक्काची रजा जास्त घेतली.

---

म्युनिसिपल कायद्याच्या कलम ७ अन्वये डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेट यांच्या सुचने प्रमाणें तारीख २० शुक्रवार रोजीं सकाळी, येथील सावकार लोक व दुसरी मोठ मोठी मंडळी मिळून एकंदर २०-२१ मंडळींची टौन हालांत सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेट तर्फे मे० डेव्हिस साहेब असिस्टंट कमिशनर हे होते. त्यांनीं जमलेल्या मंडळीस सभेचा उद्देश कळवून वर सांगितलेल्या कलमान्वयें सूचना तयार करून मेरेसिडेंट साहेबा कडे त्या पाठविण्या करितां १ जूनच्या आंत डि० म्या० कडे पाठवाव्यात म्हणून सांगितलें; व नंतर ते उठून गेले. नंतर जमलेल्या मंडळीची आपसांत पुष्कळ चर्चा होऊन एक दोन बाबी संबंधाने विचार ठरून सभा विसर्जन झाली. शनिवारीं रात्री ही मंडळी जमून व पुष्कळ चर्चा होऊन पुन्हा एकदोन बाबी संबंधाने विचार ठरले.

---

### नोटीस.

श्रीराम शालिग्राम मारवाडी दुकान खामगांव यांस चुनीलाल चतुरभुज मारवाडी अज्ञान पालण करणार आई लाडूबाई मर्द चतुर्भुज मारवाडी दुकान जामोद ता० जलगाव याजकडुन कळविण्यांत येतें तुम्हीं ता. की २९ येप्रील १८८७ च्या अंकांत आमचे नावें नोटीस दिली ती पावली तींचें उत्तर खालींलिहिल्या प्रमाणें चुनीलाल चतुरभुज अज्ञान असल्याचे तुम्हीं आपले नोटीशींत कबुल केलें आहे तेव्हा तो सज्ञान होई पर्यंत दुकन दारीचे संबंधानें मला कांहींच कमीज्यास्ती करतां येतनाहीं दुकान तुम्ही विकण्याचे मालक येकटेनाहीं कारण माझ्या नवऱ्याची शराकत असल्याचे तुम्ही कबुल केलें आहे तेव्हां माझ्या संमती वाचून तुम्हास विकरी करितां येत नाहीं या साठी तुम्ही केलेला सर्व व्यवहार निरर्थक असोन गैर कायदा आहे माझ्या नवऱ्याचे खात्यांत जी रकम जमा असेल ती सर्व मलादेण्याची तजविज नोटीस पावतांच व्हावी कारण दुकानांतून मुलगा सज्ञान होई पर्यंत मला कांहींच पैसा घेतां येत नाहीं. मला तुम्हीं नोटीस देऊन विनाकारण उत्तर देण्याचे खर्चांत घातले आहे तरी ही नोटीस पावल्यावर या नोटीसीचे खर्चाचे रुपये पाठवावे व दुकान दारी जशी माझा नवरा जिवत असतांना चालली होती तशी चालावी असें तुमचे मनांत असलेतर तुमचे व माझे विचारे चांगला हुशार असा येखादा गुमास्ता पाहून दुकानदारी चालवावी माझा मुलगा सज्ञान झाला म्हणजे तुमचा हिशोब पाहून नफा नुकसान जसे असले तसे वाटून घेऊं माझ्या नवऱ्याचा भाऊ तुलसीराम हा जिवत असता तर मी तुमचे दुकानदारीचा हिशोब पाहून नफा नुकसान वाटून घेतले असतां जगर सालिम दुकानदारी लावून दिली असती तर तो ही मरण पावला यासाठीं माझा मुलगा वयात येई पर्यंत तुम्ही सदरी लिहिल्या प्रमाणे व्यवस्था करावी कळावे तारीख १९।९।८७ इसवी.

( सही मारवाडी )

चुनीलाल चतुरभुज मारवाडी बा.

पा. आई लाडुबाई मर्द चतुरभुज

मारवाडी दुकान जामोद हचे

हातची निशानी असे.

---

### नोटीस.

श्रीराम शालिग्राम मारवाडी दुकान खामगांव यांस जेसिराम सतीदान मारवाडी वस्ती जामोद ता. जलगांव याजकडून कळविण्यांत येतें कीं तुम्हीं ता. २९ येप्रेल सन १८८७ ईचे अकांत चतुरभुज सरदारमल मारवाडी याचे नोटिसींत माझेनाव सामील केले आहे.या वरून उत्तर देण्यांत येते कीं रामगोपाल फतेलाल मारवाडी याचे दुकानीं माझी शराकत असल्याचे तुम्हीं काबूल केलें आहे तरी दुकान सुरूझल्यादिवसा पासून जसे तुम्ही व तुमचे शराकतदार चतुभुज व तुलसीराम यांनीं रकम उचलली तसी माझ्या नावें किती रकम पडली हा आकडा मला नोटीस पावतांच कळवावा तसेंजर तुम्हा कडून झालें नाहीं तर नोटीशीचे उत्तर देण्याचे खर्चांत तुम्हीं मला विनाकारण घातले त्या खर्चासह पैसा तुम्हा पासून घेण्याची तजविज कोर्टमार्फत करीन दुकानदारींत माझे नांव तुम्ही सामील केलें आहे याचे कारण मला असें समजतें कीं माझी रकम दुकानांत जमा आहे ती कपटबुद्धीनें अभीलाष करावी हे आहे तरी माझी जमा असलेली रकम मला देऊन पावती मजकडुन घ्यावी तसें केलें नाहींतर दिवाणी मार्गानें नोटीसीच्या खर्चासह वसूल करण्याची तजवीज होईल कळावें ता.१९।९।८७

( सही मारवाडी )

जेसीराम सतीदान मारवाडी

वस्ती जामोद.

---

## वर्तमानसार.

पुष्कळ युरोपियन कामगारांत आपल्या हद्दींतील सावकारांपासून अगदीं थोड्या किंवा बिन व्याजानें पैसा घेण्याची चाल पडली आहे. एक दोन नव्हे पण पुष्कळ युरोपियन कामगार आज केवळ आपल्या अमलानेंच सावकारापासून पैसे उसनवार घेत आहेत. हें त्यांचें करणें कायद्याविरुद्ध आहे. परंतु त्या कायद्यास झुगारून देणारासच हल्लीं मान देण्यांत येतो. कोणच्याही युरोपियन कामगारानें हिंदुस्थानांत स्थावर मिळकत करूं नये असा इंडियन सरकारचा कायदा असून त्याप्रमाणें न वागणार असे कामगार मद्रासेस आहेत. यांच्या या बे कायदेशीरपणामुळें सरकारासही हात घालणें भाग पडलें आहे. या कामगारांपैकीं अतिशय बे कायदेशीर वागणारा सालिवन असून त्यास जागेवरून दुरही केलें आहे. असेंच आणखीं आठ कामगारांपैकीं ५ सिव्हिलसरव्हंट आणि ३ लष्करी अमलदार, सरकारानें शोधून काढले असून असें करण्याचें कारण काय असें त्यांस विचारिलें आहे.

जंगली गांवच्या शेतकरीं वगैरे लोकांस ज्या सवलती दिल्या त्याचा तपशील

( १ ) त्यांणी आपलीं गुरें खुल्या असलेल्या जंगलाच्या भागांत फी वाचून चारावी.

( २ ) लोकांनीं झाडाच्या २ इंच जाडी पर्यंतच्या खांद्या तोडून स्वतः करितां व पोटासाठीं डोक्यावरून आणतील त्यांस फी पडू नये. वरच्या प्रतीचे लोक जंगलांतून लांकडे आणतील तेव्हा दर गाडीस ८ आणे फी द्यावी.

( ३ ) त्यांस खाजगी करतां जीं इमारती लांकडें लागतील तीं, त्यांच्याकरितां इमारती लांकडांचा जो दर ठरविला असेल त्या दरानें, अथवा तिमाहीच्या लिलांवात त्यांणी विकत घ्यावी.

( ४ ) लोकांनीं आपल्या खाजगी उपयोगाकरितां हद्दीबाहेर व्यापार करणार नाहीं या शर्तीवर जंगलाच्या मोकळ्या ठेवलेल्या भागांतून फी वाचून व पासावाचून बांबु आणावे.

[ ५ ] दुसरा ठराव होईपर्यंत ज्या लोकांस राबाचा तोटा येत असेल त्यांणी जंगलाच्या मोकळ्या भागांतून नियमित झाडांचा राब आणावा तसेच गवत, बी, पानें झुडपें व जाळ्या हेही आणावी व बंद केलेल्या भागांतूनही त्यांणी गवत आणावें.

( ६ ) हिरडा व बेहाडा शिवाय करून बाकी सर्व जंगली फळफळावळ त्यांणी खाजगी उपयोगाकरितां फी वाचून आणावी.

( ७ ) या शिवाय लहानसहान वस्तुही ज्या सक्त रितीनें बंद केल्या नाहींत, त्या फी वाचून खाजगी करतां आणाव्या.

( ८ ) खाजगी उपयोगाकरतां व पोटासाठीं शेजारी पाजारी विकण्याकरितां फी वाचून कारवा डोई ओझ्यानें आणाव्या.

( ९ ) खाजगी शेतीच्या कामाकरितां करंदीचा वगैरे काठ्याही आणाव्या.

( १० ) जंगलाच्या खुल्या भागांतून फक्त शेती करतां दगड व माती ही आणावी.

सर्व लोकांकरतां एक सारखे नियम करोव. भेदाभेद असूं नये.

हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत ८५ ८६ सालांत अनुक्रमें १०५१०६००० आणि ११६५०२००० रु- शिलक होती आणि यंदा १०९८२६७ शिलक आहे.

मागील तीन वर्षांपेक्षां १८८५ शांति इंग्रज फौजेंत पटकीपासून जास्त लोक मेले. सर्व ठिकाणीं ही पटकी सुरू होतीच पण सर्वांपेक्षां जास्त मुंबई फौजेंत होती.

मागील सरकारी सालांत मिठाचें उत्पन्न ६,३३,६२,००० रुपये झालें असून ३,३२,०६,००० मण मीठ विकावयांत आलें होतें.

ऐरिशलोकांची प्रयत्नाची कमाल आहे. त्यांच्यापैकीं किसेकांनीं अमेरिकेंत जाऊन इंग्लिशा विरुद्ध मोठमोठीं व्याख्यानें झोडलीं. ते आपली दुःख लवकरच अमेरिकेतील लोकांपुढें ठेरणार आहेत.

इंग्लंडमध्यें होणाऱ्या इंपिरियल इनस्टेटयुशनच्या पायाचा दगड स्थापन करण्याचा समारंभ ता. ४ जुलै रोजी राणीच्या हातून होणार आहे या इनस्टीटयुशाकारतां १९००,००० रुपये वर्गणी जमली आहे. या इनस्टीटयुशनच्या कमेटीचा पुढील बेत पुढील आठवड्यांत बाहेर पडेल असें म्हणतात.

हिंदुस्थानांतून मोठमोठे कामगार विलायतेंत जातांना त्यांस वाटखर्ची व दुसरा कांहीं पैसा जो देण्यांत येतो त्याजबद्दल फिनान्सकमेटी कांहीं काटकसर करील असें एक पत्रकर्ता म्हणतो.

जपानांत हल्लीं रेशमाचा व्यापार फार कमी चालत आहे असें म्हणतात.

सर सालरजंग यांच्या जागेवर बुशीर उदवला यांस नेमावें असें निजामसरकारानें हिंदुस्थानसरकारास सुचविल्यावरून हिंदुस्थानसरकारानें त्यास नेमण्याविषयीं मंजुरी दिली. बुशीरउदवल्याबद्दल एक पत्रकर्ता म्हणतो कीं निजामसंस्थानांत दोन मोठाले जे सरदार आहेत त्यांपैकीं हे एक असून हें स्वभावानीं फार शांत, मनमिळाऊ व गंभीर असे आहेत. आणि यांस राज्यकारभारास लागणारी बुद्धी यांच्या अंगी असल्यामुळें हे या हुद्यास अगदीं लायक आहेत. या गृहस्थांस जुबिली प्रित्यर्थ विलायतेस पाठविलें असून, निजामसरकार त्यांस लवकरच परत बोलावणार आहेत. आतांतरी या दोघांचे ऐक्य होवो आणि मार्शलसारखा दुसरा एखादा युरोपियन कामगार मध्यस्ती न पडो म्हणजे झालें. ठा० अ०

सर स्टुअर्ट बेली सरकारास कळवितात कीं, प्रत्येक तुरुंगाचे देखरेखीवर गांवांतील संभावीत लोकांची नेमणूक होणे विशेष फायदेशीर आहे, आह्मी सुद्धा या सूचनेस मान देतो.

सातारा येथें एका सोजिराचें आंढ कोणी कापल्या मुळें सोजीर इस्पितळांत आजारी पडून राहिला होता, हाल्लीं तो बरा होऊन कामावर हजर झाला. त्याजवरील अधिकारी यांनीं त्याला सक्त ताकीद दिली आहे कीं हें अंड कोणी, कोठे, केंव्हा चिरला याचे स्वछ पणानें उत्तर न दिल्यास बडतर्फी मिळेल. सोजार ठिकाण दाखवीत नाहीं यांत काय गोम आहे न कळे. जर सोजीर मागमूस लावण्यास मागे घेतो तर फौजदारानें तेथें काय करावें.

काबुलच्या आमिरास पुढीलमहिन्यांत मव्हें येथें भेटण्याकरितां राशियाच्या झारानें बोलाविले आहे असे ह्मणतात.

वायव्यप्रांतांत गोरकपूर जव्हांतमहामारीची साथ उभ्दवल्याचें समजत.

—एकंदर जगांत ३४,००० हजार वर्तमानपत्रें हल्लीं चालू आहेत. त्यांपैकीं १६,५०० इंग्रजी भाषेंत ७,८०० जर्मन भाषेत ५,८५० फ्रेंच भाषेत व १,००० स्पानिश भाषेंत आहेत असे ह्मणतात.

—चंदनाचें पुष्कळ लाकूड हिंदूस्थानांतून युरापांत जाते व फ्रान्स ईग्लंड व अमेरिकेंत त्याचें तेल काढिलें जातें.

—बंगाल इलाख्यांत फारपूर परगण्यांत एका शेतकऱ्याच्या मोठ्या गवताच्या गंजीस आग लागली परंतु सर्व गवताचा रक्षा न होतां त्यांचा ५०।१० मण कांच झाली त्यामुळें त्या शेतकऱ्याचें नुकसान न होतां यास बराच फायदा होईल असे स्टेट्समन वरून समजतें.

फ्रान्स देशाला प्रजासत्ताक राज्यमिळून सन १८८९त बरोबर एक शतक होईल. त्या वेळीं फ्रेंच सरकाराच्या मनांत एक मोठें राष्ट्रीय प्रदेशन करावयाचे आहे; त्याकरितां फ्रेंच सरकारानें इंग्रज सरकारास निमंत्रण केलें. परंतु इंग्रज सरकारने तें निमंत्रण आदरानें नाकारिलें. या प्रदर्शनास येण्याकारता फ्रेंच सरकारानें बहुतकरून प्रमुख राष्ट्रांस निमंत्रण केले असावें असा अनुमास आहे. या जगांत असा संप्रदाय आहे कीं एका व्यक्तीनें कोणती ही गोष्ट केली असतां इतरास जर ती नापसंत असेल तर लोक त्यां व्यक्तीला कधींही बरें पाहणार नाहींत. यावरूनच ज्यावेळीं प्रथम फ्रान्स देशाला प्रजासत्ताक राज्य मिळाले तेव्हा ही गोष्ट इतर राष्ट्र त सम्मत नसल्याकारणानें तीं फ्रान्स देशावर एखाद्या गिधाडा प्रमाणें बेंऊन पडलीं व तव्हां पासून तीं राष्ट्रें फ्रांस देशाला पाससंबंधानें पाण्यांत पाहत आहेत. तेव्हां इतर प्रमूख राष्ट्रांचें मुकत्यार सन १८८९ च्या सभारंभास येतील ही आशा नकोच. यावेळीं असेंही होण्याचा थोडासा संभव आहे कीं, १७८९ सालीं जे या राष्ट्राचे विचार होते त्यासच आतां जास्ती अंकूर फुटतील. पांच खंडांत जीं प्रजासताक ह्मणून राज्यें ओहत ती कदाचित् आपपले मुकत्यार पाठवितील व त्यांसच कायतो या सभारंभापासून आनंद होईल. या सभारंभाचे वेळीं धातूचा एक मोठा पुतळा प्रदर्शनांत ठेवणार आहेत; व तो इतका मोठा आहे कीं आजपर्यंत असा कोणी पाहिला नसेल असें ह्मणतात.

बकूल

निझामसरकारानें नबाब बुशिर उदवला यांस आपले दिवाण पसंत केले असून हिंदुस्थानसरकारचीही या निवडणुकीस समती आहे असें म्हणतात.

मरीन खात्याच्या आर्कोंट एक्झामिनरचें आफिस कलकत्याहून पुण्यास आणण्याचा ठराव झाला.

आजपर्यंत डिस्पेन्सरींतून लोकांना मुफत औषध मिळत असे. परंतु सरकारानें आतां ठराव केल्याचें समजतें कीं, ज्या सरकारी नौकरांचा पंचवीस किंवा पंचवीसावर पगार आहे व जे सरकारी नौकर नसून त्यांवर कर आकारलेला आहे त्यांणीं प्रत्येक खेपेला औषध पाण्याबद्दल तीन आणे फी द्यावी; आणि डाक्टरची मुलाखत घेतली तर एक रुपया दक्षिणा ठेवावी.

वर्तमान पत्रांचे एडिटर, मालक, किंवा प्रकाशक ह्यांनवर लायबल्स् मजकूर लिहिल्याबद्दल नुकसानीचे दावे होण्याचे संबंधानें जो कायदा आहे, त्याची सुधारणा करण्याचें एक बील प्रसिद्ध जाहलें आहे. ह्या बिलावरून ज्यांवर दावा होईल, त्याला हायकोर्ट जजनांकडे अर्ज करून प्रसिद्ध जहालेला मजकूर खरा आहे. इ० प्रकारचें आपलें ह्मणणे दाखवून दाव्याची तहकुबी मागण्याचा हक्क ठेविला आहे. वादीनें कोर्टांत कांहीं रकम जमा केली, किंवा प्रतिवादीचे खर्चाची हमी दिली, तर दावा पुढें चालीवण्याचा हुकूम हायकोर्ट जजनांस करतां येण्याची सवडही ह्या सुधारणेंत ठेविलेली आहे.

ष० त०

---

नोटीस.

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील साहु दुकान अकोलें तर्फे मुकत्यार पांडुरंग रामचंद्र यांस चंद्रभान वलद सुर्यमान देशमुख राहणार माझोड याज कडुन नोटीस देण्यात येतेंकी तुमचे जवळ गाहाण खत आहे. परंतु त्यांत अशी शर्त आहे कीं दरसाल रुपये २५० दोनशे पन्नास खिरत द्यावी- जर एकसाल खिस्त पडल्यास शेतें म्हणजे गाहाण माल ताब्यांत घ्यावांतर मजकडुन या सालची सालबंदी पडली आहे म्हणुन तुम्हांस कळवितों कीं ही नोटीस पावताच शेते तुमच्या ताब्यांत घ्यावी मजकडुन कांहीं हरकत नाहीं. तुमचे रुपये फिटले म्हणजे मी तुमचे जवळुन ताब्यात दिलेली शेतें परत घेईन जर तुम्हीं शेतें ताब्यांत घेण्या करितां फिर्याद करालतर कोर्टाचा खर्च देणार नाहीं आणि या सालीं जमिन पडीत पडल्यास सरकारी सारा तुम्हांस द्यावा लागेल व सदहुं शेता बद्दल नफ्याचे रुपये तुमचे जवळुन घेतले जातील. म्हणुन तुम्हांस नोटीसिनें कळविलें आहे या नोटीशी पूर्वी आपणास पुष्कळ सांगीतले परंतु आपण ऐकले नाहीं हल्लीं नोटीशी प्रमाणे न करालतर रितीप्रमाणे तजवीज केली जाईल कळावे तारिख १७ माहे मे सन १८८७ इसवी.

( सही )

चंद्रभान वलद सुर्यभान देश मुख राहाणार माझोड दस्तुर खुद.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

साहत्माही " ३ " " ८८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास ............... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८१
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ........ ८१

Per annum in arrears 7 " 1R. 8 a
Six monthly........... 3 " 8 as
Single copy.......................... 4as

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 8as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXI AKOLA MONDAY 30 MAY 1887 NO 21
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ३० माहे मे सन १८८७ इ० अंक २१


## जाहिरात

खालीं सही करणार यांजकडून नाहीरात देण्यांत येतें कीं आह्मांस खानगी रीतिनें इंग्लिश शिकविण्या कारतां व कारकुनाचें कामा करितां एक मनुष्य पाहिजे. पगार दरमहा वीस रुपये मिळेल. व नौकरीची मुदत दोन वर्षाची ठरविली जाईल. मात्र तो इसम म्याट्रिक्युलेशन परिक्षा पास असल्या बद्दल त्याज जवळ सर्टिफिकीट असलें पाहिजे. ज्यांस ही जागा पाहिजे असेल त्यांनीं खालीं सही करणार याकडे आपला पता कळवावा. कळावें.

अमृतराव विनायकराव देशमुख कसबे चांदोळ तालुके चिखली जिल्हा बुलडाणा


वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ट शुद्ध ८ शके १८०९

## युरोपांतील देशांचा हलीचा परस्पर संबंध व त्याचा या देशावर परिणाम

युरोप खंडांत प्रधानराष्ट्रें म्हणून मोठमोठालीं बलाढ्य राष्ट्रें आहेत. या राज्यांच्या सल्यानें युरोपांतील तंटेबखेडे नाहींसे व्हावेत व त्यांचे वजनाने युरोपखंडांत शांतता राहावी अशा योग्यतेचीं तीं आहेत. पारीस शहरांत सन १८१५ साली फ्रान्स व इतर देश यामध्यें जो तंटा झाला तेव्हांपासून तर वजनदार राष्ट्रें कोणतीं आहेत याविषयीं बहुतेक निर्णय ठरला. इंग्लंड, जर्मनी व फ्रान्स यांचे वजनाविषयीं बिलकूल संशय राहिला नाहीं. परंतु रशिया सारखें विस्तीर्ण राज्याचा ज्याप्रमाणें प्रभाव असावा असें प्रथम दर्शनी अनुमान वाटतें तितका त्यावेळी नव्हता. त्या नंतर युरोप खंडांत जिकडे तिकडे शांतता बरेच दिवस राहिली. त्या अवकाशांत रशिया सारख्या बलिष्ट राज्यानें आपली सत्ता जास्त वाढविण्याविषयीं व आपलें वजन जास्त होईल अशा रितीचें वर्तन ठेवण्याविषयीं प्रयत्न करणें हे असंभाव्य होतें; व तेव्हांपासून जे रशियाचे राज्यकर्ते झाले त्यांनी जितके दिवस आपली सत्ता वाढवीली व आपलें राज्याचा मोठेपणा वाढविण्याविषयीं वेळोवेळ यत्न करण्याचे कमी केलें नाहीं. प्रथेस काहीं प्रकारचे हाक देऊन तीस खर्षां केले व तुर्कस्थानाशीं लढाई करून आपली सत्ता वाढविली. तुर्कस्थानचे लढाई नंतर रशियाचें राज्य कर्त्यांस आपली सत्ता वाढविण्याची युरोपखंडांत जागा राहिली नाहीं. तेव्हा त्यांनीं आपली सत्ता मध्य एशियामध्यें वाढविण्याकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें आपली खटपट ही जारी ठेविली; व आजचे मानानें पाहता त्याचे खटपटीस पुष्कळ अंशीं यश आलें असें ही आज दिसून येत आहे. रशियास आपली सत्ता मध्य एशियांत वाढविण्यास संधी ही फार चांगली सापडली; ह्मणजे खुद्द युरोपामध्यें जिकडेतिकडे शांतता असून फ्रांस व जर्मनी या परस्परांत विरोध असल्यानें रशियास दोघांची ही फारशी भिती राहिली नाहीं. फ्रान्स देशाचा बादशहा नेपोलियन याचा अखेर पराभव होऊन फ्रान्स देशापासून जर्मनीनें वीस कोट फ्रांक्स खंडणी घेतली तेव्हांपासून जर्मनीचें व फ्रान्साचें वैमनस्य आहेच. फ्रान्स देशाचे मनांत जर्मनीचा सूड कधीं घेतां येईल असें तेव्हांपासून हाचत आहेच; व त्यामुळें तेथील लोकांनीं आपला व्यापार वाढवून देशास मोठपणा आणला. कर्ज करून लष्कर वाढविलें. जर्मनी ही हे जाणून आहेच व त्यामुळें त्यांनींहि आपलें लष्कर दिवसानुदिवस वाढविण्याचे ठरलेच आहे. जर्मनीचे प्रधान प्रिन्स बिसमार्क हे मोठे राजधुरंधर आहेत; त्यांनींच फ्रांस देशास जेर केले व लष्कर वाढविण्याची ही खटपट त्यांचीच. याप्रमाणें आपापलीं लष्करें वाढवीत बसलेले फ्रांस व जर्मनी देशांस रशियानें राज्य वाढविण्याची खटपट केल्यास आजकडे फार बारीक दृष्टीनें पाहात बसण्यास वेळ कोठचा. युरोपाची स्वस्थता जोंपर्यंत रशियानें मोडली नाहीं तोंपर्यंत दोन्ही देशानां रशियाकडे पाहण्याचें कारण नव्हतें; व रशियानें शाहाणपणा करून युरोपांत फारशी ढवळाढवळ करण्याचा यत्न केला नाहीं. याप्रमाणे या देशांची व्यवस्था. तुर्कस्थान तर रशियाचे खिजगणतींत ही नाहीं. बाकी राहतांपैकीं एशियास भय बाळगण्याजोगें कायतें इंग्लंडचें राज्य राहिलें. जेव्हांपासून मध्य एशियांत रशियानें राज्य वाढविण्याचा यत्न केला तेव्हांपासून इंग्लंडचा वाकडा डोळा त्या राष्ट्राकडे आहेच, पण मध्य एशियांत रशियानें पाहिजे तें केलें तरी त्यामध्यें इंग्लंड देशाला बोलण्याला अधिकार नाहीं. कारण यांचा त्याठिकाणीं अर्थाअर्थी संबंध नाहीं. रशियानें तरी हेंच लक्षांत आणून फार लांबवर नजर पोंचविली व आपणास हिंदुस्थानावर मोहीम करण्यापूर्वी मध्य एशियांत पूर्ण अंमल बसविला पाहिजे असा विचार करून त्याप्रमाणें हळूहळू आपली कारवाई चालविली. इंग्लंड देशाची समुद्रावर लढाई करण्याची शक्ती फार विलक्षण आहे व इंग्लंडची समुद्रावरची फौज समुद्राचे रस्त्यानें आपण जाऊं लागल्यास तेव्हांच पराभव करून टाकील असें जाणून रशियानें मध्य एशियांतून वेळ पोखरण्याचा प्रयत्न चालविला. असें करताकरता अफगाणीस्थानचे सरहद्दीपर्यंत येऊन मजल रशियानें भिडविली. येथपर्यंत येण्यापूर्वींच इंग्लंड देशानें ही अफगाणिस्थानांतील एका आमिरास गादीवरून काढून दुसऱ्यास गादीवर बसविलें व त्यांस वर्षाचे वर्षास पैसे देऊन व इतर रीतीनें अफगाणीस्थानचे आमिरास आपला दोस्त करून ठेवला. रशियानें ही पलीकडून आपली सरहद्द वाढण्याविषयीं यत्न चालविला. तेव्हा गोष्ट निकराला येऊन पोंचली; व इंग्लंड देशाचे व रशियाचे कमिशनर यांणीं मिळून अफगाणिस्थानची सरहद्द ठरवून पक्की करून टाकावी असें ठरलें; व त्याप्रमाणें कमिशनर ही नेमिले गेलें. त्या नंतर वेळोवेळ अनेक सबबी सांगून रशियाचे कमिशनरांनीं सरहद्द ठरविण्याचें लांबणीवर टाकण्याचे चालविलें. इतकें झालें असतां ही इंग्लंड सरहद्द कायम करण्यासाठीं एक सारखे तयार होतेंच. हल्लीं जी बातमी रशियातून आली आहे त्यावरून असें होते कीं सरहद्द ठरण्याची बहुतेक संभव नाहींसा झाला. कारण दोन्ही कमिशनरांमध्यें सरहद्द कोठें कायम करावी या विषयीं वाद पडला आहे व उभय पक्षी हें आपलें म्हणणें कायम ठेवण्यास इच्छितात; असें झाल्यानें थोडक्याच दिवसांत नेमलेले कमिशनर परत येतील. व पुन्हां सरहद्दचा तंटा राहिला तो राहिलाच. हिंदुस्थानचे तिजोरींतून आजपर्यंत कमिशन संबंधानें लक्षावधि रुपये खर्च झाला त्याची बहुतेक मार्ता होण्याची वेळ आली आहे. इतका खर्च हिंदुस्थानवर लादला जाऊन अखेर परिणाम संशयात्मकच. ज्या वेळेस हें कमिशन पूर्वी आफगाणिस्थानांत सरहद्द ठरविण्या करितां गेले त्या नंतर थोडेच दिवसांनीं आह्मास परिणामाचा संशय येऊन आम्ही त्या संबंधानें लिहिलेही होते; व या प्रमाणें ज्या इतर पुष्कळांस रशयाचा कोटवानपणा ठाऊन होतो त्या सर्वांचें ही मत [illegible] असेंच होतें कीं रशियानें मनांत खरोखर इंग्लंड देशाशीं सल्ला ठेवावा व आफगाणिस्थानाची व आपली सरहद्द पक्की ठरवावी असें मुळींच पहिल्या पासून नव्हतें व वेळोवेळ नसत्या गाचे सरहद्द प्रकरण लांबणीवर पडत चाललें तसतसें संशयास कारण होत गेलें व हल्लीं तर रशियाचा उद्देश स्पष्ट झाला आहे. केवळ डोळे मिटून [illegible] स्थिती न पहाणारे [illegible] संबंधांत असतील त्यास मात्र रशियाचे उद्देश काय आहेत या विषयीं अतःपर संशय राहील. इतरांस स्पष्टपणें कळून आला. असो या प्रमाणें रशियाचा उद्देश स्पष्टपणें झाल्यावर रशियाचा व इंग्लंडचा तंटा झाला असतां युरोपांतील राष्ट्रें कोणत्या बाजुस मिळतील याचें पक्कें अनुमान जरी आज करितां येत नाहीं तत्रापि थोडे बहुत करतां येईल. फ्रान्स व जर्मनी या उभयतांचा विरोधभाव सुप्रसिद्ध असून तो कायमच आहे. प्रिन्स बिसमार्क यांणी थोडे दिवसापूर्वीं असें बोलून दाखविलें होतें कीं या उन्हाळ्यांत युरोप खंडांत आपण लढाई उपस्थित करणार नाहीं. व फ्रान्स देशाचे प्रधान मंडळापैकीं मुख्य प्रधान एम. गाबलेट यांणी असें बोलून दाखविले कीं फ्रान्स देशाचें मनांतून लढाई करण्याचे बिलकुल नाहीं. परंतु फ्रान्स देशाचे हक्क व त्याचा मान या दोन्ही गोष्टीस धक्का बसून देण्याची त्यांची तयारी आहे. याचा अर्थ एवढाच कीं आपण होऊन लढाई उपस्थित करण्याचा फ्रान्स देशाचा ही उद्देश नाहीं. या मुळें दोन्हीही देशांपैकीं इंग्लंड व रशिया यांचे मधील तंटा उपस्थित झाल्यास त्यांत पडतील असें वाटत नाहीं. व फ्रान्स देशास किंवा जर्मनी देशास मध्य एशियांत इंग्लंड व रशिया यांचा तंटा लागल्यास त्यांत पडण्या जोगें उभयतास ही कारण नाहीं. कारण उभयतांपैकीं कोणाची ही त्या प्रदेशाशीं संबंध नाहीं. ही दोन्ही देशाची उदासिनता रशियास ठाऊन आहे; व त्यामुळेंच रशियानें सरहद्दी प्रकरणाचा वर सांगितलें प्रमाणें शेवट करण्याचा रंग आणला आहे. या शिवाय ही रशियाची खटपट थोडी चालली नाहीं. रशियाचा वकील [illegible] गव्हाचे व तेथील शहानें त्यांचा सन्मान केल्याचें आपणास माहीत आहेच; यावरून इराणचे शहाकडे ही रशियाचा पैगाम चालू आहेच. तसेच आफगाणिस्थानचे अमिराचें राज्याखाली गिलझाई नांवचे लोक आहेत त्यांनीं अमिराचे विरुद्ध बंड करून अमिराचे सेनाधीपतीच्या पराभव केला व त्यांस बंड करण्यासाठीं रशियानें उठावणी केली आहे व त्यांत रशियाची अंतस्थ मदत आहे असा आपलेकांचा तर्क आहे व तो कदाचित खरा असण्याचा संभव आहे. या प्रमाणें रशियाची खटपट असल्या मुळें साहाजिकपणें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं रशिया व इंग्लंड या उभयतांत तंटा झाला असतां युरोप खंडातील कोणत्या राज्याची मदत इंग्लंड देशास होईल व ती मदत हिंदुस्थानातील या दोन राष्ट्रांचें तंट्यांत कितपत उपयोगीं पडेल. एकंदर युरोपाची स्थिती पहातां इंग्लंड देशास आपण होऊन कोणी पुढारी राष्ट्रांपैकीं मदत करतील किंवा या भानगडींत पडण्यास घरांस कोणतु[illegible]

कारें कारण आहे असें दिसत नाहीं. बहुशः तंस्याचा प्रसंग आला असतां ईग्लंड देशास बहुतें करून स्वदाहुवलानेंच में करण्याचें तें करावें लागेल. प्रसंगतर फार कठीण दिसतो, पण तितक्या थरावर गोष्ट येण्यास अद्याप कदाचित् बराच काळ लागेल व तेवढ्यांत कदाचित् इंग्लंडांतील राज्यधुरीण पुरुष एखादी तोड काढतील.

## बंगाल इलाख्यांतील एक सनदी नोकर.

मिस्तर बीम्स म्हणून बंगाल इलाख्यांत मोठ्या हुद्यावर एक सिव्हिल सर्व्हंट सनदी कामगार आहेत. पुष्कळ प्रसंगावरून हे नेटिवांचे मोठे हितकर्ते आहेत असें म्हणवत नाहीं. फिन्यान्स कमिशन पुढें यांची साक्ष नुकतीच झाली त्यावेळेस त्यांनीं नेटिवांचे विरुद्ध म्हणजे मोठ मोठ्या हुद्यांस नेटिव्ह लायक नाहींत वगैरे मतलबाचा आपला अभिप्राय दिला. या गृहस्थांचे मागील नोकरीची जी थोडी माहिती मिळते तीवरून हे गृहस्थ थोडेसे आडदांड स्वभावाचें व आपण वरिष्ट प्रतीचे सनदी सरकारी अधिकारी तेव्हां पाहिजे तें ..रण्यास आपणांस पूर्ण अधिकार व सामर्थ्य आहे अशा समजुतेचें जुने कामगारां पैकीं हे आहेत असें दिसतें. कर्मधर्म संयोगानें ज्या नेटिवांस यांणीं आपल्या अभिप्रायानें कमीपणा आणण्याचा प्रयत्न केला त्यांस थोड्याच वेळांत सूड उगवण्याची संधि मिळाली. या प्रकरणाचे संबंधानें जी माहिती बंगाल इलाख्यांतील अनेक वर्तमानपत्रांत अलीकडे प्रसिद्ध झाली आहे तीवरून मिस्तर बीम्स यांणीं नेटिवांस जितका कमीपणा आणण्याचा प्रयत्न केला त्या पेक्षां शतपट खुद्द त्यांस कमीपणा येत आहे. जशास तसें मिळाल्यास त्यांत मोठेंसें वाईट वाटण्यास कारण नाहीं. परंतु आश्चर्य हेंकीं, आपलें स्वतांचें वर्तन निर्दोष नसतां दुसऱ्याचा कमीपणा बाहेर काढण्या साठीं किंवा खरेखोटे आरोप दुसऱ्यावर आणण्यास अशा पुरुषास क्षणमात्रही संकोच वाटत नाहीं.

सिव्हिल सर्व्हंट जेव्हां विलायतेहून हिंकडे येतात त्या वेळेस त्यांनीं सरकारास कांहीं करार लिहून द्यावे लागतात. त्यांत योग्यरितीनें व इमानानें वर्तण्या बद्दल पुष्कळ कलमें आहेत. त्यांपैकीं कर्जाचे संबंधानें एक कलम आहे. त्याचा मतलब असा आहेकीं ज्या मनुष्याशीं सरकारी कामाचे कारणानें संबंध येण्याजोगा आहे व जो स्वताचे अधिकाराचे स्थलसीमेंत राहत असेल किंवां राहाण्यास येण्या सारखा असेल असा कोणीही सावकार किंवा जमीदार किंवा रयत किंवा कोणत्याही प्रकारचा मनुष्य या पासून कर्ज घेण्यास सनदी नोकरास बिलकुल प्रतिबंध आहे. व या प्रतिबंधा विरुद्ध वर्तन करील तो आपल्याहुद्यास कराराचे शर्तीप्रमाणे नालायक ठरतो. सनदी नोकर होतेवेळेस जर कोणास कर्ज असेल तर तो त्या कारणानें मोठ्या हुद्याचे व विश्वासाचे कामास नालायक ठरतो. वस्तुतः या संबंधानें इतकी सक्त शर्त आहे कीं कोणत्याही स्वरूपानें देणगी, नजराणा, बक्षीस, कर्ज, करार मोडल्याबांचून सनदीं नोकरास बिलकुल घेतां येत नाहीं. व कोणत्याही लांचलुचपतीचे मोहांत यांणी पडूं नये ह्मणून राजा सारख्या माहिना नेमणुका व जाहागिरी सारखीं पेनशनें सरकार या प्रतीचे नोकरांस देतें. परंतु इतकें मोठें पगार दिले तरी प्रसंगविशेषीं अशा मोठ्या कामगारास हीं मोह सुटत नाहीं. अशा प्रकारची या वरील बड्या कामगाराची स्थिती असल्या बद्दल विशेषतः कलकत्यांतील अनेक लहानमोठें वर्तमान पत्रकारांनीं उघडपणे मिस्तर बीम्स यांजवर आरोप आणलेले आहेत. या वर्तमानपत्रांस चांगला आधार असल्या वांचून त्यांणी रु.पांवर काठी उगारली असेल यांत शंका नाहीं. मिस्तर बीम्स हे कलेक्टर व रेव्हिन्यूकमिशनर अशा हुद्यांवर असतां ज्या लोकांचा संबंध त्यांच्याशीं त्याचे हुद्याचे नात्यानें होता व येणार होता अशा मनुष्यांपासून त्यांणी पुष्कळ कर्ज वेळोवेळीं घेतल्याचा त्यावर चार्ज आहे हें पाहून आह्मांस मोठें आश्चर्य वाटतें. जर सनदी नोकरांस राजासारख्या नेमणुका देऊन देखील त्यांस निर्दोष ठेववत नाहीं तर त्यास इतका मोठा पगार तरी द्यावा हें समजत नाहीं. पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य होतें त्यावेळेस कंपनीचे नोकरास लहान पगार मिळत असे तेव्हां ते उघडपणें लांच घेत होते. त्यांणीं लांच घेऊन अन्याय करूं नये ह्मणून पुढें पगार पुष्कळपट वाढविले. परंतु पूर्वं स्थिती सर्वांशीं खोटी ह्मणतां येत नाहीं. एका उदाहरणावरून सर्व सनदी नोकरांचे वर्गांस दोष देतां येणार नाहीं हे खरें. पण या प्रकारचें एकच उदाहरण आहे असें नाहीं. व्यापार धंदा करूं नये कोणत्याही व्यापार धंद्यांत पाती वगैरे ठेवूं नये अशी ही सक्त शर्त सनदी नोकरांस लागू आहेच. पण ही शर्त सर्वांनीं पाळली आहे असें ह्मणवणार नाहीं. मद्रासचे कौंसिलदार आनरेबल सिलिव्हान यांचें प्रकरण नुकतेंच झालेले आहे व ते थेट विलायत सरकार पावेतों गेलें होतें हें आमचे वाचकांस आठवत असेल दुसऱ्या अनेक सनदी मोठ्या नोकरांबद्दल अशाच प्रकारची सरकारास शंका आल्याबद्दल त्यांस विचारणा झाल्याचे समजतें. सरकार पावेतों ज्याचा गवगवा जाऊन पोंचला व जीं गुह्य राहूं शकत नाहींत अशीं प्रकरणें मात्र उघडकीस येतात व सरकार त्याबद्दल चौकशी करितें. परंतु उघडकीस न आलेलीं किती अशीं उदाहरणें असतील याची कल्पना करतां येत नाहीं. पुष्कळ असतील यांत शंका नाहीं.

बरद्वान महाराजांचें प्रकरणाचे संबंधानें मिस्तर बीम्स यांचीं जीं कृत्यें नुकतींच लौकिकी नजरेस आलीं आहेत तीं या बड्या गृहस्थास अधिक च दोषास्पद करतात. परंतु हे प्रकरण फारच मोठें व चमत्कारिक आहे आणि सरकारचे मोठमोठे कामदार न्यायानें किंवा अन्यायानें एखाद्याचे पाठीस लागले ह्मणजे त्यास कोणत्या स्थितीस नेऊन पोंचवितात याचें हें एक ताजें उदाहरण झालें आहे. याची माहिती सवडी अंतीं पुढें देऊं.

## प्रोफेसर भांडारकर यांचें पुण्यांतील हिराबागेत जैन धर्मावर व्याख्यान.

सदरहू बद्दल हकीकत आम्हांस पुण्याहून लिहून आली आहे व्याख्यानाचा जो गोषवारा आम्हाकडे आला आहे त्यावरून व्याख्यान फार मनोरंजक झाले असावे असें वाटतें. जैन धर्मा सारखा प्रचंड धर्म ज्याचे खंडन करण्याकरितां शंकराचार्या सारखे प्रवीण आचार्य यांणी हिंदुधर्म संस्थापनार्थ केवळ अवतार घेतला होता अशी आपले लोकांची समजुत आहे त्याशी जैन धर्मा विषयीं आपले धर्मी यास जितकी माहीती होईल तितकी चांगलीच जगातील जे मोठमोठे धर्म आहेत त्यातील जैनधर्म आहे व हली देखील हिंदुस्थानचे पुष्कळ भागात हा धर्म चालुं आहे व खुद्द ब्राम्हण धर्मावर सुद्धा या धर्माची छट्टा पडली अशा योग्यतेच्या धर्मा बद्दल प्रोफेसर भांडारकर यांणी व्याख्यान देऊन लोकांचा बराच फायदा केला. व्याख्यानाचा सारांश खाली लिहिल्या प्रमाणें:—

"मनुष्य मात्रांची प्रवृत्ति अशी आहे कीं आपणास सुख प्राप्ति व दुःखपरिहार या दोन्ही गोष्टी असाव्यात, या हेतुनें मनुष्यांनी चेतन व अचेतन वस्तुवर त्यांचे ठायीं वर सांगितलेले फायदे करण्याची शक्ति आहे असें जाणुन विश्वास धरला. अचेतन वस्तु म्हटल्या म्हणजे त्यांत या संबंधानें दोन भेद आहेत कांहीं लोकांचा विश्वास मंत्राचे ठिकाणी व इतरांचा विश्वास ताइत किंवा इतर भारलेले पदार्थ यांजवर असतो. हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार पृथिव्यादि जी कांहीं तत्वें आहेत यांचे या सृष्टीत जे चमत्कार दिसतात त्या प्रत्येक चमत्काराचे चालक कोणी तरी पुरुष असावेत व त्यांचे भजन पुजन केले असतां ते आपणास सुख प्राप्ति व दुःख परिहार करून देतील असा विश्वास. तिसरा प्रकार योग्यायोग्यतेचा विचार. चांगलें व वाईट हे जाणण्या विषयीं जी मनाची शक्ति आहे त्या शक्तिच्या योगें करून इंद्रियदमन करणें व त्या मुळें वर दोन हेतु साध्य करून घेणे. चवथा प्रकार या जगांत जे अनेक सृष्ट पदार्थ आहेत त्यांजमध्यें जी शक्ति आहे व आपल्या शरीरांत चालक अशी जी शक्ति आहे ते अभिन्न असून त्या दोन्हींची ऐक्यता समजून घेऊन तल्लीन होऊन केवळ त्यामध्यें अंतर्धान पावणें. या पैकीं शेवटले दोन प्रकारास moral basis oi religion आणि eothetic basis of religion असें इंग्रजींत अनुक्रमे ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

जैन धर्मांप्रमाणें महावीर किंवा त्या धर्माचा मुख्य प्रवर्तक जिन हा चोविसावा तीर्थकार होय. याचे पूर्वी २३ तिर्थकार म्हणजे धर्मप्रवर्तक झाले परंतु महावीर हा तीर्थकार झाल्यापासून त्या धर्माचें माहात्म फार वढलें. मागें झालेले २३ तीर्थकार कदाचित् काल्पनिक असावेत व मनुष्यमात्रांत आपला धर्म फार प्राचीन आहे असें दिसण्यांत दिसावें म्हणून २३ तीर्थकार कदाचित् जिनाचे पूर्वी घातलें असावेत. ज्या प्रमाणें लिंगाईत लोकाचा धर्म बसव यांणें प्रवृत्त केला ही गोष्ट सुसिद्ध असून हा लिंगाईत लोक जसे आपले धर्मास आणु पहातात त्याच प्रमाणें या जैन धर्माचे प्रसार पूर्वी हिंदुस्थानांत पांचवे तीर्थकारा विषयीं कल्पना असावी. जैन धर्माचा प्रसार पूर्वी हिंदुस्थानांत पांचवे किंवा सहावे इसवी सनाचे शकांत फार होता या विषयीं हिमु येथें एक खावावर अशोकराजा राज्य करीत असल्या बद्दलचा जो शिळा लेख आहे व सिलोनांत व मथुरेंत जे लेख व ताम्रपट वगैरे आहेत त्यावरून सिद्ध होतें. जैन धर्मांत मुख्य दोन पंथ आहेत. श्वेतांबरी व दिगंबरी यांच्या मध्यें पुष्कळ तफावत आहे तरी पण दोन्हीं जैन मताचे खरे. इसवी सनाचे पूर्वी ४८८ व ४७० वर्षे जिनाचे निर्वाण झालें असें अनुक्रमें या दोन्ही पक्षाचें मत आहे. सिलोन देशांत इसवी सनाचे पूर्वी ५४३ वर्षे जिनाच निर्वाण झालें असें मानतात. युरोप खंडांतील साहेब लोकांनीं असा प्रयास केला आहे हे इसवी सनाचे पूर्वी निर्वाण झालें असावें. (या गोष्टींची पुष्कळ साधक बाधक प्रमाणें ही त्यांनीं सांगितली) पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, व हा समज युरोपियन पंडितांना ही आहे कीं, जैन धर्म हा बौद्ध धर्माची पेक शाखा आहे परंतु हा समज चुकीचा आहे असे त्यांना सांगितलें याचें प्रमाण माहावीर अथवा जिन याचेंच दुसरें नांव ज्ञातनंदन अथवा ज्ञातपुत्र; हेंच नांव प्राकृत भाषेंत 'नायउत्त' असें बदललें आहे. हें नांव अजातशत्रु व बुध्द यांचा प्रश्नोत्तर रूप संवाद दिला आहे त्या मध्यें येतें म्हणजे अजातशत्रु हा तत्व पाहणारा म्हणून बुद्धास कांहीं प्रश्न विचारतां झाला त्यात त्यानें बुद्धास सांगितले कीं हेंच आपण पूर्वी 'नायउत्त' यास केले या वरून बहुधा बुद्ध व जिन समकालिन असावेत असें वाटते त्याच प्रमाणें पूर्वी ब्राम्हण व श्रमण उर्फ सन्याशी या दोन तऱ्हेचे तत्ववेत्ते होते, यांत श्रमणांस दुसरें नांव निर्ग्रंथ असें होतें. हे जैन धर्माचे होतेच यांचे नांव बुध्धाचे काली सांपडते. शिवाय जैन लोकांचे मूळचे प्रथमारंभीं धर्म बहुशः पाली भाषेंत आहेत व ही भाषा संस्कृताशी फार जवळ आहे व बौध्ध धर्माचे ग्रंथ प्राकृत भाषेंत आहेत. पुर्वी जैनांचा धर्म गुरुशिष्य परंपरेने मुखानें चालत होता तो पुढें एका जैन पंडिताने 'वलभी' शहरात ग्रंथांत लिहुन ठेवला; या [illegible] वरून जैन धर्म हा बौद्ध धर्म [illegible]

नव्हे. जैन धर्माची तीन तत्वें मुख्य आहेत तीं दर्शन; ज्ञान व चारित्र. दर्शन म्हणजे इतर धर्म पराङ्मुखता व जैन धर्म निष्टा; मिथ्यात्व जाऊन सम्यक्त्व येणें म्हणजे जैन धर्म परता होणें दुसरें ज्ञान व तिसरें चरित्र श्रमण व गृहस्थ किंवा श्रावक उपदेश ऐकणारे ) यांनीं कोणकोणती व्रतें आचरण करावी अशाविषयीं श्वेतांबरी व दिगंबरी या दोन्ही मताचे लोकांचे काय ह्मणणें आहे याविषयीं ही बरेंच निरूपण केलें. या धर्माचे लोकांचें मतांप्रमाणें ईश्वर अशी निराळी व्यक्ति ज्यास राग लोभादि मानुषिक दोषांचा आरोप करतां येईल अशी मुळींच नसून योग्यायोग्य वस्तूंचा विचार मनांत आणून इंद्रियानिग्रह करणें ही जी धर्मसंबंधी एक तऱ्हा सांगितली तसा आहे. अशा प्रकारें इंद्रियें स्वाधीन करून घेण्यांतच कायतें उत्तम सुख आहे व त्यानेंच सुख प्राप्ति व दुःख परिहार होतो असें ते मानतात, याचे मत ईश्वराचे संबंधानें सांख्याचे मताप्रमाणें नसून वैशेषिक ह्मणून जे तत्ववेत्ते त्यांचें जवळजवळ येतें. या धर्मांत ही पण कोणी एखादा प्रबळ पुरुषाचें साह्य आपणास असावें अशी कल्पना पुढें शिरली व त्यामुळेंच तीर्थंकार यांचे भजन पुजन केलें ह्मणजे ते प्रबल पुरुष आपणास वर लिहिलेलें हेतू द्रप साधण्यास उपयोगीं पडतील असें त्यापयांतील लोकांस वाटू लागल्यामुळें त्याचे धर्मांत चेतन वस्तुचे ठिकाणीं विश्वास हें जें एक धर्म तत्व सांगितले तेंही शिरलें आहे. ''

अर्थात वरील व्याख्यान सारांशांत प्रोफेसर भांडारकर यांणी सांगितल्यापेक्षां पुष्कळ कमी आले असेल यांत नवल नाहीं परंतु निदान त्यांचे भाषणाचा कांहीं लाभ आमचें वाचकांस मिळावा हे जाणून आम्ही हा व्याख्यानसारांश त्यांस सादर केला आहे.

# The Berar Samachar

MONDAY MAY 30 1887.

## THE POONA SUMMER SEASION.

It is delightful to spend the May vacation in a place like Poona. Some of our Berar notablities including our Director of Public Instruction Mr. Jatar are staying at Poona. It is desirable that the hot weather of Berar, which has now become very oppressive should be avoided if possible, and it is no doubt a decided advantage to those that can afford to spend their summers in a place like Poona. The heat there is comparatively mild and the evening and morning breeze can never be paralleled by any the best that we get here. Although summer sanitariums are superior to Poona as regards weather, yet the Poona season, considering the social and intellectual advantages that one derives by a short sojourn there, is so agreeable that one is half tempted to make his choice between Poona and the sanitariums The Poona figs are well-known; and [illegible]e its Motiya flowers; and the [illegible]cane juice is also a cheap luxury; all things added to an evening drive to the Bund gardens constitute the ideal of an Epicurean outsider who stays in that city, and yet there are other charms for persons requiring intellectual food; for there are those elocution meetings in Marathi and Sanskrit and English where a speaker has to face a rather punctilious and over-critical audience of the city; and these are the series of lectures delivered at Hirabaug not to speak of the sangit dramatic companies which attract even now a very crowded audience. We had occasion the other day to notice some defects in the Marathi elocution meetings at Poona-defects which since last year have been brought in as rather remarkable features of our Berar Elocution Gathering at Amraoti. The next Elocution meeting was held in the Anandodbhao Theatre' in Sanskrit and English; and we are informed that the institution has been only an expriment and has yet been too recent to achieve any marked success. The lecture series at Hirabaug, was once a very grand thing; but we are assured that this year's lectures until last sunday are failures. A large and intelligent audience can only be attracted by the fame of the speaker, but the people do not expect at a place like Hirabaug to hear the maiden speeches of embryo orators. We have received good many letters giving lively descriptions of the several lectures at Hirabaug, but we think it is waste of time and space to print any of them. There is however one feature in all the lectures that every year new men are tempted to use their oratorical energies and they get accustomed to what is becoming one important ingredient of modern civilization speechifying 'It is only fair to Mr. M. V. Kane, a gentleman who has been to England and America to say that his lecture on English and American experiences' unprepared as he was, was interesting;' thus writes a correspondent from Poona.

There is decidedly one advantage in the Poona season; and it is, that people of the Presidency come together keep up acquaintances and contract new ones and thus a healthy interchange of thoughts and ideas naturally takes place. A dose of these lectures for a good many days of the month and the general intellectual influence of Poona Society is too much to be resisted; and even persons who are gifted with mental calibre of not a very high order have their intellects sharpened into activity. We would recommend a place like Poona on this score particularly to two classes of people in Berar. Our members of the Bar who are almost eaten up by the all absorbing mammon and our Jamidars. The first class who are membered among our lights in Berar ought to know and will know from the scene of activities at Poona, that there is something besides money in this world worth living and striving for. A very healthy and much needed dose will in that city be administered to them. To the second class of people, it will be beneficial generally by placing higher ideals before them and by affording them an opportunity of observing the men and country which contains germs of activities of quite a foreign nature to those found in Berar. It is to b[illegible] the two classes would [illegible]elves of the benefits [illegible] summer season.

Some days ago we were informed that a definite proposal was made to start something like a series of lectures at our two centres Akola and Amraoti. We doubt not, the scheme would be a success if some of our advanced gentlemen take in to their heads to make it a success; but the fear is that like every idea that we have taken up from the Bombay Presidency (except that of the system of education) this also would be shilly-shally things perhaps it is Berar heat that is to be blamed, for it undoubtedly evaporates a great portion of the energies of our local leaders and almost dries up the remainder. The series however is to commence life under the balmy influence of July showers and that will certainly go in our favor as we need not be afraid of that troublesome agent *Heat*.

---

We thankfully acknowledge the receipt of Residents Book circular No. 9 of 1887 publishing Commissioner's memorandum on the results of the measures adopted in the H.A.D. for the the destruction of wild animals and venomous snakes during 1886, and the Resident's Resolution thereon

---

Weather hot. Sky clear and sometimes cloudy. Public health not bad.

During the past week a number of houses in Ridhora near Akola were burnt by a great fire which caused a considerable loss of property. No lives were lost.

We are very sorry to announce the death of Mr. Abaji Khanderao Divekar one of the old pleaders of this place. The gentleman died of a short sickness caused by a kind of pimple to one of his hands.

We hear that Mr. Ganesh Shrikrishna Khaperde, B. A, L L. B. Extra Assistant Commissioner, is appointed to preside over the Small Cause Court here.

Consequent on the departure of Colonel J. G. Bell, Judicial Commissioner H A.D. on furlough Lieutenant-Colonel H. C. A. Szczepanski, Deputy Commissioner, 1st class, is appointed to officiate as Judicial Commissioner; Lieutenant Colonel K. J.L Mackenzie, Deputy Commissioner,2nd class, is appointed to officiate as Deputy Commissioner 1st class; Lieutenant Colonel R. Bullock, Deputy Commissioner, 3rd class, is appointed to officiate as Deputy Commissioner 2nd class; and Lieutenant Colonel H. De. P. Retnick Assistant Commissioner, 1st class, is appointed to officiate as Deputy Commissioner 3rd class

## वऱ्हाड

हवामान – हवेंत उष्णता फार आहे. आकाश स्वच्छ असतें. मधून मधून ढग येतात. रोगराई म्हणण्या सारखी नाहीं.

गेले आठवड्यांत रिधोरे येथें आग लागून बरींच घरें जळालीं जिवाची हानी झाली नाहीं

येथील संभावित व जुने वकील आबाजी खंडेराव दिवेकर यांस हातास कांहीं फोड येऊन व दोनच्यार दिवस आजारी पडून ता० २७ मे रोजी रात्रीं देवाज्ञा झाली, हे कळविण्यास आम्हास फार वाईट वाटतें.

[illegible] ...दा संबंधानें

मे० कर्नल बेल साहेब जु. कमिशनर फर्लोवर गेल्यामुळें खालीं लिहिलेल्या बढत्या झाल्या.:—

लें० क० स्पान्स्की. डे० क० फर्स्ट क्लास यांस आ० जु० क० नेमिलें.

लें० क० के० जे० एल० मेकझी डे० क० सेकंड क्लास यांस आ० फर्स्ट क्लास डे०क० नेमले ले० क० आर० बुलक डे० कमिशनर, थर्ड क्लास यांस आ. डे. क. सेकंड क्लास नेमले.

ले. क. एच्. डीई. पी. रेनिक, आसि. कमिशनर फर्स्ट क्लास यांस आ. डे. क. थर्ड क्लास नेमले.

रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल्. एल्. बी. ए. अ. क. यांची येथें स्मालकाज कोर्टावर नेमणूक होणार असें समजतें.

डाक्टर जार्ज नंदी यांस निजाम सरकारानीं आठशे रुपयावर आपले संस्थानांत तालुकदार नेमलें.

---

मागाहून आलेली नोटीस

भवानी वल्लद दुरगाजी हरमकार रहाणार जनुने तालुके खामगांव जिल्हा. अकोलें. यांस नोटीस देणार जानकाई मर्द भवानी हरमकारिण इज कडून नोटीस देण्यांत येतें कीं, माझे लग्न तुमचे बरोबर होऊन आज सुमारे बारा तेरा वर्षे जहाली या बारा तेरा वर्षामध्ये तुम्हीं गजच्या जनरिती प्रमाणें पांच सहा वर्षे सासर माहेर केलें व नंतर सुमारे आज सात वर्षे मी माहेरी आहे. याचें कारण तुम्हांस आज आठ वर्षा पूर्वी पासून महारोगाचा अजार होऊन तुम्हीं घर धंदा करून संसार करावा अशा स्थीतींत न येतां तुमचा महारोगाचा अजार वाढत चालला आहे. आज सात वर्षांत तुम्ही माझी पोटा पाण्याची कांहींच तजवीज केली नाहीं, व मी तर आज सात वर्षे सावकारा पासून कर्ज काढून पोटास अन्न वस्त्र तुझे नावावर खात आहे व तु तर मांदगीनें दिवसेंदिवस फार बेजार होत आहेस व अशा तुझ्या मांदगी बद्दल मीं तुझेपाशीं रहात नाहीं. मी तुझे नावावर सात वर्षांत कर्ज काढून रुपये २१० आजपर्यंत खाल्ले आतां मजला कर्ज ही कोणी देत नाहीं वगैरे कारणानें नोटीशीनें असें कळवितें कीं नोटीस पावल्यापासुन आठ दिवसांत कर्ज रुपये २१० व ह्या नोटीशीचा खर्च वगैरे सर्व आणून द्यावा आणि लग्नाची सोडचिठ्ठी न दिल्यास मी तुमची कांहीं एक परवा न करतां एकदम दुसरा घरठाव करीन व रुपये बद्दल कोर्टांत काम चालवून सर्व घेतलें जाईल कळावें तारीख २९ माहे मे सन १८८७

सही

जानकाई मर्द भवानी हरमकारिण

इची बांगडी अस.

---

## वर्तमानसार.

इंग्लिशांचे ताब्यांतील किल्ले, तटबंदी वगैरेचे फोटोग्राफ किंवा तसबिरा सरकारच्या परवानगी शिवाय कोणासही काढूं देऊं नयेत ह्या नें लढाई [illegible] करून [illegible] ...करी हांपरांस इकड सदरं आहे [illegible] घरी राहावे [illegible]

बंगाल इलाख्यास आलेले नवीन लेफ टेनेट गव्हरनरांस कलकत्ता येथील इंडियन असोसिएशननें थोड्या दिवसापूर्वी भाषणामध्यें सांप्रत ह्या देशामध्यें लोकांची स्थिती कशी बदलत चालली आहे, हे पूर्णपणें मनांत आणून राज्यकर्त्यांनीं आपलें तदनुसार वर्तन ठेवावें असें स्पष्टपणें बोलून दाखविलें. कायदे कौंसिलमधील मेंबराची निवड लोक मताबर संपाविणे, नेटिव लोकांस मोठमोठ्या जबाबदारीच्या जागा देणें इत्यादि गोष्टीवर आपली संमती आहे असें ही त्यांच्या बोलण्यांत आलें, ह्याची नेमणूक होऊन अद्यापि फार दिवस झाले आहेत असें नाहीं परंतु इतक्यांतच त्यांनीं ज्या कांहीं थोड्याबहुत नेमणुका केल्या आहेत त्यावरून पाहतां नेटिव लोकांची त्यांच्या कारकीर्दीमध्यें नोकरीच्या संबंधानें बरीच स्थिती सुधारेल असा रंग दिसत आहे. सर रिव्हर्स टामसन ह्यांच्या कारकीर्दीमध्यें बंगाल प्रांतांतील लोकांनीं अनेक प्रकारानी कष्ट काढले आहेत तेव्हां त्यांचा मोबदला होण्याचा प्रसंग हल्लीं आला आहे ह्या गोष्टीनें त्यांस मोठा आनंद होत असेल ह्यांत कांहींमात्र संशय नाहीं.

मुंबईंतील प्रसिद्ध वकील रा० रा० महादेव चिमणाजी आपटे यांनीं पुणे मुक्कामीं एक सुंदर इमारत बांधली आहे. तेथें जुने ग्रंथाचा संग्रह करून ठेवावा व त्यांचे प्रसिद्धीकरितां तेथेंच एक छापखाना काढावा असा त्यांचा इरादा आहे. तसेंच तेथें परस्थ व प्रवासी विद्वान लोकांनीं व सन्याशानीं येऊन [illegible] दिवस राहावें व येथें त्यांचे वादविवाद चालावें. आणि त्यांचे वास्तव्य असे तोंपर्यंत त्यांची भोजनाची वगैरे सोय लागावी ह्मणून एक अन्नछत्र ठेवावें असाही त्यांचा मानस आहे, या एकंदर सर्व कृत्यास खर्च पुष्कळच लागेल परंतु तो सर्व ते स्वतः चालवणार असें कळतें. त्यांची लोकांस विनंति इतकीच आहे कीं जुने ग्रंथ व जुन्या पोथ्या लोकांनीं त्यांचे कडेस पाठवाव्या. उद्योग स्तुत्य आहे. त्यास श्रेय यावें अशी आम्ही उमेद बाळगतों.

— मद्रास येथून जो जुबिली अडेस जावयाचा त्याची पेटी तर तयार झाली. हें काम फारच मस्तुक झालेलें आहे. बाहेरून गुलाबाच्या लांकडाची एक पेटी केली आहे. त्यांत २४ इंच लांब व १४ इंच रुंद असा एक त्याच लांकडाचा भरीव तुकडा आहे. त्यावर एक १७ इंच लांब व १० इंच रुंद असा सुंदर रुपेरी पत्रा बसविला आहे. त्यावर मद्रास इलाख्यांतील जुबिली अडेस १८८७ अशा अर्थाची इंग्रजी अक्षरें कोरलेलीं आहेत. त्यावर एक १० इंच उंच असा रुपेरी हत्ती उभा केला आहे. हा हत्ती तर फारच मनोहर काढला व सगळ्यांत कौशल्य तेथेंच दाखविलें आहे. हत्तीच्या पाठीवर रत्न जडित वस्त्र टाकलेलें आहे. त्यावर उत्तम मुलाम्याचा हौदा बसविला आहे. त्यांत एक वाटोळी उभट अशी पेटी बसविली आहे. हौवर तिफणा नाग काढला आहे व हिरे वगैरे बसवले आहेत व तेथेंच रुपेरी मद्दत बसविली आहे. एकदरींत काम फार सुरेख

— लार्ड बेकनचा एक मित्र होता. त्यानें एकदां लटुपटीचा फांस लावून घेतला. परंतु दुर्दैवानें फळी निसटली. आणि प्राणांताची वेळ येते तोंच फांस तोडून त्यांस सोडविलें. परंतु या स्थितींत असता आपल्या शरीराला कांहीं इजा होत आहे असें मुळीं कळलें सुद्धा नाहीं. परंतु आपले पुढें विस्तव पेटलेला आहे त्याचा मुळचा रंग काळा होता, परंतु त्याचा मग असमानी झाला असा भास झाला असें त्यांनीं सांगितलें. व [illegible]पटन माटाग्राक यांस फ्रान्सच्या धर्मयुद्धावेळी फांशी चढविलें होतें आणि आतां त्याचा जीव जाणार इतक्यांत मार्शल टुरेन हे तेथें गेले व त्यांच्या विनंती वरून त्यास सोडलें. परंतु मांटाग्राक असें ह्मणाले कीं मला दुःख काय झालें असेल तें पळभर. परंतु मग जें एक प्रकारचें तेज दिसलें त्याचें वर्णनच होत नाहीं. आणि अशा आनंदांतून तुह्मी मला ओढून काढलें हें पाप केलें असें ते म्हणाले. दुसरा एकजण असें सांगतो कीं अशाच प्रसंगी मला प्रकाश दिसला व त्यांत सुंदर झाडी दिसली. यावरून असें वाटतें कीं अशा मरणानें दुःख अगदीं क्षणिक होतें. तो क्षण गेला ह्मणजे सुखास प्रारंभ होतो. डोळ्यापुढें निरनिराळे रंग दिसूं लागतात व ते एकदां दिसूं लागले कीं मग मागलें सर्व विसर पडतो.

— कलकत्यास यंदा निरमुलाबाला शोम यांची एक बाई बी. ए. ची परिक्षा पसार झाली. ही बियूनच्या मुलींच्या शाळेंत शिकलेली आहे. व तेथेंच एका मुलींच्या शाळेंत तिला ७० रुपयाची मास्तरणीची जागा ही मिळाली आहे. या बाईच्या भ्रताराचें नांव बाबू जे एन. शाम आहे. व तोही यंदाच ती परीक्षा पसार झालेला आहे. हें जोडपें कान्व्होकेशन हालांत पदवी घ्यावयास आतां बरोबरच जावयाचे तेव्हां लोकांचीं मनें त्यास पाहण्यास उत्सुक होतील. उघडच आहे. गोष्ट अपूर्व असली ह्मणजे असेंच व्हावयाचें.

ने० ओ०

स्टांपाकडील लैसनदार लोक कमी करून सरकारी कारकून नेमणार अशी खटपट चालू असल्याचे समजतें. यांत मात्र सरकारचा फायदा आहे, कमर काढण्याची हीच जागा होय.

श्रीरंगपट्टण — एथील टिपू सुलतानाचा राजवाडा पांच हजार रुपये खर्चून दुरुस्त करीत आहेत.

धा० कृ०

कोलंबो येथें पावसाळा सुरू झाला ह्या वरून आणखी वीस दिवसांनीं इकडे ही पाऊस पडावयास लागणार.

विलायतेहून परत आल्या नंतर बुशीर उद्दवला यांस निझामाच्या दिवाणाच्या जागेवर नेमण्यांत येणार आहे. हल्लीं हे गृहस्थ विलायतेस दिवाण या नावानें गेले नसून निझामचे मुख्त्यार या नावानें गेले आहेत. हल्लीं दिवाणाचें काम क. मार्शल हे पाहतात.

सिलोनांत पाऊस पडल्यामुळें मोतीं काढण्याचें काम बंद पडलें आहे.

ठा० म०

मुंबई इलाख्यांत कित्येक ठिकाणीं पर्जन्य पडून खरिपाच्या पेरणीस सुरुवात झाल्याचें समजतें.

निझाम सरकार हैद्राबाद शहरांत एका हेल्थ आफिसराची व सिव्हिल सर्जनाची नेमणूक करणार असें समजतें.

मालवण तालुक्यांत पाऊस पडून लोक पेरणी करावयास लागल्याचें समजतें.

आकाशाची एक मोठी फोटोग्राफानें कशी तसबीर काढिता येईल याचा विचार करण्या करितां पारिस येथें तारीख १९ रोजीं जगांतील सर्व भागांतील जोतिषी जमणार होते असें ह्मणतात.

आस्ट्रेलियांत वादळ होऊन कालवे घरणारे ५०० लोक मेल्याचे समजतें.

इंग्लंडांत चार शिलिंगांचें नवीन नाणें पाडण्याचा ठराव झाला.

काबूलच्या अमिरानें कंदहार येथें असा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे कीं जातीच्या लोकांनीं बंडावा केला आहे त्यांचे कायद्या अन्वयें रक्षण केलें जाणार नाहीं.

सेंट हेलिना येथें नेपोलियन निजत होता तो बिछाना व तैमूरलंगाची शोभिवंत तरवार नेपोलियन बोनापार्ट यांनीं आपला अंतकाळीं आपला वारस ड्यूक बाग्रम यांस दिली त्या वस्तु हल्लीं त्या जवळ आहेत असें ह्मणतात.

हिंदुस्थान सरकारच्या सर्व्हे खात्यांत हिंदुस्थांत कशी लोकवस्ती आहे हें दाखविणारा एक नकाशा तयार होत आहे तो लौकरच प्रसिद्ध होईल.

हैदराबाद येथें कर्नल मार्शल यांस ठार मारण्याचा प्रयत्न एका रोहिल्यानें केला होता तो हल्लीं अटकेंत आहे असें तेथील एका वर्तमान पत्रावरून समजतें.

सु० प०

दांत कोरून पोट भरण्या प्रमाणेंच ही कृति नव्हे काय:— सरकारच्या गीर्यारोहणा बद्दल लोकांनीं शिरा ताणून जो मोठा गवगवा चालविला होता, व ज्या गवगव्याच्या संबंधानें हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार यांच्या मध्यें जी कागदी चळवळ झाला, तिचा शेवट "डोंगर पोखरून उंदीर काढला" प्रमाणेंच झाला. असा परिणाम व्हावयाचा हें ठाऊक असून लोकांनीं उगीच मोठा नवर खटाटोप केला असें आतां लोकांना सहजच वाटेल. अशाच्या हरएक ओरडीस प्रजाअनुकूल्याचें नवर पाठबळ मिळाल्या शिवाय आमच्या ओरडीचें इष्ट फल आह्मास कधीं ही प्राप्त व्हावयाचें नाहीं हें लोकांनीं पक्कें समजावें. विलायत व हिंदुस्थान सरकार आणि इतर सरकार ह्मणजे 'गुळाचाच गणपति आणि गुळाचाच नैवेद्य' अशी स्थिति आहे. कांहीं कारकुन आणि शिपुर्डी सिमल्यास नेऊं नयेत एवढाच ठराव स्टेट सेक्रेटरींनीं केला. कारकुनें यांच[illegible] ह्मणाल हिंदुस्थान सरकारास गिर्यारोहणा बद्दल ५–६ लक्ष खर्च होतो? सर्व खर्च काय तो ह्या घेंडांच्या संबंधानें, आणि तो तर जाणारच. तेव्हां कारकून शिपूर्ड्यां मुळेंच जास्त तो काय खर्च होणार?

भूलोकांचे कुबेर— १८८५ च्या प्रासिया प्रविरील कराच्या टिपणा वरून कळतें कीं फ्रांकफोर्टचा व्यापारी व्यारन राथचैल्ड यानें २७,६०,००० मार्क उत्पन्ना बद्दल ८१,००० मार्क कर दिला. पण हा तेथला एक साधारण व्यापारी आहे. प्रख्यात कारागीर हरक्रप राहणार येसेन याचे सालीना उत्पन्न ६० लक्ष मार्क असून त्यानें १,९१,२०० मार्क कर दिला होता असे ह्मणतात.

नवी कसोटी— गारेचा एक तुकडा घेऊन त्याजवर धातूचा पदार्थ इतका घासावा कीं त्याची रेघ गारेवर दिसावी. नंतर काडी ओढून तिची ज्योत त्या रेघेस लावावी. ती धातु सोनें असल्यास रेघ नाहींशी होईल.

अर्धशिशीवर औषध— ही उठण्याचे पूर्वीं ह्मणजे मोठ्या प्राथःकाळीं दोन किंवा तीन नेपाळ बियांतील मगज घेऊन तो लिंबाचे रसांत उगाळून ज्या बाजूचें अर्धे मस्तक दुखत, असेल त्या बाजूकडील भिवईच्या वरच्या बाजूस काडीनें लावावें. मोठी आग होत नसून फक्त चुणचुण सुटते, व लागलीच गुण येतो.

शा० सू०

बऱ्हाणपुरास अलीकडे फारच जुलूम व अन्याय होऊं लागले आहेत हें आमच्या न्यायी ह्मणविणाऱ्या सरकारास लांछनास्पद नाहीं काय? गेल्या शनवारीं रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास आर्यवैभव पत्राचे एडिटर रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण भिडे हे भर चौकांतून रस्त्यानें चालले असतां त्यांस कोणी दुष्टानें 'स्याल' असें ह्मणून जो एक जोराचा घाव त्यांचे वर घातला तो डोक्यावर बसल्यानें ते निचेष्टित होऊन खालीं जमिनीवर पडले. तेवढ्यांत आणखी दोन तीन टोल त्यांगावर मारून हा मारणारा एकदम कोणास न दिसेल अशा चपळाईनें निघून गेला. एडिटर ह्मणूनच असे झाले नसेल ना?

कानपूर— येथें जे शेतकीचे शोध झाले आहेत त्यांचा १८८६ च्या खरिपाचा हंगामाचा रिपोर्ट बाहेर आला. त्यांत हिंदुस्थानी शेतकी शास्त्रांत भर पडेल असें कांहींच निघालें नाहीं. परंतु शोधांतीं अशी खात्री झाली कीं, खोल नांगरणी केला तर कापसाला जोर येतो; व आड नांगरणी करून त्यावर भर खताचा मारा दिला तर मग काय त्या पिकाची बहारच होते. मुंबईच्या संबंधानें जो शोध केला त्यावरून असें दिसून आलें कीं, देशी पेरणीची रीत अमेरिकेतल्या रीतीपेक्षां पुष्कळ अधीक फायदेशीर आहे.

क० त०

---

हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत मारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

[illegible] .धन आपले हातीं आहे ह [illegible]